चरित्र ९९०



म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
क्र. नं

RTLBK-0008225

[ चरित्र व तत्वज्ञान

गोपाळ वि[illegible] तुळपुळे एम.ए.



5 JAN 1976

अनुक्रम
मिती
क्र.
नों. दि.
वाचनालय श्री

# सॉक्रेटीस

## ( चरित्र व तत्त्वज्ञान )

२००४५ ... २०/११/५५

गोपाळ विष्णु तुळपुळे
एम्. ए.

RLFBK-0008225

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
8225

किंमत दीड रुपया

चित्रशाळा प्रकाशन : पुणें २

मुद्रक व प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी
बी. ए. ( टिळक )
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस, पुणें २

प्रथमावृत्ति
श्रावण कृ. ७ शके १८७६
दिनांक २० ऑगस्ट, १९५४

## वाचनीय पुस्तकें


'Early Greek Philosophy'
—*Alfred William Benn.*

'The Development of Greek Philosophy'
—*Robertt Adamson.*

'Socrates'—*Encyclopaedia Britannica.*

'The Greek Philosophers'
—*Alfred William Benn.*

'The Trial and Death of Socrates'
—*F. J. Church.*

'Greek Philosophy'—*Margaret E. J. Taylor.*

'Socrates'—*Nelson's Encyclopaedia.*

'Socrates'—*A. E. Taylor.*

'सॉक्रेटिसाचें चरित्र'—*कृष्णशास्त्री चिपळूणकर.*

'सॉक्रेटिसाचे संवाद'—*वामन मल्हार जोशी.*


• • •

# अनुक्रमणिका


**चरित्र :**

१ बालपण व शिक्षण ... ... ३
२ लष्करी कामगिरी ... ... १४
३ जीवनकार्याचा प्रारंभ : ईश्वरी संदेश ... ... २४
४ खटल्याची पार्श्वभूमि : खटला ... ... ४३
५ कारागृहवास : विषप्राशन ... ... ६५
६ स्वभावविशेष ... ... ८२

**तत्त्वज्ञान :**

७ पार्श्वभूमि ... ... ९३
८ ज्ञानमार्ग ... ... ९९
९ ज्ञान व नीति ... ... १११
१० धर्मविषयक व समाजविषयक विचार ... ... १२२
११ सॉक्रेटिसाचे अनुयायी ... ... १२५

## प्रस्तावना

प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञान व उपनिषदांतील तत्त्वज्ञान यांतील कांहीं विचारांत बरेंच साम्य आहे असें वाचनांत येतें. हें साम्य कितपत व कसें आहे हें पाहण्याची इच्छा होऊन मी ग्रीक तत्त्वज्ञानाचीं व त्याच्या इतिहासाचीं पुस्तकें वाचूं लागलों. सेवानिवृत्त झाल्याकारणानें वेळहि मिळाला. सॉक्रेटीसपूर्व तत्त्वज्ञानाचा भाग संपून सॉक्रेटिसाच्या चरित्राचा व तत्त्वज्ञानाचा भाग वाचण्यांत आला, तेव्हां त्याचीं उदात्त नैतिक तत्त्वें, तदनुसार शब्दशः आचरण, सत्यजिज्ञासा, सत्यप्रियता व त्यानें आंखलेला सत्यशोधनाचा मार्ग पाहून या थोर सत्पुरुषाचें चरित्र व तत्त्वज्ञान पुस्तकरूपानें लिहावें अशी इच्छा होऊन मीं हें छोटेखानी चरित्र लिहिण्यास घेतलें.

विचारवंतांच्या मार्गदर्शनाची समाजाला नेहमींच गरज असते. भारताला नुकत्याच प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याच्या काळांत तर अशा मार्गदर्शनाची विशेष आवश्यकता आहे. मतभिन्नतेनें निर्माण झालेले राजकारणांतील पक्षोपपक्ष, संक्रमणाच्या या काळांत अस्तित्वांत येऊं पाहणाऱ्या विविध सामाजिक सुधारणा व त्यांचे निरनिराळ्या मतांचे पुरस्कर्ते, तरुण स्त्री-पुरुषांच्या मनांत उत्पन्न होत असलेली कौतुकास्पद अशी समाजसेवेची उत्कट प्रवृत्ति, त्यांची स्वार्थत्यागाची तयारी इत्यादि समाजाला प्रगतीच्या मार्गाला नेणाऱ्या अनेक गोष्टी आज आपण आनंदित अंतःकरणानें पाहात आहों. हें सर्व इष्ट असेंच घडत आहे यांत शंका नाहीं. पण हें पाहात असतांना एक विचार मनांत येतो.

तरुणांच्या मनांत स्वभावतःच तीव्र असणाऱ्या भावना तीव्रतर होऊन त्यांच्या हातून कार्याचा विपरीत परिणाम तर होणार नाहीं ना? भावनांना विचाराचा पायबंद पडला नाहीं तर त्यांच्या अतिरेकानें कार्यनाश होण्याचा संभव असतो. केवळ भावनेनें प्रेरित होऊन केलेलें कार्य 'ब्रेक'शिवाय धांवणाऱ्या वाफेच्या इंजनासारखें असतें. याकरितां तरुण कार्यकर्त्यांना योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते. पक्षनेते आपआपल्या पक्षांना मार्ग दाखवीत असतात हें खरें असलें तरी हें मार्गदर्शन निःस्वार्थी, शुद्ध मनानें होतेंच असें नाहीं. पक्षनेते जाणून अथवा नेणून उपाधिबद्ध झालेले असतात, व त्यामुळें त्यांच्याकडून योग्य मार्गदर्शन होण्याचा संभव कमी असतो.

लोकसत्तेंत स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या जनतेला हें विशेष लक्षांत ठेवावें लागतें, कीं राज्याची प्रगति प्रातिनिधिक सरकारनें केलेल्या कायद्यांच्या पालनावर अवलंबून असते. कायद्यांच्या पालनानें समाजस्वास्थ्य लाभतें व समाजस्वास्थ्यानें प्रगतीचें पाऊल पुढें पडत राहातें. कायद्यांच्या इष्टानिष्टतेविषयीं जनतेंत मतभेद होणें स्वाभाविक आहे. कोणत्याहि अधिकारारूढ पक्षाला सर्वसंमत कायदे करणें किंवा राज्यकारभार चालविणें अशक्यच असणार. कायदा अयुक्त वाटल्यास सनदशीर रीतीनें विरोध दाखवून तो बदलून घेण्याचा प्रत्येकाला हक्क असतो. सॉक्रेटिसाचें चरित्र या दृष्टीनें पाहण्यासारखें आहे. त्यानें आजीव परिश्रम करून ॲथेनिअन नागरिकांना विचाराच्या मार्गावर आणलें. त्याला ॲथेन्सचा राज्यकारभार कांहीं बाबतींत नापसंत होता. आपली नापसंती तो निर्भीडपणें स्पष्ट शब्दांनीं बोलून दाखवी. तथापि त्यानें नगर-राज्याचे कायदे किती दक्षतेनें पाळले व अंगावर टाकलेली जबाबदारीची कामगिरी कशी कांटेकोरपणानें पार पाडली हें पाहण्यासारखें आहे. त्याच्या चरित्रापासून आपल्याला आज अशा पुष्कळ गोष्टी शिकतां येतील. राजकीय, सामाजिक, धार्मिक इत्यादि अनेक प्रश्न भारताला सोडवावयाचे आहेत. सरकार व जनता उभयतांनीं निःस्वार्थ व देशहित मनांत ठेवून ते सोडविण्याचा प्रयत्न केल्यास ते सहज सुटूं शकतील.

सॉक्रेटिसाचा जीवनक्रम म्हणजे त्याचा आपल्या नगरबांधवांशीं आयुष्यभर चालूं असलेला झगडाच होता. दिसेल तेथें अन्यायाचा प्रतिकार करण्यास

तो नेहमीं तत्पर असे. तत्त्वज्ञान व व्यवहार यांचा परस्पर संबंध नाहीं अशी साधारण समजूत आहे, पण ती खरी नाहीं. सॉक्रेटिसाचें तत्त्वज्ञान व्यवहाराकरितां होतें. त्याचें चरित्र वाचकांस मनोरंजक व मार्गदर्शक होईल असें वाटून प्रस्तुत पुस्तक लिहिण्याची इच्छा झाली.

पुस्तक सखोल अभ्यासकांकरितां लिहिलेलें नाहीं. त्याची रूपरेखा सामान्य वाचकांकरितां स्थूल स्वरूपाची आंखली आहे. सॉक्रेटिसाच्या अंगचे अमोल गुण, त्याची तर्कशुद्ध विचारसरणी, उदात्त तत्त्वें व त्या तत्त्वांनुसार आचरण यांची त्यांना ओळख व्हावी या इच्छेनें हें चरित्र लिहिलें आहे.

कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं बऱ्याच वर्षांमागें रेल्निच्या " Life of Socrates " या पुस्तकाच्या आधारानें सॉक्रेटिसाचें चरित्र लिहिलें होतें. कै. वामनराव जोशी यांचें " सॉक्रेटिसाचे संवाद " हें उत्कृष्ट पुस्तक प्रसिद्ध आहे. या पुस्तकांत ' युथिफ्रॉन ', ' ॲपॉलॉजी ', ' क्रिटो ' व ' फीडो ' या प्लेटोच्या चार संवादांचा अनुवाद आहे. प्रस्तावनेंत वामनरावांनीं सॉक्रेटिसाचें तत्त्वज्ञान सविस्तर नसलें तरी बरेंचसें निवेदित केलें आहे. पण चरित्र त्रोटक आहे. लेखकाचा हेतु प्लेटोच्या उत्कृष्ट संवादांचा अनुवाद करण्याचा होता; सॉक्रेटिसाचें चरित्र लिहिण्याचा नव्हता. चिपळूणकरांच्या चरित्रांत तत्त्वज्ञानाचा भाग कमी आहे. वरील पुस्तकांतील उणीव प्रस्तुत चरित्रानें अंशतः भरून निघेल अशी आहे.

*केनापि देवेन हृदि स्थितेन ।*
*यथा नियुक्तोऽस्मि तथा करोमि ॥*

— पाण्डवगीता

**गो. वि. तुळपुळे**

# सॉ क्रे टी स

## चरित्र

## १. बालपण व शिक्षण

मानव व मानवी कृति यांच्या महत्त्वमापनाची एकच सर्वोत्कृष्ट कसोटी कोणती असा प्रश्न विचारल्यास कालाचा अनंत, चिरवाही प्रवाह हेंच उत्तर मिळेल. सामान्य व्यक्ति व सामान्य कृति यथाक्रम कालवश होऊन लवकरच जनतेच्या स्मृतिपथांतूनहि नष्ट होतात. सत्ताधारी राजे-महाराजे, नामांकित ग्रंथकार, प्रतिभासंपन्न कवि, शूर सेनानी, प्रख्यात तत्त्ववेत्ते वगैरे कीर्तिमान् पुरुष मृत्यूनंतर कांहीं काळ थोड्याफार प्रमाणानें लोकांच्या स्मरणांत आपलें स्थान टिकवून राहतात. पण भगवान् बुद्ध, ख्राइस्ट, महंमद पैगंबर, श्रीशंकराचार्य, ॲरिस्टॉटल, प्लेटो, यांच्यासारखे श्रेष्ठ धर्मसंस्थापक व तत्त्वज्ञानी त्यांचीं भौतिक शरीरें कालवश झालीं तरी कालाच्या सर्वभक्षक प्रवाहाला बाजूला सारून आपल्या थोर कार्यानें चिरंजीव होऊन बसतात. अशा श्रेष्ठ नररत्नांत प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्ता सॉक्रेटीस याची गणना होते. युरोपिअन तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत सॉक्रेटिसाची सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञानी म्हणून ख्याति आहे.

सॉक्रेटिसाचे तात्त्विक विचार केवळ ॲथेन्सच्या तत्कालीन नागरिकांना किंवा ग्रीक जनतेलाच उपयुक्त होते असें नाहीं, तर ते अखिल मानवजातीला सर्व काळीं उपयोगी पडणारे आहेत. इतर तत्त्वज्ञांप्रमाणें सॉक्रेटिसानें एखादी विशिष्ट तत्त्वमीमांसा जगापुढें मांडली नाहीं. त्याच्या तत्त्वज्ञानानें तात्त्विक मीमांसांची बिनचूक उभारणी कोणत्या पायावर केली पाहिजे, त्या मीमांसांच्या सत्याची तर्कशुद्ध कसोटी कोणती, त्यांत अंतर्भूत होणारीं तत्त्वें कशीं परीक्षावीं

यांविषयींचें ज्ञान लोकांना करून दिलें. त्याच्या तत्त्वज्ञानाला 'तत्त्वज्ञानाचें तत्त्वज्ञान' असें म्हणतां येईल. दुसरें असें कीं सॉक्रटिसाचें तत्त्वज्ञान केवळ तात्त्विक स्वरूपाचें नाहीं. व्यवहारदृष्टया त्याला अधिक महत्त्व आहे. ह्या तत्त्वज्ञानानें लोकांना तर्कशुद्ध विचार करण्यास शिकविलें, व त्याच्या मीमांसकानें जनतेला व्यवहारांत सत्यनिष्ठतेनें कसें वागावें याविषयींचें स्वतःच्या आचरणानें धडे घालून दिले. सॉकेटिसाचें जीवनचरित्र व व्यक्तिवैशिष्टय त्याच्या तत्त्वज्ञानाचीं प्रात्यक्षिकेंच होत. विचाराप्रमाणें उच्चार व उच्चाराप्रमाणें आचार या तत्त्वानुसार त्याचे तात्त्विक विचार व त्याचे आचार यांची कधींहि फारकत झाली नाहीं. 'बोले तैसा चाले' असें त्याचें कांटेतोल वर्तन होतें.

सॉक्रेटिसाच्या जीवनाचा विचारपूर्वक अभ्यास करणारास त्याच्या तत्त्वज्ञानाचें आकलन सुलभतेनें होण्यासारखें आहे. या दृष्टीनें त्याच्या चरित्रावर जेवढा अधिक प्रकाश पडेल तेवढा इष्टच. पण खेदाची गोष्ट ही कीं कांहीं ठळक प्रसंग सोडले तर त्याच्या चरित्राची फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. सॉक्रेटिसानें स्वतः लेखन कांहींच केलें नाहीं. त्यामुळें त्याच्याकडून प्रत्यक्ष अशी एकहि गोष्ट समजत नाहीं. अॅथेन्स सरकारनें सॉक्रेटिसावर एक खटला भरला होता. त्यांत त्याला झालेल्या देहान्त शिक्षेचा तत्कालीन तरुणांवर फार परिणाम झाला. या तरुणांपैकीं कांहींनीं सॉक्रेटिसाविषयीं कित्येक गोष्टी लिहून प्रसिद्ध केल्या. या लेखांवरून चरित्रविषयक कांहीं माहिती मिळते. अॅथेन्सचा नागरिक व सॉक्रेटिसाचा शिष्य झेनोफॉन[१] याच्या "संस्मरणीय गोष्टी"[२] व "भोजनप्रसंगींच्या गप्पा" ("Symposium")[३] या ग्रंथांत, व सॉक्रेटिसाचा दुसरा प्रख्यात शिष्य प्लेटो[४] यानें लिहिलेल्या "संवादां"त[५]

१. खि. पू. ४३०–३५५. २. "Memorabilia".

३. प्राचीन ग्रीक नागरिक गप्पा मारण्याकरितां, एखाद्या विषयाची चर्चा करण्याकरितां, विशेषेंकरून तात्त्विक चर्चेकरितां एके ठिकाणीं जमत. चर्चेच्या वेळीं भोजन व मद्यपान चाले. अशा सभेला "Symposium" म्हणत. झेनोफॉन व प्लेटो या दोघांनींहि "Symposium" हें नांव आपल्या ग्रंथांना दिलें होतें.

४. प्लेटो. जन्म खि. पू. ४२८. ५. "Dialogues".

च "संस्मरणीय गोष्टी"[1] मध्यें त्याच्यावर खटल्यांत आलेले आरोप, त्यानें केलेलें बचावाचें भाषण, त्याचें तत्त्वज्ञान वगैरे गोष्टी आल्या आहेत. पण ही सर्व माहिती सॉक्रेटिसाच्या जीवनाच्या उत्तर भागांतील म्हणजे पन्नाशी-नंतरची आहे. ईश्चीनीज्च्या ग्रंथांतहि कांहीं माहिती मिळते. हे सर्व लेखक सॉक्रेटिसापेक्षां वयानें लहान होते. सॉक्रेटिसाच्या विषप्राशनाच्या वेळीं ईश्ची-नीज् त्याच्याजवळ होता. प्लेटो आजारी असल्यामुळें जाऊं शकला नाहीं. झेनोफॉन् आशिआंत गेला होता. या सर्व लेखकांच्या लिखाणांतून कांहीं विस्कळीत माहिती मिळते. ईश्चीनीज् प्रत्यक्ष हजर असल्यामुळें त्याची माहिती विश्वसनीय मानण्यास हरकत नाहीं. झेनोफॉनला प्रतिभा बेताचीच असल्यामुळें तो कल्पनेनें बनवून गोष्टी सांगण्यासारखा नव्हता. त्याची हकीगत मान्य केली पाहिजे. प्लेटोविषयीं मात्र असें सहज म्हणतां येत नाहीं. तो अत्यंत प्रतिभा-संपन्न असल्याकारणानें त्याला वाटेल ती निर्मिति करणें शक्य होतें.

सॉक्रेटिसाच्या वेळीं ॲरिस्टॉफेन्स नांवाचा एक नाटककार होऊन गेला. त्यानें आपल्या 'मेघ'[2] नाटकांत सॉक्रेटिसाचें विडंबन केलें आहे. मुळांत सत्याचा कांहीं तरी अंश असल्याशिवाय विडंबन होत नाहीं. या नियमास अनुसरून या नाटकांतहि सॉक्रेटिसासंबंधीं कांहीं माहिती मिळते. पण त्याचें प्रमाण किती हें सांगणें तितकेंच कठीण पडतें. ॲरिस्टॉफेन्सविषयीं आणखीहि एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं तो केवळ विनोदी नाटककार होता. त्याचा व सॉक्रेटिसाचा हेवादावा होता असें दिसत नाहीं. कदाचित सॉक्रेटीस या व्यक्तीपेक्षां तत्कालीन नवीन वैचारिक चळवळीवर उपरोधिक टीका करण्याचा त्याचा हेतु असावा, व या चळवळीचा एक प्रतिनिधि म्हणून त्यानें सॉक्रेटिसावर लेखणी उचलली असावी असें एक मत आहे. कांहींचें तर असें म्हणणें आहे कीं या नाटकांतील सॉक्रेटीस हा केवळ नाटककारानें कल्पनेनें निर्माण केलेला असणें अशक्य नाहीं. त्या काळीं ॲथेन्समध्यें बऱ्याच व्यक्तींचें सॉक्रेटीस हें नांव असें. अलीकडील कांहीं लेखक तर सॉक्रेटीस अशी ऐतिहासिक व्यक्तीच मानण्यास तयार नाहींत. अशी व्यक्ति अस्तित्वांत नव्हती असें त्यांचें म्हणणें. पण हें म्हणणें टिकणार नाहीं.

१. "Symposium". २. "Cloud".

ॲरिस्टॉफेन्सच्या वेळीं सॉक्रेटीस एक प्रख्यात नागरिक म्हणून ॲथेन्समध्यें वावरत होता. एरवीं अगदीं सामान्य, अज्ञात व्यक्तीचें किंवा काल्पनिक व्यक्तीचें विडंबन करण्यांत स्वारस्य काय ?

सॉक्रेटिसाचा जन्म ग्रीस देशांत ॲथेन्स शहरीं खि. पू. ४६९ सालीं झाला. जर्मन इतिहासकार ट्सेलर जन्मकाल खि. पू. ४७० असें म्हणतो. सॉक्रेटिसाचा खटला खि. पू. ३९९ सालीं सुरू झाला, त्या वेळीं तो सत्तर वर्षांचा होता असें प्लेटो ' ॲपॉलाजी ' संवादांत सांगतो. यावरून जन्मकाल खि. पू. ४७०–६९ येवढ्यांत असला पाहिजे. सॉक्रेटिसाच्या वडिलांचें नांव सोफ्रॉनिस्कस व आईचें नांव फिनॅरिटी. सोफ्रॉनिस्कस एक बऱ्यापैकीं मूर्तिकार होता. या धंद्यावर तो आपला चरितार्थ चालवी. आई सुइणीचें काम करी. सॉक्रेटिसाच्या काळीं सुईणकामाचें शास्त्रच नसल्यामुळें सुइणीचें काम तिच्यावर लादण्यानें कालविपर्यास होतो असें कांहींचें म्हणणें आहे, पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. सुईणशास्त्र नसलें तरी सुइणींचा धंदा अनादिकालापासून चालत आला आहे. आजच्या काळांतसुद्धां अनेक स्त्रिया शास्त्रीय ज्ञान नसतांना हें काम उत्कृष्ट रीतीनें करतांना दृष्टीस पडतात.

' बापाचा धंदा मुलाला ' या न्यायानें सॉक्रेटीस वडिलांच्या जवळ मूर्तिकाराची कला शिकला. ॲथेन्स शहराच्या गढीच्या प्रवेशदरवाज्याजवळ ' ग्रेसेस ' म्हणून नांवाजलेल्या ' युफ्रॉसिनी ', ' ॲग्लेआ ' व ' थेलिआ ' नामक तीन सुंदर देवतांच्या तीन व ' मर्क्यूरी ' देवाची एक अशा चार मूर्ति होत्या. या मूर्ति सॉक्रेटिसानें घडलेल्या होत्या असें म्हणतात. प्लेटोच्या म्हणण्याप्रमाणें सॉक्रेटीस मूर्तिकाराची कला कधींच शिकला नव्हता. वरील चार मूर्तींची कथा केवळ दंतकथाहि असूं शकेल. तें कांहीं असलें तरी एक गोष्ट मात्र खरी कीं सॉक्रेटिसानें वडिलांचा धंदा पतकरला नाहीं. तो वडिलांच्या दुकानांत बसत असे पण पुढें क्रीटो नांवाच्या एका गृहस्थानें त्याची कुशाग्र बुद्धि पाहून त्याला विद्याभ्यासाकरितां शाळेंत घातलें.

ॲरिस्टॉटलच्या थिओफ्रेस्टस नांवाच्या शिष्याच्या सांगण्यावरून असें दिसतें कीं सॉक्रेटीस प्रथम ऑर्केलॉसच्या शाळेंत होता. ऑर्केलॉस प्रख्यात ग्रीक तत्त्ववेत्ता ॲनॅक्झॅगोरास याचा शिष्य.त्याच्या शाळेंत सॉक्रेटीस होता असा दुसरा कोठें उल्लेख

नाहीं. तथापि ॲर्कलॅसची व्याख्यानें तो आवडीनें ऐके; केव्हां केव्हां विद्यार्थ्यांना शिफारस करून त्याच्या शाळेंत पाठवी असें झेनोफॉननें आपल्या "संस्मरणीय गोष्टी"त म्हटलें आहे. गणित, ज्योतिःशास्त्र, भौतिकशास्त्रें, गायन, मल्लविद्या व भूमिति या तत्कालीन ॲथेनिअन शिक्षणक्रमांतील विषयांचें अध्ययन सॉक्रेटिसानें केलें होतें. त्याच्या पूर्ववयांत साधारणपणें त्याला सर्व शास्त्रें अवगत होतीं. मात्र या शास्त्रीय ज्ञानावर त्याचें प्रेम नव्हतें. या विषयांकडे तो केवळ व्यवहारी दृष्टीनें पाहात असे. त्याचें म्हणणें असें कीं हें शास्त्रीय ज्ञान रोजच्या व्यवहाराच्या उपयोगी पडतें हें खरें, पण हें उच्च दर्जाचें ज्ञान नाहीं. भूमितीचें ज्ञान शेताचा तुकडा मोजण्याकरितां, ज्योतिःशास्त्र जहाजांवरील खलाशांना रात्रीची वेळ, महिना, दिशा वगैरे समजून येण्याकरितां; असाच इतर शास्त्रांचा उपयोग असें म्हणून तो या शास्त्रांची विल्हेवाट लावी. तो म्हणतो, "भौतिकशास्त्रज्ञ वेड्यासारखे विसंगत असतात. त्यांचीं शास्त्रीय अनुमानें वारंवार परस्परविरोधी दिसून येतात. त्यांचीं शास्त्रें ज्ञानप्राप्तीच्या दृष्टीनें अशक्य कोटींतील, अधार्मिक व अनुत्पादक. या शास्त्रांचें गूढ मानवानें उकलावें अशी देवाची इच्छाच नाहीं. त्याला तीं मानवापासून गूढ ठेवावयाचीं असतात. त्यांचा स्फोट करून तीं उघडीं करून दाखविण्याची मानवाची धडपड त्याला आवडत नाहीं. या शास्त्रीय संशोधनांत काळाचा अपव्यय करण्यापेक्षां त्याचा विनियोग त्याला उच्च ज्ञान मिळविण्याकडे करतां येईल."[1] सॉक्रेटिसाचे ज्ञानविषयक विचार पुढें एका प्रकरणांत येणार आहेत. भौतिकशास्त्रांसंबंधींचे त्याचे हे विचार अर्थातच आतांच्या काळांत मान्य होण्यासारखे नाहींत. हे विचार दोन हजार वर्षांपूर्वीचे व तत्कालीन परिस्थितीला धरून आहेत येवढें ध्यानांत ठेवणें बरें.

शास्त्रीय अध्ययनाप्रमाणें सॉक्रेटिसाचें त्या काळांतील वाङ्मयाचेंहि अध्ययन झालें होतें. नामांकित ग्रीक ग्रंथकारांच्या ग्रंथांतील उत्तम उत्तम भाग तो पाठ म्हणत असे. होमरचें काव्य त्याला विशेष आवडे. प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्यांपैकीं विशेष बुद्धिमान असे सात पुरुष "ग्रीस देशांतील सात शहाणे"

---

१. झेनोफॉन–"संस्मरणीय गोष्टी" ("Memorabilia").

म्हणून प्रसिद्ध होते.[१] त्यांचीं कांहीं सुभाषितें डेलफाय येथील ॲपॉलोच्या देवाल्यावर कोरलीं होतीं. हीं सुभाषितें सॉक्रेटिसाला पाठ असत. चिलॉनचें सर्वश्रुत सुभाषित 'आत्मज्ञान — स्वतःचें ज्ञान — करून घ्या' तर त्याच्या एकंदर तत्त्वज्ञानाचा मूलाधारच होता असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सॉक्रेटिसाच्या पूर्वी होऊन गेलेल्या तत्त्ववेत्त्यांनीं निसर्गाच्या पलीकडे फारसा विचारच केला नव्हता. त्यांचे विचार विश्वाच्या मुळाशीं मूलभूत तत्त्व कोणतें असावें हें ठरविण्याकडे लागले होते. आदि तत्त्ववेत्ता थेलस[२] याच्या मतानें हें तत्त्व 'जल' होतें. त्यानंतर आलेला ॲनॅक्सिमँडर[३] म्हणे कीं विश्वांतील सर्व पदार्थ एकच पदार्थ — एकच तत्त्व — आहेत. दिक्कालाद्यनवच्छिन्न अशा एका तत्त्वाची हे पदार्थ रूपांतरें आहेत येवढेंच. ॲनॅक्झिमिनीज[४] (खि. पू. ५७०–४८०) 'हवा' (air) हें मूलभूत तत्त्व मानी. पुढें पायथॅगोरासनें[५] (सुमारें खि. पू. ५७०–५००) सर्व विश्व आंकड्यांतून निर्माण झालें आहे असें प्रतिपादलें.[६]

याप्रमाणें भौतिकशास्त्रज्ञांच्या विविध व परस्परविरुद्ध अशा मीमांसा पाहून सॉक्रेटीस निराश झाला. त्याचा स्वभाव असा होता कीं तो दुसऱ्यांच्या विचारांचें किंवा तत्त्वांचें डोळे मिटून ग्रहण न करतां त्यांना तर्कशुद्ध विचाराची कसोटी लावी. पुढें ॲनॅक्झॅगोरासचे[७] लेख वाचीत असतां त्याला आशेचा

१. पेशवाईतील प्रख्यात साडेतीन शहाण्यांप्रमाणें प्राचीन ग्रीस देशांत सात शहाणे होते. त्यांचीं नांवें व प्रत्येकाचें एक प्रसिद्ध सुभाषित अशीं सात वाक्यें डेलफाय येथील ॲपॉलोच्या देवालयावर कोरलीं होतीं. तीं अशीं :—

(१) ॲथेन्सचा सोलन— 'Do nothing in excess' (अति सर्वत्र वर्जयेत्). (२) मायलेटसचा थेलस— 'Surety spells ruin' (जामीनकी म्हणजे सर्वनाश). (३) मिटिलीनचा पिटॅकस— 'Recognize your opportunity' (आपली सुवर्णसंधि ओळखा). (४) प्रीनीचा बिआस— 'Too many cooks spoil the broth' (स्वयंपाक्यांची गर्दी म्हणजे पक्वान्नाचा बिघाड). (५) लॅसिडिमॉनचा चिलॉन— 'Know

किरण दिसूं लागला. ॲनॅक्झॅगोरासनें एका ठिकाणीं असें प्रतिपादन केलें आहे कीं ' निसर्गांत येवढा नियमबद्ध व सुव्यवस्थित कारभार दिसतो याचें कारण या कारभाराच्या मागें एखादें मन कार्य करीत असतें. मानवी कृतींतील सुसंगतपणाच्या मागें मानवी मन काम करतें. त्याचप्रमाणें निसर्गाची गोष्ट आहे. ' ॲनॅक्झॅगोरासच्या या विचारानें विश्वाच्या उत्पत्तीसंबंधानें सॉक्रटिसाला एक नवीन दृष्टि आली. मानवी जीवनाप्रमाणें अखिल विश्वाचा व्यापार तर्कशुद्ध पायावर सुसंगतपणें उभारला आहे या विचारानें त्याच्या मनांत एका नवीन विचाराचें मूळ धरलें व वर म्हटल्याप्रमाणें त्याला एक आशेचा किरण दिसूं लागला. आतां ॲनॅक्झॅगोरासच्या लिखाणाच्या अभ्यासानें भौतिक मूलतत्त्वांविषयींचे विरोध नष्ट होतील असें त्यास वाटूं लागलें. पण पुढें येथेंहि त्याची निराशाच झाली. कोणतीहि मीमांसा तर्काच्या कसोटीला लागल्याशिवाय तो मान्य करीत नसे. ॲनॅक्झॅगोरासचें म्हणणें या कसोटीला लागेना. ॲनॅक्झॅगोरासची विश्वकार्याची मीमांसा त्याच्या दृष्टीनें मर्यादित व अपुरी ठरत होती. ॲनॅक्झॅगोरासच्या पूर्वीचा तत्त्ववेत्ता एंपिडॉक्लीज्[८] याच्या मीमांसेचा एक भाग असा होता कीं निसर्गांत निरनिराळ्या गुणधर्मांचे विविध पदार्थ दिसतात याचें कारण हे पदार्थ पृथ्वी, आप, तेज ( अग्नि ) व वायु हे जे विश्वोत्पत्तीचे मूलभूत पदार्थ किंवा मूलतत्त्वें, त्या तत्त्वांच्या निरनिराळ्या प्रमाणांत होणाऱ्या मिश्रणामुळें उत्पन्न होतात. हें मत ॲनॅक्झॅगोरासला मान्य होतें. पण त्याच्यापुढें सॉक्रेटिसाप्रमाणें एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला

---

thyself ' ( स्वतःला ओळखा ). ( ६ ) लिंडसचा क्लिओबुलस– ' Moderation is the best thing ' ( मर्यादापालन सर्वश्रेष्ठ आचार होय ). ( ७ ) कॉरिंथचा पिरिॲंडर– ' Exercise forethought in everything ' ( सर्वत्र दूरदृष्टि ठेवा ).

२. सुमारें खि. पू. ६००–५४०. ३. खि. पू. ६१०–५४७.

४. खि. पू. ५७०–४८०. ५. खि. पू. ५७०–५००.

६. " All things are made of numbers ".

७. खि. पू. ५००–४२८. ८. सुमारें खि. पू. ४५०.

होता. हीं मूलतत्त्वें मिश्रित होतात हें खरें, पण त्या मिश्रणाकरितां त्यांना गति कशी मिळते ? त्यांना गति देणारा कोणीतरी असणें अवश्य आहे. जड पदार्थांना आपोआप गति येत नाहीं. या प्रश्नाचा विचार करीत असतां ॲनॅक्झॅगोरासला मनाची कल्पना सुचली. मन हेंच मूलतत्त्वांना गति देणारें आहे असें त्यानें प्रतिपादिलें. त्याच्या तत्त्वज्ञानाचा हाच विशेष होय. आतांपर्यंतचे ग्रीक तत्त्ववेत्ते भौतिक मूलतत्त्वांतच घोटाळत होते. सॉक्रेटिसाला प्रथम ॲनॅक्झॅगोरासची मीमांसा समाधानकारक वाटली, पण त्याचें विचारप्रवण मन त्याला स्वस्थ बसूं देईना. मनानें एकदां मूलतत्त्वांत गति उत्पन्न करून दिल्यानंतर विश्वाचें हें यंत्र पुढें त्याच्या सहाय्याशिवाय चालत राहिलें कीं काय, असा प्रश्न त्याला विचारावासा वाटला. घड्याळजीनें एकदां घड्याळ तयार करून तुम्हांला दिलें म्हणजे जसें त्याचें काम संपतें तसें मनाचें कार्य भौतिक गतीनंतर संपलें कीं काय ?

सॉक्रेटीस म्हणतो, " मी मोठ्या उत्साहानें ॲनॅक्झॅगोरासच्या लिखाणाचा अभ्यास करूं लागलों, पण या जगांत घडणाऱ्या घटनांचें त्याला मनाच्या पलीकडे कारण देतां येईना. या घडामोडींचीं कारणें पृथ्वी, पाणी, अग्नि वगैरे मूलतत्त्वेंच होत असें तो म्हणतो. याचा अर्थ येवढाच कीं मनानें फक्त मूलतत्त्वें उत्पन्न केलीं, व त्यानंतर जगांतील विविध पदार्थ व घडामोडी या मूलतत्त्वां-मुळें घडून येतात. इतर तत्त्वज्ञांप्रमाणेंच ॲनॅक्झॅगोरासच्या मनांत मूलतत्त्वां-पलीकडे व मनापलीकडे जगांतील घडामोडींच्या मुळाशीं त्यांना योग्य घटना देणारी एखादी शक्ति असावी व ती दैवी शक्ति असावी हा विचार येत नाहीं. विश्वांतील विविध घटना या आदिशक्तीच्या योजनेनें बनत असतात व त्या जगाच्या हितार्थ असतात, हा विचार या तत्वज्ञांच्या मनाला शिवतच नाहीं. या आदिशक्तीचें — आदिकारणाचें — स्वरूप मला कोणी दाखवील तर तें मी आनंदानें समजून घेईन. "[1]

याप्रमाणें ॲनॅक्झॅगोरासच्या अभ्यासानेंहि सॉक्रेटिसाचें समाधान होईना. नीतिशास्त्र मानवानें ईश्वराशीं व मानवाशीं कसें वागावें हें शिकवितें असें त्याचें म्हणणें असें व म्हणून यापुढें त्यानें या शास्त्राचा अभ्यास सुरू केला.

सॉक्रेटिसाच्या ज्ञानसंपादनार्थ चाललेल्या अभ्यासांत अशा रीतीनें बदल

१ प्लेटो—' फीडो ' XLVII

१०७५ २०१११५

होत गेला. त्याच्या विचारसरणीच्या स्वतंत्रपणामुळें तो एका ठिकाणीं असा चिकटून राहिला नाहीं. तथापि या ठिकाणीं एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं तो जरी स्वतंत्र विचाराचा व स्वातंत्र्यप्रिय होता तरी प्रत्येक नागरिकानें सरकारी कायदे पाळलेच पाहिजेत असें त्याचें निश्चित मत होतें. या मतापासून तो सूतभरहि ढळला नाहीं. या कर्तव्याचें पालन करण्याकरितां कारागृहांतून पळून जाण्याची संधि आली असतांना, त्याचे मित्र तसें करण्याविषयीं आग्रह करीत असतांना, व अशा गोष्टी अॅथेन्समध्यें प्रत्यहीं घडत असतांना त्यानें शांतपणें मृत्यु पतकरला.

तात्त्विक विवेचनाशिवाय इतर विषयांच्या अभ्यासाकडे सॉक्रेटिसाचें लक्ष नव्हतें. सत्यशोधन हेंच त्याच्या दृष्टीनें शिक्षणाचें ध्येय होतें. तथापि त्याला हा अभ्यास मध्येंच सोडावा लागला. अॅथेन्स हें लोकसत्ताक राज्य होतें. सत्ता व बल कायम टिकावीं म्हणून अॅथेन्समध्यें सर्व तरुणांना लष्करी शिक्षण सक्तीनें घ्यावें लागें. सॉक्रेटिसालहि तें घ्यावें लागलें व त्यानें स्वतःची आवडनिवड बाजूला ठेवून नागरिकाचें कर्तव्य म्हणून तें आनंदानें घेतलें. इतकेंच नव्हे तर पुढें जेव्हां जेव्हां प्रसंग पडला तेव्हां तेव्हां त्यानें आपली लष्करी कामगिरी नेहमींच तत्त्वनिष्ठेनें, कर्तव्यतत्परतेनें व प्रामाणिकपणें पार पाडली. या प्रसंगांत त्याच्या अंगचे कांहीं बिनमोल गुण जनतेच्या दृष्टीस पडले.

सॉक्रेटिसाची बायको झँटिपी ही भांडखोर, आततायी व बिनमुर्वतखोर बायको होती. ती भर रस्त्यांत नवऱ्याशीं हमरीतुमरीवर येई; वेळेवर त्याच्या अंगावरील कपड्यांची ओढाताण करून ती ते फाडून टाकण्यासहि कमी करीत नसे. पण सॉक्रेटीस म्हणजे आपले तुकारामबुवा! त्याची शांतवृत्ति केव्हांहि ढळत नसे. अशाच भांडणाच्या एका प्रसंगीं रागाच्या आवेगांत तिनें हातांतील घाणेरड्या पाण्याचें भांडें त्याच्या अंगावर फेंकलें तेव्हां ' एवढा कडकडाट झाल्यावर पाऊस कोसळणारच ' असें त्यानें शांतपणें विनोदानें म्हटल्याची गोष्ट सर्वश्रुत आहे. त्याच्या मित्रांनीं या कजाग पत्नीविषयीं बोलणें काढलें कीं तो त्यांना विनोदानें म्हणे, " पत्नीनें केलेला अपमान मी सहन करूं शकलों म्हणजे ज्याच्याबरोबर मला वागतां येणार नाहीं असा एकहि इसम शिल्लक राहणार नाहीं. म्हणून इतर स्त्रिया सोडून मी झँटिपीशीं लग्न केलें. "

मिर्तो नांवाची सॉक्रेटिसाची आणखी एक पत्नी असल्याचा प्राचीन लेखक उल्लेख करतात. ही ॲरिस्टायडीजची नात. हिनेंहि झँटिपीसारखा नवऱ्याचा छळ केला असें हे ग्रंथकार लिहितात. वास्तविक पाहतां ॲथेन्समध्यें एकीपेक्षां अधिक बायका करण्याला कायद्याची परवानगी नसे. पण पेलोपोनिशिअन महायुद्धांत फार मोठी मनुष्यहानि झाली होती ती भरून काढण्याकरितां कायद्यानें दोन बायका करण्याची हंगामी परवानगी दिली होती. त्याचा फायदा सॉक्रेटिसाला मिळाला होता असें सांगतात. तथापि ही द्वितीय विवाहाची कथा फार करून खरी मानीत नाहींत. प्लेटो, झेनोफॉन यांच्यासारखे सॉक्रेटिसाचे अगदीं निकटचें विश्वसनीय ग्रंथकार द्वितीय पत्नीचा उल्लेख करीत नाहींत. तसेंच ग्रीक इतिहासांत वर दिलेल्या हंगामी कायद्याचाहि उल्लेख नाहीं. ही द्वितीय पत्नीची कथा बहुधा दंतकथा असावी असें दिसतें.

सॉक्रेटिसाच्या वयाच्या चाळिसाव्या वर्षापर्यंतची साधारणपणें आतांपर्यंत एवढीच माहिती उपलब्ध आहे. ख्रि. पू. ४३२–४२९ या सालांत पॉटिडिआच्या वेढ्यांत त्यानें लष्करांत साधा शिपायी म्हणून कामगिरी केली. त्या वेळीं त्याचें वय चाळिशीच्या आसपास होतें. या काळांतील विशेष असें त्याच्याविषयीं कांहींच नमूद केलेलें नाहीं. तथापि एक गोष्ट मात्र खरी कीं त्याचे ऐन उमेदींतील दिवस ॲथेन्सच्या किंबहुना ग्रीसच्या अत्यंत भरभराटीच्या व वैभवाच्या काळांत गेले होते. याच काळांत कला, वाङ्मय, राजकारण, तात्त्विक विचार वगैरे बाबींत अद्वितीय प्रतिभासंपन्न पुरुष उदय पावले. ख्रि. पू. ४६० ते ४२० या काळीस वर्षांत असे नामांकित कवि, इतिहासकार, शिल्पशास्त्री, मूर्तिकार होऊन गेले, कीं त्यांच्यापासून जगानें आज धडे घ्यावे. एस्किलस[1] व सोफॉक्लीज्[2] हे नाटककार व कवि, सॉक्रेटिसाचा स्नेही शोकगीतें लिहिणारा कवि युरिपिडीज्[3], मूर्तिकार फिडिआस्[4], राजकारणपटु पेरिक्लीज[5], इतिहासकार थ्यूसीडिडीज्[6], शिल्पकार इक्टिनस[7] हे सर्व प्रख्यात पुरुष

१. ख्रि. पू. ५२५–४५६.
२. ख्रि. पू. ४९७–४०६.
३. ख्रि. पू. ४८५–४०६.
४. ख्रि. पू. ४९०–४३२.
५. ख्रि. पू. ४६३–४२९.
६. ख्रि. पू. ४६५–४००.
७. ख्रि. पू. सुमारें ४९०.

ॲथेन्सचेच नगरवासी होते. यांचें काव्य, कला व तात्त्विक विचार यांमुळें यांच्या-इतकी संस्कृति-विकासाला दुसरी कोणाची मदत झाली नाहीं. खि. पू. ४२० मध्यें पन्नाशीच्या घरांत असलेला सॉक्रेटीस या सर्वांचा समकालीन होता. यांपैकीं कित्येकांशीं त्याची ओळख असण्याचा संभव होता व त्यांच्याशीं त्याचें संभाषणहि झालें असावें. ॲथेन्स फार मोठें शहर नव्हतें. तें पूर्ण लोकसत्ताक असल्या-कारणानें तेथील नागरिक प्रामुख्यानें घरापेक्षां समाजांतच अधिक वावरत. अशा छोटेखानी लोकसत्ताकांत सॉक्रेटिसासारख्या ठळक व्यक्तीच्या थोर विद्वानांशीं गांठीभेटी होणें अगदीं स्वाभाविक होतें. अशा ठिकाणीं एकलकोंडें राहणेंसुद्धां हितकारक होणार, मग सॉक्रेटिसासारख्या सर्वकाळ हमरस्त्यावर भेटेल त्याच्याशीं संभाषणें व प्रश्नोत्तरें करीत राहणाऱ्याची गोष्ट काय विचारावी ?

बर्नेटच्या म्हणण्याप्रमाणें सॉक्रेटिसाला चाळिशीच्या पूर्वींच ॲथेन्स शहरांत व ॲथेन्सच्या बाहेरहि तत्कालीन विद्वान व बुद्धिमान लोकांत मानाचें स्थान प्राप्त झालें होतें. वर दिलेल्या नामांकित नागरिकांशिवाय आणखीहि कित्येक थोर व्यक्तींशीं सॉक्रेटिसाचा स्नेह होता. क्रीटो नांवाच्या एका धनाढ्याचें त्याच्यावर अंतःकरणापासून प्रेम होतें. प्रख्यात भूमितिशास्त्रज्ञ युक्लीडीज हा त्याच्या स्नेह्यांपैकीं होता. पेलोपोनिशिअन युद्ध सुरू झाल्यावर त्याचा अनेक व्यक्तींशीं नवीन परिचय झाला. त्यांत ॲल्सिबायडीज्, प्लेटोचा चुलता कार्मो-यडीज्, प्लेटोचा मामा क्रिटिॲस व प्लेटोचा वडील भाऊ ॲड्मिनेटस् हें सॉक्रेटिसाचे परम स्नेही होते. त्याच्या मृत्यूसमयीं थीब्ज् शहरचे तरुण नागरिक सिमिॲस् व सीब्रीस्, मॅगॅरॅचा युक्लीडीज व टर्पिसॉन हे त्याच्या सन्निध होते. थीब्ज्, मॅगॅरा वगैरे ॲथेन्सच्या शत्रूचीं शहरें होतीं. तेथील या नागरिकांचा सॉक्रेटिसाशीं स्नेह पेलोपोनिशिअन युद्ध चालू असतांना होणें शक्य नव्हतें. हे स्नेहसंबंध या युद्धापूर्वी म्हणजे सॉक्रेटिसाच्या चाळिसाव्या वर्षापूर्वी झालें असले पाहिजेत.

• • •

## २. लष्करी कामगिरी

सॉक्रेटिसाच्या वयाच्या चाळिसाव्या वर्षापर्यंत त्याच्यासंबंधीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं असें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. जी कांहीं थोडीशी माहिती मिळते ती त्याच्या लष्करांतील कामगिरीसंबंधीं. सॉक्रेटिसाच्या काळांत अॅथेन्सच्या सत्तेचीं सूत्रें पेरिक्लीजच्या हातांत असतांना तें नगर-राज्य वैभवाच्या शिखरास पोहोंचलें होतें, इतकेंच नव्हे तर त्या शहराला जवळ जवळ सार्वभौमत्व प्राप्त झालें होतें. त्यामुळें स्वाभाविकपणें इतर नगर-राज्यें अॅथेन्सचा हेवा करूं लागलीं होतीं. अॅथेन्सच्या सत्तेखालीं असलेल्या पॉटिडिआ शहरानें अॅथेन्सविरुद्ध बंड केलें त्या वेळीं अॅथेनिअन सैन्यानें या शहराला दिलेल्या वेढ्यांत खि. पू. ४३२ ते खि. पू. ४२० पर्यंत सॉक्रेटिसानें सैन्यांतील एक पायदळांतील शिपाई ( Hoplite ) म्हणून काम केलें. त्याप्रसंगीं व त्यानंतर दोनतीन वेळां त्याच्या अंगचे शूर शिपायाला साजेसे कांहीं विशेष गुण दिसून आले. त्याच्यामध्यें काटकपणा, कष्ट सोसण्याची तयारी, भयंकर थंडींत हालअपेष्टा, तहानभूक सहन करण्याची शक्ति इत्यादि गुण इतरांपेक्षां अधिक होते. याच वेढ्यांत पेरिक्लीजचा नातेवाईक व त्याचा स्वतःचा शिष्य अॅलिसबायडीज सैन्यांतील एक अधिकारी म्हणून काम करीत होता. एका प्रसंगीं पॉटिडिआच्या युद्धांत अॅल्सिबायडीजच्या प्राणांवर बेतलें असतांना सॉक्रेटिसानें त्याचे प्राण वांचविले. इतकेंच नाहीं तर लोकसभेंत युद्धांत स्वतःला मिळालेल्या यशाचें श्रेय त्यानें स्वतःकडे न घेतां अॅल्सि-बायडीजलाच दिलें. पुढें खि. पू. ४२४ या सालीं पेलोपोनिशिअन युद्धांत डेलिअमच्या लढाईत वरच्यासारखा प्रसंग सॉक्रेटिसाच्या प्राणांवर आला होता,

त्या वेळीं ॲल्सिबायडीजनें त्याचे प्राण वांचविले. पेलोपोनिशिअन युद्ध ख्रि. पू. ४३१ मध्यें सुरू झालें, व डेलिअमच्या लढाईत थीब्जच्या सैन्यानें ॲथेन्सचा पूर्ण पराभव केला. या पराभवानें ॲथेन्सचा सर्वस्वीं नाश झाला. या लढाईतील सॉक्रेटिसाची एक कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. लढाईच्या शेवटीं सैन्यांतील शिपाई जीव घेऊन पळत असतांना सॉक्रेटीस व दुसरा एक शूर शिपाई लॅचेस हे दोघे धीर खचूं न देतां या आणी-बाणीच्या प्रसंगीं शत्रूशीं निकरानें लढून धिम्मेपणानें माघार घेत होते. त्या वेळचा सॉक्रेटिसाचा करारीपणा शत्रु व मित्र या दोघांच्याहि नजरेंत भरल्या-वांचून राहिला नाहीं. प्लेटोनें लिहिलेल्या 'लॅचेस्' या संभाषणांत लॅचेस म्हणतो, "जर सर्व ॲथेनिअन सैन्य सॉक्रेटिसाप्रमाणें धिम्मेपणानें लढलें असतें तर आम्हांला पराजयाऐवजीं विजयश्रीनें माळ घातली असती." पुढें दोन वर्षांनंतर ख्रि. पू. ४२२ मध्यें पेलोपोनिशिअन युद्धांत ॲंफिपॉलिसच्या लढाईत सॉक्रेटीस तिसऱ्यांदां लढल्याचा उल्लेख आहे. या वेळीं सॉक्रेटिसानें विशेष कामगिरी केल्याचें दिसत नाहीं. याच लढाईत उभय पक्षांतील सेनानी क्लिऑन व ब्रॅसिडास गारद झाले.

ॲंफिपॉलिसच्या लढाईनंतरच्या म्हणजे ख्रि. पू. ४२२ नंतरच्या सोळा वर्षांत आपल्याला सॉक्रेटिसाचें नांव ऐकूं येत नाहीं. त्यानंतरचें ज्ञात असलेलें त्याचें चरित्र प्लेटोच्या 'ॲपॉलॉजी' या संभाषणांत आलें आहे. सॉक्रेटिसावर झालेल्या खटल्याची हकीगत पुढें येणारच आहे. या खटल्यांत न्यायकचेरींत त्यानें आपल्या बचावार्थ केलेलीं भाषणें 'ॲपॉलॉजी' मध्यें प्लेटोनें दिलीं आहेत. तीं काल्पनिक असलीं तरी त्यांत सत्याचा अंश पुष्कळ आहे. या सॉक्रेटिसाच्या भाषणांवरून त्याची तत्त्वनिष्ठा, नीतिधैर्य, सत्यप्रेम, न्याय-प्रियता वगैरे गुण विशेष लक्षांत येतात. या भाषणांत उल्लेखिलेले चरित्रांतील भाग पेलोपोनिशिअन युद्धांत झालेला ॲथेन्सचा पराभव व त्या-नंतरची 'बारभाई'ची कारकीर्द यांतीलच असल्यामुळें त्यांचा या प्रकरणांतच समावेश करणें योग्य होईल.

ख्रि. पू. ४०६ मध्यें आर्गिन्यूसीच्या लढाईत ॲथेनिअन आरमारानें लॅसिडिमोनिअन लोकांचा पराभव केला. लढाईनंतर ॲथेन्सच्या आरमारा-वरील मुख्य अधिकाऱ्यांनीं लढाईत कामास आलेल्या शिपायांचीं प्रेतें परत

आणिलीं नाहींत व लढाईत मोडतोड झालेल्या जहाजांवरील शिपायांचे त्यांनीं प्राण वांचविले नाहींत. त्या बिचाऱ्यांना सर्वांना समुद्रांत जलसमाधि मिळाली. ही दुःखकारक बातमी कानांवर पडतांच ॲथेन्सची जनता क्रोधानें खवळून गेली. मृताच्या धार्मिक अंत्यविधीविषयीं ॲथेनिअन नागरिक विशेष दक्ष असत. हा धार्मिक संस्कार न होणें ही गोष्ट त्यांच्या अंतःकरणाला लागून राही. ही एक त्यांच्या जिव्हाळ्याची बाब होती. समुद्रांत बुडालेल्या आपल्या आप्तेष्टांना यथायोग्य धार्मिक पद्धतीनें मूठमाती मिळाली नाहीं म्हणून नागरिकांना हळहळ वाटली. आरमारावरील मुख्य अधिकाऱ्यांना लोकसभेपुढें खेंचून त्यांच्यावर त्यांनीं आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजावण्यांत हेळसांड केली असा आरोप केला. अधिकाऱ्यांनीं आपली बाजू पुढें मांडण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, 'भयंकर वादळामुळें जहाजांवरील लोकांचे प्राण वांचविणें अशक्य होतें.' मृतांविषयीं त्यांचें म्हणणें असें होतें कीं 'आपण आपल्या हातांखालील अधिकाऱ्यांना मृतांचे अंत्यविधि करण्यास सांगितलें होतें. आपल्यावर कर्तव्यच्युतीचा आरोप करणाऱ्यांपैकीं थिरॅमीनीज हा स्वतः ह्या हातांखालील अधिकाऱ्यांपैकीं एक होता. हे अधिकारी मृतांच्या मूठमातीची व्यवस्था करीत होते, पण भयंकर वादळ झाल्याकारणानें त्यांचा नाइलाज झाला.' या समर्थनानें लोकांचें समाधान झालें नाहीं. पण लोकसभेनें खटल्याचा निकाल न देतां हें काम पुढें ढकललें. सभेनें असें ठरविलें कीं खटला लोकसभेपुढें चालण्याचें कारण नाहीं. ॲथेनिअन नागरिकांनीं आरोपींचें म्हणणें ऐकलेंच आहे, तेव्हां यापुढें सेनेटच्या सभेनें खटला कसा चालवावा हें ठरवावें. सेनेटमध्यें अधिक विचार न होतां अशी सूचना आली कीं लोकसभेनें आरोपींचें म्हणणें ऐकलेंच आहे तेव्हां प्रत्येक आरोपीचा निराळा खटला न चालवितां दहाहि आरोपींविषयीं एकदम एकच मत घेऊन त्यांना निरपराधी ठरवावयाचें किंवा दोषी ठरवून शिक्षा द्यावयाची याविषयीं सेनेटनें निकाल द्यावा. या सूचनेप्रमाणें निकाल करणें अत्यंत अन्यायाचें व बेकायदेशीर होतें. कायद्याप्रमाणें आरोपींची योग्य, वैयक्तिक चौकशी न करतां केवळ नागरिकांच्या हात वर करून दिलेल्या मतानें आरोपींचा निकाल करावयाचा असा याचा अर्थ होता. ॲथेन्सचा एक नियम असा होता कीं, प्रत्येक आरोपीची व्यक्तिशः कायदेशीर चौकशी न्यायसभेंत झाली पाहिजे. सेनेटची वरील सूचना सरळ या कायद्याचा भंग करणारी होती.

या खटल्याची पुढील हकीगत समजण्याकरितां अॅथेन्समध्यें सॉक्रेटिसाच्या काळांत सेनेटची न्यायदानपद्धति कशी होती याची थोडी माहिती असणें इष्ट आहे. अॅथेन्सच्या नागरिकांचे दहा वर्ग केले होते. प्रत्येक वर्गास ' ट्राइब ' ( कुल ) म्हणत. प्रत्येक कुलांतील निवडून आलेले पन्नास सभासद असे एकंदर पांचशें सभासद सेनेटमध्यें असत. या निवडणुकीला विशेष नियम किंवा व्यक्तीची योग्यता वगैरे बंधनें नसत. केवळ चिठ्या टाकून ही निवड होई. हें सभासदत्व एक वर्षपर्यंत टिकें. नव्या वर्षी नवी निवडणूक होई. याप्रमाणें पांचशें सभासदांचें सेनेट असलें तरी रोजचें काम पाहण्याकरितां सेनेटनेंच नेमलेली एक ल्हानशी कार्यकारी समिति असे. या समितीला ' प्रिटनी ' म्हणत. या समितीचे पन्नास सभासद असून ते एकाच कुलांतील पन्नास असत. त्यामुळें सेनेटच्या सर्व सभासदांना या समितीवर एकदां काम करण्याची संधि मिळे. या समितीची मुदत पसतीस दिवसांची असे. पसतीस दिवसांनंतर दुसऱ्या एखाद्या कुलाचे सभासद येऊन कामाला सुरुवात होई. पांच आठवड्यांपैकीं प्रत्येक आठवड्यांत म्हणजे सात दिवसांत या पन्नास सभासदांपैकीं दहा दहा सभासदांनीं सेनेटच्या अध्यक्षाचें काम करावयाचें असा नियम होता. ही दहाजणांची अध्यक्षाला मदत करणारी एक पोट-समितिच होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. या दहा सभासदांनीं लोकसभेपुढें येणारीं विधायकें, सूचना, प्रश्न नियमांनुसार आहेत किंवा नाहींत हें ठरवावयाचें असे. या दहा सभासदांपैकींच एकेक पाळीपाळीनें सेनेटचा व लोकसभेचा एक दिवस अध्यक्ष असे. त्याचा हा अधिकार फक्त एकच दिवस चालावयाचा. या अध्यक्षाला ' एपिस्टेटीस ' म्हणत. या दहाजणांच्या समितीला ' प्रोइड्री ' असें नांव असे. ' एपिस्टेटीस 'चें काम लोकसभेपुढें नियमांना धरून असलेले प्रश्न ठेवण्याचें होतें. ही त्यांच्या अधिकारांतील बाब होती. हा अधिकारी इंग्लंडच्या ' हाउस ऑफ कॉमन्स 'च्या ' स्पीकर 'सारखा होता असें म्हणतां येईल. वर आलेल्या दुर्दैवी दहा आरमारी-अधिकाऱ्यांच्या खटल्याशीं सॉक्रेटिसाचा आलेला संबंध समजण्यास ही अॅथेनिअन सेनेटची माहिती असणें अवश्य आहे.

वरील सेनानींचा प्रश्न लोकसभेपुढें यावयाचा त्या दिवशीं सॉक्रेटिसाची अध्यक्ष होण्याची पाळी होती. दहाहि आरोपींचा न्याय सर्वांचा एक सामुदायिक

खटला समजून एकदम द्यावा ही सेनेटची सूचना कायद्याला सोडून होती. त्यामुळें आरोपींवर हा अन्याय होणार होता. जनता आरोपींवर खवळून गेली होती. ' प्रोइड्री ' च्या दहा सभासदांपैकीं कांहींनीं हा बेकायदेशीरपणा जनतेच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना धमक्या देऊन लोकांनीं खालीं बसविलें.

या दिवशीं सॉक्रेटीस अध्यक्ष होता. त्यानें लोकांच्या धमकावणीला दाद दिली नाहीं. असनदशीर प्रश्न लोकसभेपुढें म्हणजेच जनतेपुढें[१] मांडणें त्यानें साफ नाकारलें. ही गोष्ट त्याच्या अधिकारांतली होती. लोकांनीं त्याला अधिकारावरून पदच्युत करण्याची, अटक करण्याची, कारागृहाची किंबहुना ठार मारण्याची धमकी दिली, पण त्याचा काडीमात्र उपयोग झाला नाहीं. पुढें सॉक्रेटिसावर झालेल्या खटल्याची हकीगत येणार आहे. तो खटला चालला असतांना त्यानें आपल्या बचावार्थ भाषण केलें. त्यांत तो एके ठिकाणीं म्हणतो, " ॲथेन्समध्यें किंवा दुसऱ्या कोणत्याहि शहरांत असा माणूस सांपडणार नाहीं कीं जो तेथील नागरिकांच्या अन्यायाच्या बेकायदेशीर कृत्याला दृढ निश्चयानें विरोध करून व त्याला आळा घालण्याचा प्रयत्न करून फार दिवस जिवंत राहील. अल्प काळ तरी जिवंत राहून ज्याला खरोखर न्यायाकरितां झगडावयाचें असेल त्यानें तें काम आपल्या खोलीच्या चार भिंतींच्या आंतच बसून केलें पाहिजे; तें समाजांत करून चालणार नाहीं. तर मग, नागरिकांनो, माझ्या बाबतींत काय झालें तें ऐका म्हणजे मरणाचा धाक दाखवून अन्यायाच्या कृत्याला माझें मत अनुकूल करून घेईल असा एकहि इसम नाहीं असें तुम्हांला दिसून येईल. अशा कृत्याला अनुकूल होण्यापेक्षां मी एकदम प्राणत्याग करीन. अधिकाराची अशी जागा मला एकदांच सेनेटर या नात्यानें मिळाली होती. त्या वेळीं आपण मला या दहा सेनानींच्या आरोपाची चौकशी करण्यास सांगितलें होतें. त्या वेळीं सर्व अध्यक्षांपैकीं मीं एकट्यानेंच आपल्या बेकायदेशीर कृत्याला विरोध करून विरुद्ध मत दिलें होतें. लोकसभेचे अध्यक्ष मला अटकेंत ठेवण्यास किंवा तात्पुरती अधिकारबंदी घालण्यास तयार झाले होते, तुम्ही माझ्याविरुद्ध ओरड करून मला हार खाण्यास सुचवीत

---

१. ॲथेन्सच्या लोकसभेचे ( Assembly ) सर्व नागरिक सभासद असत.

होतां, पण मला असें वाटलें कीं कारागृहवास किंवा मृत्यु यांच्या धाकानें तुमच्या अन्याय्य सूचनेला अनुकूल होण्यापेक्षां कायदा व न्याय यांच्याकरितां या आपत्तींना तोंड देणें हेंच माझें कर्तव्य होय."[१] पण सॉक्रेटिसाचा हा शिराळशेटी अधिकार कायद्याप्रमाणें एकाच दिवसापुरता होता. त्या दिवसाची सभा स्थगित होऊन दुसऱ्या दिवशीं मवाळ अध्यक्ष आल्यावर सेनेटची सूचना संमत झाली व त्या अनपराधी दहा सेनानींना देहान्त शिक्षा मिळून तिची तत्काळ अंमलबजावणीहि झाली.

ह्यानंतर दोन वर्षांनींच सॉक्रेटिसाच्या न्यायप्रियतेच्या कसोटीचा पुन्हां प्रसंग आला. खि. पू. ४०४ मध्यें लॅसिडिमोनिअन सैन्यानें ॲथेन्सचा पूर्ण पाडाव करून त्या शहराची तटबंदीसुद्धां खणून काढली. तेथील लोकसत्ताक नष्ट होऊन स्पार्टन लोकांनीं लिसँडर व क्रिटिॲस यांच्या मदतीनें तीस सरदारी अधिकाऱ्यांचा कारभार सुरू केला. क्रिटिॲस हा त्या काळचा ॲथेन्समधील एक राजकारणी पण देशद्रोही पुरुष होता. तो सॉक्रेटिसाचा शिष्य होता व आपल्या गुरूच्या बैठकींत मधून मधून हजर असे. पेलोपोनिशिअन

१. "There is no man who will preserve his life for long, either in Athens or elsewhere, if he firmly opposes the wishes of the people, and tries to prevent the commission of much injustice & illegality in the State. He, who would really fight for justice, must do so as a private man, not in public, if he means to preserve his life, even for a short time....... Listen then, citizens, to what has happened to me, that you may know that there is no man who would make me consent to do wrong for the fear of death; but that I would perish at once rather than give way......On that occasion I alone of all the Presidents opposed your illegal action, and gave my vote against you. The speakers were ready to suspend me and arrest me; and you were clamouring against me, and crying out to me to submit. But I thought that I ought to face the danger out in the cause of law and justice, rather than join with you in your unjust proposal, from fear of imprisonment or death." **Plato—**"The Apology"

युद्धाच्या शेवटीं कांहीं राजद्रोही नागरिकांबरोबर हा हद्दपार झाला होता. पण स्पार्टन लोकांनीं अँथेन्स जिंकल्यानंतर तो परत आला. त्याचें स्पार्टन अधिकाऱ्यांना सहाय्य झालें होतें. त्याचा फायदा मिळून त्याची तीस सरदारी अधिकाऱ्यांमध्यें नेमणूक झाली. या तीसजणांच्या 'बारभाई'ला या देशद्रोह्याची पुष्कळ मदत झाली. पण हा कारभार पुरता वर्षभरहि न टिकतां खि. पू. ४०३ मध्यें अँथेन्समध्यें लोकसत्ता पुन्हां स्थापन झाली. क्रिटिअॅस व त्याचे साथीदार यांची ही कारकीर्द "दहशतीचें राज्य" (Reign of Terror) या नांवानें प्रसिद्ध आहे. या अमदानींत राजकारणी विरोधक व खासगी वैयक्तिक शत्रु यांचे खून पाडण्याचा दंडकच पडला होता. ही जणूं कांहीं नित्यक्रमाची व्यवहारांतील अंगवळणीं पडलेली बाब होती. या क्रूर कृत्याकरितां सर्व वर्गांतील नागरिकांची मारेकरी म्हणून योजना होत असे. एकदां अशाच दुष्ट हेतूनें पांच नागरिकांना अधिकाऱ्यांच्या कचेरींत बोलावण्यांत आलें. त्यापैकीं सॉक्रेटीस एक होता. नेहमींच्या रिवाजाप्रमाणें या निमंत्रित नागरिकांबरोबर जेवणखाण वगैरे झाल्यानंतर अधिकाऱ्यांनीं संभाषणांत सहज ओघानें सॅलॅमिस येथील लिऑन नांवाच्या नागरिकाची गोष्ट काढून त्यांना त्याला थापा देऊन भुलवून अँथेन्समध्यें आणण्याची कामगिरी सांगितली. लिऑनला जगांतून नाहींसा करण्याचें ठरलें होतें. अधिकाऱ्यांच्या आज्ञेचा भंग म्हणजे मरणच. पांचांपैकीं चौघेजण आज्ञाभंग करण्यास धजले नाहींत. सॅलॅमिस येथें जाऊन ते लिऑनला घेऊन आले. एकटा सॉक्रेटीस मात्र भावी परिणामाची भीति न बाळगतां आज्ञा अमान्य करून सरळ परत घरीं गेला. या आज्ञाभंगापूर्वींच त्यानें क्रिटिअॅस व त्याचे साथीदार यांची अवकृपा ओढवून घेतली होती. त्यानें त्यांची ही खुनी कारकीर्द निंदास्पद ठरवून तिचा अत्यंत प्रखर शब्दांनीं निषेध केला होता. त्यामुळें चिडून जाऊन अधिकारी वर्गानें त्याला अँथेन्समधील तरुणांशीं संभाषण करण्याची बंदी केली होती; नाहीं तर तुला मरण पत्करावें लागेल असा धाकहि घातला होता. लिऑनसंबंधीं केलेल्या आज्ञाभंगाची हकीगत लोकसभेपुढें सांगतांना सॉक्रेटीस म्हणाला, "सॅलॅमिस येथील लिऑनला ठार करतां यावें या हेतूनें अधिकाऱ्यांनीं आम्हां पांचजणांना त्याला आणण्याविषयीं आज्ञा केली. होईल तेवढ्या लोकांना अपराधी ठरविण्याच्या हेतूनें आमच्यासारख्या इतर पुष्कळ नागरिकांना असे हुकूम

(225...)

सोडण्याचा या अधिकाऱ्यांचा परिपाठच होता. पण मी केवळ शब्दांनीं नव्हे तर कृतीनें असें दाखवून दिलें कीं मी मरणाला काडीचीहि किंमत देत नाहीं, परमेश्वरी किंवा मानवी नियमांचें उल्लंघन न करण्याला फार महत्त्व देतों. राज्याधिकारी आपली सर्व शक्ति एकवटून कोणत्याहि दहशतीनें माझ्या हातून अन्यायाचें कृत्य घडवूं शकले नाहींत...ही तीस अधिकाऱ्यांची 'बारभाई' जर पुढें लवकरच उलथून पडली नसती तर फार करून त्यांनीं माझा बळी घेतला असता."[१]

प्लेटोनें आपल्या 'सिंपोझिअम' मध्यें ॲलिसब्रायडीजच्या मुखानें सॉक्रेटीस युद्धभूमीवर शिपाईगिरी करीत असतांना दृष्टीस पडलेल्या त्याच्या स्वभाव-विशेषांचें उत्कृष्ट शब्दचित्र रेखाटलें आहे. तें असें — "पॉटिडिआचा वेढा पडला असतांना आम्ही सर्व शिपाई लष्करी भटारखान्यांत जेवण्यास जात असूं. त्या वेळीं संकटाच्या प्रसंगीं हालअपेष्टा सहन करण्यांत सॉक्रेटिसाच्या पुढें आम्हांला हार खावी लागे. वेढ्यांत केव्हां केव्हां अन्नसांठा अपुरा पडे. अशा वेळीं भूक सहन करण्यांत तो आमच्या सर्वांच्या पुढें असे. अन्नपुरवठा भरपूर आला म्हणजे खाद्यपदार्थांवर ताव मारण्यांतहि तो आम्हांला तितकाच मार्गें टाकी. मद्यपान मोठ्या प्रेमानें असें तो कधींच करीत नसे, पण आग्रह करून त्याला तें करण्यास बसविलेंच तर त्यांतहि आम्हांला त्याचा हात धरतां येत नसे, आणि आश्चर्य हें कीं इतकें असून मद्यपान त्याच्या अंगावर आलेलें

---

१. "The Thirty ordered us to bring over Lion the Salamisian from Salamis, that they might put him to death. They were in the habit of frequently giving orders to many others, wishing to implicate as many men as possible in their crimes. But then I again proved, not by mere words, but by my actions, that I do not care a straw for death; but that I do care very much indeed about not doing anything against the laws of God or man. The Government with all its power did not terrify me into doing anything wrong......If the rule of the Thirty had not been destroyed soon afterwards, I should very likely have been put to death."

**Plato**—"The Apology"

केव्हांहि दिसलें नाहीं. पॉटिडिआची थंडी अति कडक. सतत होणाऱ्या बर्फाच्या वृष्टीमुळें शरीर गोठून जातें कीं काय असें आम्हांस वाटावें. अशा वेळीं आम्ही अंगभर लोंकरीचे जाड कपडे घालून, पायांभोंवतीं वरून खालून केंसाळ कांतडीं गुंडाळून तंबूच्या बाहेर तोंड न काढतां बिछान्यावर पडून राहात असूं. इकडे साक्रेटिसाची स्वारी मात्र रोजचा नेहमींचा एकच एक झगा अंगावर घालून पादत्राणें न घालतां अनवाणी पायांनीं बेगुमानपणें बर्फावरून चालत राही. इतर सैनिकांना पायांत सपाता घालूनसुद्धां इतक्या सहज रीतीनें चालतां येत नसें. त्यांना वाटावें कीं सॉक्रेटीस मुद्दाम आपली हेटाळणी करण्याकरितां असा चालतो. ह्या निधड्या छातीच्या सैनिकानें पॉटिडिआच्या वेढ्यांत दाखविलेला काटकपणा व सहनशीलता निःसंशय उल्लेखनीय आहेत. या वेढ्यांतील अशाच आणखी एका प्रसंगाचा या ठिकाणीं निर्देश करण्यासारखा आहे. सॉक्रेटिसाचें विचारप्रवण मन रणक्षेत्रावरहि स्वस्थ बसत नसें. फावेल त्या वेळीं त्याचें विचारचक्र चालू होऊन त्यांत तो तल्लीन होई. असाच एके प्रसंगीं तो पहाटेच विचाराची तंद्री लागून एका ठिकाणीं उभा असलेला आमच्या दृष्टीस पडला. मनांत उद्भवलेल्या प्रश्नाचा उलगडा न झाल्याकारणानें तो तसाच विचार करीत राहिला. सकाळचीं आपलीं कामें उरकून दुपारीं परत येणाऱ्या सैनिकांनीं त्याला त्याच ठिकाणीं त्याच अवस्थेंत विचारमग्न असलेला पाहिलें व ते आपापसांत म्हणाले, ' सॉक्रेटीस पहाटेपासून विचार करीत असाच एकसारखा उभा आहे. ' शेवटीं कांहीं आयोनिअन सैनिक त्या ठिकाणीं आले, व उन्हाळ्यामुळें जेवणें-खाणें लवकर झाल्यामुळें तेथेंच गारव्याला निजण्याकरितां आडवे झाले. त्यांनीं सॉक्रेटिसाला तसाच सकाळपर्यंत रात्रभर उभा असलेला पाहिलें. सकाळीं सूर्योदय झाला तेव्हां प्रार्थना करून त्यानें सूर्यनारायणाला नमस्कार केला व नंतर तो तेथून चालता झाला. "

ॲलिसबायडीज पुढें म्हणतो, " पण या सर्वांपेक्षां ४२४ सालीं डेलिअमच्या लढाईत थीबन सैन्याशीं लढतांना कच खाऊन आमचें सैन्य उध्वस्त होऊन पळ काढीत असतां सॉक्रेटिसाची एकंदर हालचाल डोळ्यांत भरण्यासारखी होती. त्या वेळीं मी घोडदळांत होतों. सॉक्रेटीस अंगावर अवजड चिलखत व शिरस्त्राण धारण करून पायदळाबरोबर चालला होता. आमची पलटण

पूर्णपणें उध्वस्त होऊन रानोमाळ पळ काढूं लागली. पण सॉक्रेटीस व लॅचिस धिम्मेपणानें शत्रूशीं लढत लढत माघार घेत होते. त्यांची व माझी अकस्मात् गांठ पडली. ‘दम टाकूं नका, निराश होऊं नका, मी तुम्हांला सोडून जाणार नाहीं’, असें सांगून त्यांना मीं धीर दिला. घोड्यावर असल्यामुळें मी स्वतःविषयीं बराच निर्धास्त होतों. पॉटिडिआच्या वेळ्यापेक्षां या आणी-बाणीच्या प्रसंगीं सॉक्रेटिसाच्या कर्तबगारीचें सरस दृश्य मला चांगलें पाहतां आलें. त्या वेळचें त्याचें प्रसंगावधान व धैर्य लॅचिसपेक्षां किती तरी अधिक होतें. ॲरिस्टॉफेन्स, तूं रंगभूमीवर त्याचें उठविलेलें दृश्य वरील सत्यसृष्टींतील दृश्यापेक्षां निराळें नव्हतें. आपले मित्र व शत्रु या उभयतांवर आपली अधि-कारयुक्त दृष्टि टाकीत त्यांच्याकडे शांतपणें पाहात पाहात तो असा कांहीं चालत होता कीं त्याच्याकडे लांबून पाहणाऱ्यास याच्यावर आपण हल्ला केल्यास त्याचा प्रतिकार झाल्यावांचून राहणार नाहीं असें वाटावें. सॉक्रेटीस व त्याचे बरोबरचे सैनिक सुरक्षितपणें बाहेर पडले. पाठ दाखवून पळ काढ-णाऱ्यांचा पाठलाग होऊन ते मृत्युमुखीं पडतात; पण सॉक्रेटिसाप्रमाणें जे धैर्य दाखवितात त्यांना हात लावण्याचीहि कोणाला छाती होत नाहीं.”

● ● ●

## ३. जीवनकार्याचा प्रारंभ : ईश्वरी संदेश

मागील प्रकरणांत आपण सॉक्रेटिसाची रणक्षेत्रावरील कामगिरी व त्या वेळीं दृष्टीस पडलेले त्याचे उत्कृष्ट स्वभावविशेष पाहिले. तथापि हें त्याच्या जीवनांतील एक गौण कार्य होतें. तो राजकारणांत पडला नाहीं किंवा त्यानें एखादी सरकारी नोकरी पतकरली नाहीं. नागरिकाचें एक कर्तव्य याच एका दृष्टीनें त्यानें सैनिकाचें काम पतकरलें होतें. त्याची प्रतिभा व विचारांतील स्वतंत्रपणा अशीं होतीं कीं त्याला ॲथेन्सच्या तत्कालीन राजवटींत राजकारणांत भाग घेणें किंवा एखादी अधिकाराची जागा स्वीकारणें अशक्य होतें. हें काम त्याच्या स्वतंत्र विचाराला मानवलें नसतें. लोकांना सुसंस्कृत करून त्यांना उत्तम नागरिक बनविण्याचें कार्य आपल्याला करणें शक्य आहे असें त्याच्या मनानें घेतलें. हें लोकशिक्षणाचें कार्य करण्याचा आपल्याला ' ईश्वरी संदेश ' मिळाला आहे असा त्याचा दृढ विश्वास होता. आपण परमेश्वराचे सेवक असून त्यानें हें कार्य करण्याचा आपल्याला आदेश दिला आहे असें तो म्हणे. सैनिकानें शत्रूला पाठ दाखवून समरभूमीवरून पळ काढण्याइतकेंच ह्या कार्यापासून परावृत्त होणें अधमपणाचें आहे असें त्याला वाटे. हें लोककार्य करतांना पुराणमतवादी नागरिकांच्या विरोधाला त्याला तितक्याच धैर्यानें तोंड द्यावें लागलें असें पुढें दिसून येईल.

प्राचीन ग्रीक लोकांच्या धार्मिक भावना, देवदेवतांवरील विश्वास, पारलौकिक विचार इत्यादि गोष्टी आपल्याप्रमाणेंच ( हिंदुजनतेप्रमाणेंच ) असत. देवाधिदेव परमेश्वराशिवाय इतर देवदेवतांचें अस्तित्व असून त्या मानवावर उपकार

करूं शकतात, तसेंच त्या त्याला अपकारहि करूं शकतात; विशिष्ट व्यक्तींवर त्यांचा अनुग्रह असतो, त्यांना भावी आपत्तींची पूर्वसूचना देऊन त्या त्यांचें रक्षण करतात, त्या नवसाला पावतात, त्यांना कौल लावल्यास त्या कौल देतात असा त्यांचा विश्वास असे. सॉक्रेटीस याला अपवाद नव्हता. व्यक्तीच्या पाठीराख्या देवाला ग्रीक लोक 'दीमन' ( Demon ) म्हणत. ही 'दीमन'ची कल्पना प्राचीन काळीं अनेक देशांत अस्तित्वांत होती. ग्रीक जनता 'दीमन' दोन प्रकारचे मानी. कांहीं मानवाला सन्मार्ग दाखविणारे, त्याचे हित करणारे; दुसरे कुमार्गाला प्रवृत्त करून व्यक्तीला नाशाप्रत पोंचविणारे. आपलाहि असाच एक सन्मार्गदर्शक दीमन आहे असें सॉक्रेटीस लोकसभेपुढें बचावाचें भाषण करतांना सांगतो. तो म्हणतो, "मी आपल्याच मताप्रमाणें खासगी रीतीनें समाजांत मतनिदर्शन करीत वावरत राहतों, लोकसभा वगैरे संस्थांच्या राजकारणांत भाग घेत नाहीं याचें तुम्हांला आश्चर्य वाटत असेल. पण याचें कारण मीं तुम्हांला पुष्कळ वेळां अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. हें कारण असें कीं माझ्यावर एका दीमनचा अनुग्रह आहे, तो माझें रक्षण करतो. अमूक एक गोष्ट कर असें तो मला स्पष्ट सांगत नाहीं, फक्त भावी संकटाची सूचना देतो. अशा वेळीं माझ्यांतील एक दैवी शक्ति जागृत होऊन आंतल्या आवाजानें मला मार्गदर्शन करते."[1] प्रख्यात इतिहासकार ग्रोट आपल्या 'ग्रीसच्या इतिहासां'त म्हणतो, "या दीमनच्या कथेमुळें लोक सॉक्रेटिसाला ढोंगी म्हणत, पण तो ढोंगी नव्हता, त्याचा दीमनवर खरोखरीच विश्वास असे."

सॉक्रेटिसाच्या ह्या 'आंतल्या आवाजा'चा उलगडा करण्याचा ग्रंथकारांनीं प्रयत्न केला आहे. खटला चालू असतांना वारंवार उल्लेखिलेल्या या दैवी सूचक चिन्हाविषयीं — आंतल्या आवाजाविषयीं — त्यांनीं निरनिराळ्या कल्पना चालविल्या आहेत. चर्च[2]च्या मतें हा आंतला आवाज सद्सद्विवेकबुद्धीचा नव्हता; कारण ही बुद्धि नैतिक दृष्टीनें कार्याकार्यता ठरविते, फायद्याच्या किंवा सोयीच्या

१. प्लेटो–"Apology".

२. 'The Trial and Death of Socrates'—( Golden Treasury Series ) Introduction by F. J. Church. ( Pages LXXVff )

किंवा गैरसोयीच्या दृष्टीनें ठरवीत नाहीं. सॉक्रेटिसाच्या ' आवाजां 'त नैतिक सूचना नसे. आंतल्या आवाजाच्या द्वारें मिळालेली परमेश्वरी सूचना डावलणें हें पाप आहे, अहितकारक आहे अशी सॉक्रेटिसाची भावना होती. दुसरें असें कीं सद्सद्विवेकबुद्धि कार्याचें इष्टत्व तसेंच अनिष्टत्वहि सुचविते. सॉक्रेटिसाची सूचना कार्याचें केवळ अनिष्टत्वच दर्शवून तें त्यानें करूं नये असें सुचवी. आणखी असेंहि म्हणतां येईल कीं सद्सद्विवेकबुद्धि ही मनुष्यमात्राची देणगी आहे. ती एकट्या सॉक्रेटिसालाच परमेश्वरानें दिली होती असें नाहीं. एम्. लेलू ( M. Le'lut ) आपल्या ' Du De'mon de Socrate ' या पुस्तकांत सॉक्रेटिसाच्या ' दिमान ' चा विचार करतांना त्याला ल्यूथर, रूसो, पॅस्काल वगैरेंच्या वर्गांत घालून " त्याला होणाऱ्या आभासांमुळें आंतला आवाज म्हणजे दीमनचे शब्द आपल्याला ऐकूं येतात असें त्याला विश्वासपूर्वक वाटे " असें लिहितो. जर्मन लेखक ट्सेलर (Zeller) आपल्या ' Socrates and the Socratic Schools ' या ग्रंथांत म्हणतो, " एखाद्या कृत्याच्या युक्ततेचें योग्य कारण तर देतां येत नाहीं, पण त्याच्या युक्ततेची स्वतःची जाणीव स्पष्टपणें दृग्गोचर होते हीच दैवी सूचना किंवा आंतला आवाज. बिनचूक तर्कशुद्ध विचाराची संवय वाढतां वाढतां शेवटीं अभ्यासानें विचाराच्या सांखळींतील इतर दुव्यांची जाणीव न राहतां शेवटला दुवा हा आंतला आवाज असा भास होऊं लागतो. " झेनोफॉन व प्लेटो यांचें ह्या प्रश्नाविषयींचें सर्व म्हणणें विचारांत घेऊन रिडेलनें पुढील मत व्यक्त केलें आहे. तो म्हणतो, " या दोघांनीं दिलेली माहिती एकमेकांशीं विरुद्ध आहे. झेनोफॉनच्या हकीगतीवरून त्याचें मत ट्सेलरशीं मिळतें आहे. प्रश्नसंबद्ध विषयाचें ज्ञान, अनुभवानें विचारशक्तीला मिळालेलें योग्य वळण व विचारसरणींतील प्रत्येक टप्प्याची जाणिव न राहतां कारणावरून कार्याचें क्षणमात्रांत अनुमान काढण्याची झालेली संवय यांच्या योगानें सॉक्रेटिसाची बुद्धि तल्लख झाल्यामुळें आंतल्या आवजाची कल्पना त्याच्या मनांत उत्पन्न झाली होती. पण प्लेटोचें म्हणणें विचारांत घेतां झेनोफॉनचें वरील स्पष्टीकरण यथार्थ वाटत नाहीं. सॉक्रेटिसाच्या शब्दाला फाटे फोडतां येत नाहींत. " डॉ. थॉम्सनच्या मतें हा आंतला आवाज ' दीमन ' चा नसून ग्रीक देवतांनीं दिलेली सूचना असावी. तथापि त्याला श्लॉअरमाखर ( Schleiermacher ) चें मत पटतेंसें दिसतें. तें मत

असें. मनुष्य अनेकदां एखाद्या कार्याचें नैतिक महत्त्व कार्यकारणाचा विचार मनांत न येता तत्काळ ठरवितो.[१] दुष्यंताच्या[२] म्हणण्याप्रमाणें ही एक अंतः-करणप्रवृत्ति असते. सॉक्रेटीस हें श्रेय व्यक्तीला देत नाहीं.

डेलफाय येथील ॲपॉलोच्या देवळांतील भाविणीनें "सॉक्रेटिसापेक्षां अधिक शहाणा माणूस कोणीहि नाहीं" असा कौल दिला होता. ती हकीगत पुढें येणार आहे. त्या कौलाचा सॉक्रेटिसाच्या मनावर विलक्षण परिणाम झाला होता.

डेलफाय येथें मिळालेला हा कौल सॅाक्रेटिसाच्या मनावर इतका परिणाम-कारक कसा झाला याचा विचार करण्यासारखा आहे व तो करतांना सॉक्रेटिसाचा एक स्वभावविशेष लक्षांत घेणें योग्य होईल. या पुरुषाची मनोरचनाच कांहीं विशेष होती. प्लेटो व झेनोफॉन यांनीं आपल्या ग्रंथांत असें नमूद केलें आहे कीं अगदीं बालपणापासून एक 'गूढ आवाज' किंवा 'आधिदैविक सूचना' ("Mysterious Voice"; "Supernatural Sign") सॉक्रेटिसाच्या जीवनांत दृष्टीस पडते. प्लेटोच्या म्हणण्याप्रमाणें हें दैवी सूचक चिन्ह अधून मधून दर्शन देऊन त्याला भावी संकटाची, कधीं कधीं तर अगदीं साध्या भावी गोष्टीची सूचना देऊन अमूक एक गोष्ट करूं नकोस असें सुचवी. 'या सूचनेप्रमाणें न वागल्यास त्याचा अनिष्ट परिणाम मला भोगावयास लागतो' असें सॉक्रेटीस अनुभवानें म्हणत असे. वर म्हटलेंच आहे कीं ही पूर्वसूचना सद्सद्विवेकबुद्धीची सांगी नव्हती. या सूचनेचा नीति-अनीतीशीं कांहीं संबंध नसे. सॉक्रेटीस भ्रामक कल्पनातरंगांत वावरणारा गृहस्थ असावा. तथापि सामान्यतः तो या कल्पनातरंगाच्या सर्वस्वीं आहारीं न जातां कल्पनेचा ओघ विचारानें आपल्या ताब्यांत ठेवी. कल्पनेच्या राज्यांत वावरणाऱ्या लोकांत एक विशेष दिसून येतो व तो सॉक्रेटिसांतहि पाहावयास सांपडतो असें प्लेटोचें म्हणणें आहे. तो विशेष हा कीं अशीं माणसें कल्पनातरंगांत पोहत असतांना

१. Butler's "Lectures on the History of Ancient Philosophy" — Edited by Dr. Thompson.

२. सतां हि संदेहपदेषु वस्तुषु। प्रमाणमन्तः करणप्रवृत्तयः। (अभिज्ञान शाकुंतलम् – १. २२)

देहभान विसरतात. पॉटिडिआच्या वेढ्याच्या प्रसंगीं लष्करी कामगिरी बजा-वीत असतांना एक दिवसरात्र चोवीस तास विचारमग्न होऊन भान विसर-ल्याची सॉक्रेटिसाची हकीगत यापूर्वी आलीच आहे. ही वस्तुस्थिति त्याची मनःप्रवृत्ति आध्यात्मिक गूढाकडे असल्याचें दाखविते. त्याची ही प्रवृत्ति अशीच वाढत जाऊन प्रबल झाली असती, पण त्याचा विचारक्रियेंत तर्कशुद्ध-पणाचा आग्रह व कांहींसा विनोदी स्वभाव यांमुळें ही वाढ होऊं शकली नाहीं.

प्लेटोच्या 'अॅपॉलॉजी'तील सॉक्रेटिसाच्या लोकसभेंत केलेल्या भाषणांत 'सॉक्रेटिसापेक्षां अधिक शहाणा माणूस एकहि नाहीं' असा डेलफाय येथें मिळालेल्या कौलाचा उल्लेख मागें आला आहे. हा इतिहास मनोरंजक आहे.

प्राचीन काळीं ग्रीस देशांतील पार्नेसस पर्वत अॅपॉलो देवाचें आवडतें वसतिस्थान मानीत. या पर्वताच्या दक्षिणेला उतरणीच्या मध्यावर वसलेल्या डेलफाय नांवाच्या एका गांवांत अॅपॉलोचें एक देवालय होतें. या ठिकाणीं देवाची पूजा-अर्चा करून एक भावीण राहात असे. आपल्याकडे देवाला सुपारी किंवा फूल लावून प्रश्न विचारतात त्याप्रमाणें या अॅपॉलोला कौल लावून प्रश्न विचा-रण्याची ग्रीक लोकांत प्रथा होती. देवाला कौल लावण्याकरितां राजापासून रंका-पर्यंत अनेक लोक तेथें येत. एखादें युद्ध होण्याचा प्रसंग आला म्हणजे दोन्ही पक्षांनीं जय कोणाला येईल असा प्रश्न केव्हां केव्हां देवाला विचारावा. कौल लावल्यानंतर कांहीं वेळानें तेथील भाविणीच्या अंगांत येऊन विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर म्हणून तिच्या मुखावाटे कांहीं शब्द बाहेर पडत, व त्या शब्दांनाच देवानें दिलेला कौल असे लोक मानीत. भाविणीच्या मुखांतून बाहेर पडणारे शब्द फारकरून संदिग्ध असत व उत्तराचा अर्थ प्रश्न विचारणाऱ्यास हवा तसा घेतां येई. सॉक्रेटिसाचा विद्यार्थी शिरेफॉन यानें एकदां "सॉक्रेटिसापेक्षां अधिक शहाणा कोणी आहे काय?" असा देवाला प्रश्न विचारला तेव्हां, "हयात असलेल्या नागरिकांत सॉक्रेटिसापेक्षां अधिक शहाणा एकहि नाहीं" असा कौल मिळाला. ही डेलफायच्या देवळांतील कौलाची कथा ऐतिहासिक सत्य असली पाहिजे. प्लेटोनें 'अॅपॉलॉजी'त ही हकीगत सविस्तर दिली आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणें पेलेपोनिशिअन युद्धाच्या पूर्वी सॉक्रेटिसाच्या वयाच्या चाळिसाव्या वर्षी शिरेफॉननें हा प्रश्न विचारला होता.

'ॲपॉलॉजी 'त लोकसभेपुढें भाषण करीत असतांना सॉक्रेटिसानें या प्रश्नाचा पुढीलप्रमाणें उल्लेख केला आहे. तो म्हणाला, "मला लोक सर्वांत शहाणा म्हणतात. कांहीं विवक्षित प्रकारचा शहाणपणा मिळविल्यामुळें मला हा मान मिळाला हें खरें आहे. मला शहाणा कोण म्हणतो असें विचाराल तर डेल्फाय येथील देवाचें नांव मी घेईन. त्यानें मी शहाणा असा कौल दिला. माझा मित्र शिरेफॉन तुम्हांला माहीत आहे. त्याला 'तिसांच्या बारभाई 'त हद्दपार व्हावें लागलें. या हद्दपारींत एकदां डेल्फाय येथें गेला असतांना त्यानें तेथील देवाला कौल लावून विचारलें, 'सॉक्रेटिसापेक्षां अधिक शहाणा माणूस कोणी आहे का ?' तेथील भाविणीनें उत्तर दिलें, 'असा एकहि माणूस नाहीं.' शिरेफॉन आज हयात नाहीं, पण त्याचा भाऊ या म्हणण्याची साक्ष देईल. मित्रहो, तुम्ही कदाचित् मला विचाराल कीं, 'सॉक्रेटीस या कौलामुळें जनतेचा तूं इतका नावडता कां व्हावेंस हें समजत नाहीं.' आपला प्रश्न बरोबर आहे. पण मला त्याचें उत्तर देतां येईल. देवानें माझ्याविषयीं असा कौल कां द्यावा याचा शोध घेण्याची मला इच्छा झाली. विविध प्रकारचे प्रश्न मी भेटेल त्याला विचारूं लागलों. शेवटीं मला असें आढळून आलें कीं या प्रश्नांविषयीं माझ्याइतकेंच ह्या लोकांचें अज्ञान आहे. त्यांच्याप्रमाणेंच मी अज्ञानी आहें. फरक येवढाच कीं मला काय माहीत नाहीं हें मला समजतें, माझ्या अज्ञानाची मला जाणीव आहे, इतरांना त्यांच्या अज्ञानाची जाणीव नाहीं. येवढयानेंच मी अधिक शहाणा ठरलों, माझ्या अज्ञानाच्या ज्ञानानें मी श्रेष्ठ ठरलों." सॉक्रेटीस पुढें म्हणतो, "पण मित्रहो, खरें पुसाल तर देवच एकटा खरा ज्ञानी. त्याच्या कौलाचा अर्थ येवढाच कीं मानवी ज्ञानाला यत्किंचितहि किंमत नाहीं. हें ज्ञान नेहमीं अपूर्णच. सॉक्रेटीस ज्ञानी असें देवाला म्हणावयाचें नव्हतें. माझ्याद्वारें त्याला लोकांना त्यांचें अज्ञान पटवून द्यावयाचें होतें. ह्या कार्याचा मला देवाकडून संदेश मिळाला होता. ह्या कार्यांत सर्वस्वीं गुंतल्यामुळें मला नागरिकांच्या सामाजिक कार्यांत किंवा राजकारणांत भाग घेतां आला नाहीं. ह्या कार्यानेंच मला असें अठराविश्वे दारिद्र्यांत ठेविलें आहे."

'ॲपॉलॉजी 'तील प्लेटोनें दिलेल्या वरील भाषणावरून सॉक्रेटिसाला देवाचा कौल मिळाला होता याविषयीं शंका घेण्याचें कारण नाहीं. अर्थात्

वरील भाषण प्लेटोनें आपल्या शब्दांत लिहिलें आहे, पण त्यानें केवळ कवि-कल्पना केलेली नाहीं. तो सॉक्रेटिसाच्या सहवासांत नेहमीं असे. प्लेटोप्रमाणें झेनोफॉननेंहि आपल्या ग्रंथांत डेलफाय येथील कौलाचा उल्लेख केला आहे. प्लेटोप्रमाणें झेनोफॉन प्रतिभासंपन्न लेखक नव्हता, तथापि घडलेल्या गोष्टींची प्रामाणिकपणें नोंद करण्याचें काम त्यानें केलें. यामुळें त्याचें लिखाण विश्वसनीय आहे. सॉक्रेटिसाचा हा बॉस्वेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. सॉक्रेटिसाविषयीं देवाचा असा कौल मिळाला होता हें खरें पण याविषयीं रिडेलचें म्हणणें असें कीं सॉक्रेटिसाला त्या कौलाचा खरेपणा पाहावयाचा नव्हता, किंवा त्याला देवाचें उत्तर कसोटीला लावायचें नव्हतें. लोकांच्या ज्ञानाची परीक्षा करण्याचें अंगीकृत कार्य त्यानें निराळ्याच हेतूनें सुरू केलें होतें. ज्याला लोक ज्ञान म्हणतात त्याचा त्यांना पोकळपणा दाखवून त्याच्या-ऐवजीं खऱ्या शास्त्रशुद्ध ज्ञानाचा पाया घालण्याच्या मुख्य हेतूनें तो या कार्याला प्रेरित झाला होता. त्यानें हा हेतु सरळ बोलून दाखविला असता तर नाग-रिकांना तो पटला नसता; इतकेंच नव्हे, तर त्याच्यावर ते अधिक रुष्ट झाले असते. तथापि तो आपला मूळ हेतु स्पष्टपणें बोलून दाखविण्यास कचरत होता असें नाहीं. हें माझें देवाचें कार्य आहे, हा देवाचा संदेश आहे असें म्हटल्यानें नागरिकांच्या असंतोषाची धार थोडी बोथट करण्याचा त्याचा प्रयत्न होता येवढेंच. हें मात्र खरें कीं देवाची आज्ञा, देवाचा संदेश म्हणून हें कार्य आपण अंगीकारलें आहे असें तो मानी. तो म्हणतो, "कौल देऊन स्वप्नाच्या द्वारें, किंवा ईश्वरी संदेश प्रकट करण्याच्या इतर प्रत्येक मार्गानें देवानें मला ही आज्ञा केली आहे...हें कार्य मीं न केलें तर आज्ञाभंग होईल व मग माझ्या मनाची शांतता टिकणार नाहीं." स्वतःला शहाणे समजणाऱ्या लोकांचें अज्ञान उघडें केल्यानें जनतेंत उत्पन्न होणारीं अप्रीति व द्वेष यांना न जुमानतां त्यानें आपलें कार्य चिकाटीनें चालू ठेविलें याला कारण हाच ईश्वरी आदेशावरील विश्वास. डेलफायचा कौल सॉक्रेटिसाला कोणत्या वर्षी मिळाला हें सांगतां येत नाहीं. त्याचप्रमाणें जन-तेच्या अज्ञानाची खात्री होऊन त्यानें हें ज्ञानपरीक्षणाचें कार्य केव्हां सुरू केलें हेंहि नक्की ठरवितां येत नाहीं. खि. पू. ४२३ मध्यें ॲरिस्टॉफेन्सनें त्याचें आपल्या नाटकांत विडंबन केलें. या सालपूर्वी त्यानें आपल्या कार्यास प्रारंभ

केला असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. तो स्वतःचें परीक्षण ख्रि. पू. ४३२ सालीं पॉटिडिआच्या वेढ्यांत करूं लागल्याचा उल्लेख यापूर्वीं आलाच आहे.

डेलफायच्या भाविणीनें दिलेल्या कौलामुळें सॉक्रेटिसाच्या जीवनक्रमांत एक आध्यात्मिक क्रांति घडून आली, व पुढें त्याच्या दीमनवर असलेल्या विश्वासानें – दीमननें सूचित केलेल्या आंतल्या आवाजानें – तिची प्रगति झाली. सॉक्रेटिसाला तत्कालीन शास्त्रवेत्त्यांचें ज्ञान व त्यांचे सिद्धान्त अमान्य होते. तात्त्विक संशोधनाचीं त्यांचीं गृहीत तत्त्वें व त्यांची संशोधनपद्धति त्याला अशुद्ध व चुकीचीं वाटत, व त्यामुळें त्याचा शास्त्रज्ञ विद्वानांशीं नेहमीं विरोध असे. तथापि ह्या विद्वद्वर्गांत त्याला मानाचें स्थान मिळालें होतें. जनता अज्ञानांत आहे, चुकत आहे, तिला मार्गदर्शन करून ज्ञान प्राप्त करून दिलें पाहिजे असें त्याला प्रथमपासूनच वाटे. पण डेलफायचा कौल मिळण्यापूर्वी लोकांना त्यांचें अज्ञान पटवून देऊन आत्मोन्नतीच्या मार्गाला लावण्याच्या त्याच्या कार्याला चालना मिळाली नव्हती. ती डेलफायच्या कौलानें त्याच्यांत आत्मविश्वास उत्पन्न होऊन मिळाली.

पॉटिडिआच्या वेढ्याच्या कामगिरीवरून परत आल्यानंतर ख्रि. पू. ४३१–४३० मध्यें सॉक्रेटिसानें जनतेच्या ज्ञानाचा कस पाहण्यास सुरुवात केली असें प्लेटो आपल्या ‘ कार्मायडीज् ’ नामक संवादांत म्हणतो. ‘ ॲपॉलॉजी ’ मध्यें प्लेटोनें डेलफायच्या कौलाचाच हा परिणाम असें नमूद केलें आहे. कौलांतील विधानाची सत्यता पाहण्याकरितां राजकारणी पुरुष, कवि, कलावंत, शिल्पकार वगैरे अनेक वर्गांतील नागरिकांशीं संभाषणद्वारां विविध विषयांवर सॉक्रेटिसानें चर्चा सुरू केली; व त्यामुळें शेवटीं कौलांतील गूढ विधानावर प्रकाश पडून त्याच्या दृष्टीनें ॲपॉलोच्या शब्दांचा उलगडा झाला व त्याच्या जीवन-कार्याला सुरुवात झाली. अनेक नागरिकांशीं चर्चा केल्यावर त्याला असें स्पष्ट दिसून आलें कीं आपला जीवनक्रम कसा असावा, आत्मोन्नति कशी करून घ्यावी, अधिकाधिक हित कसें साधावें यांसारख्या महत्त्वाच्या व आवश्यक प्रश्नांविषयीं जनतेंत गाढ अज्ञान वसत आहे, पण या अज्ञानाची लोकांना यत्किंचितहि जाणीव नाहीं. याला एकच अपवाद आहे व तो म्हणजे आपण स्वतः. आपणहि जनतेप्रमाणें अज्ञानांतच वावरत आहोंत. फरक इतकाच कीं

जनतेला या अज्ञानाची जाणीव नाहीं, आपल्याला ती आहे; व म्हणूनच आपल्यापेक्षां अधिक ज्ञानी कोणी नाहीं असा ॲपॉलोनें कौल दिला.

मागें सांगितल्याप्रमाणें भिन्न भिन्न वर्गांतील अनेक व्यक्तींशीं संभाषणें केल्यानंतर सॉक्रेटिसाला असें स्पष्ट दिसून आलें कीं लोकांत आपलें जीवन कसें आक्रमावें, उन्नति कशी करून घ्यावी, अधिकांत अधिक हित कसें साधावें इत्यादि महत्त्वाच्या प्रश्नांविषयीं पूर्ण अज्ञान वसत आहे. मनांत वावरत राहणारा हा विचार, ॲपॉलोचा मिळालेला कौल, व वर वर्णिलेली मनःप्रवृत्ति यांचा सॉक्रेटिसाच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. कोणत्याहि प्रश्नाचा शास्त्रशुद्ध रीतीनें, तर्कशुद्धतेनें विचार करण्यास लागणारी स्वतःची स्वतंत्र तात्त्विक पद्धति व तिच्यामागें असलेलीं गृहीत तत्त्वें यांवर त्याचा पूर्ण विश्वास होता. आपली विचारपद्धति तर्कशुद्ध, बिनचूक आहे. जनतेला या पद्धतीच्या मार्गानें जावयास लाविलें पाहिजे, तिला आपलें अज्ञान पटवून देणें अवश्य आहे, आपल्याला मिळालेला हा ईश्वरी संदेश आहे, हेंच आपलें जीवितकार्य आहे असें त्याच्या मनानें पूर्णपणें घेतलें. “ देवानें कौल देऊन, स्वप्नांत येऊन, ज्या ज्या मार्गानें मानवाला तो आपली इच्छा प्रकट करतो त्या त्या मार्गानें त्यानें मला हा संदेश पाठविला आहे ”, अशासारखीं बरींच विधानें ‘ ॲपॉलॉजी ’त आलीं आहेत. ही ईश्वरी संदेशाची भावना अधिक तीव्र होत गेली व म्हणूनच आपण शहाणे आहोंत असें वाटणाऱ्या नागरिकांच्या ज्ञानाचा फोलपणा दाखविण्यानें लोकांत उत्पन्न होणारा आपल्याविषयींचा द्वेष, अप्रियता व पुढें प्राणांवर आलेला प्रसंग यांना त्यानें भीक घातली नाहीं. सॉक्रेटीस नीतिशास्त्राचा संस्थापक कसा झाला याविषयींची प्लेटोनें आपल्या ‘ ॲपॉलॉजी ’मध्यें वरीलप्रमाणें मीमांसा केली आहे.

सॉक्रेटिसासारख्या शुद्ध तर्कावर भिस्त ठेवणाऱ्या तत्त्वज्ञाचा डेलफायच्या भाविणीच्या शब्दांवर विश्वास बसून त्याचा येवढा परिणाम व्हावा हें पाहून वाचकांना कदाचित् हंसूं येईल. पण कसेंहि असलें तरी हें सर्वमान्य सत्य आहे. मध्यम वयांत सॉक्रेटिसाच्या मनःस्थितींत अशा प्रकारें क्रांति घडून येत होती. आपण परमेश्वराचे संदेशवाहक आहोंत असें अंतःकरणापासून वाटून त्यानें आपल्या जीवित-कार्यास आतां आरंभ केला. यापूर्वी केलेल्या लष्करी

१ए०४५
अनुक्रमांक ... ५.



कामगिरीमुळें त्याच्या अंगीं मुरलेली कर्तव्यतत्परता व शिपाईगिरींतील आज्ञाधारकपणा हे गुण या अंगीकारलेल्या ईश्वरी कार्यांतहि तसेच दृष्टीस पडतात. हें कार्यहि त्यानें तितक्याच कर्तव्यदक्षतेनें व निष्ठेनें पार पाडलें.

याप्रमाणें ईश्वरी संदेशानें प्रेरित होऊन सॉक्रेटिसानें आपल्या जीवितकार्याचा आरंभ केला. भेटेल त्याच्याशीं तो संभाषण करूं लागला. ॲलिसबायडीज, गॉर्जिॲस, प्रोटॅगोरॅस या थोर पंडितांपासून सामान्य कामगारांपर्यंत सर्वजण त्याच्या कक्षेंत येत. सकाळच्या प्रहरीं शहरांतील राजरस्त्यांत, तालीमखान्यांत, बाजार भरावयाच्या वेळीं बाजारपेठेंत, जेथें जेथें नागरिक भेटण्याचा संभव असे तेथें तेथें कोठें ना कोठें तरी तो हटकून दिसावयाचा. अथेन्स शहर सोडून तो क्वचितच बाहेर जाई. " मी जिज्ञासु आहें, ज्ञान मिळविण्याचें मला वेड आहे. शहरांत राहण्यानें माझ्या नगरबांधवांपासून ज्ञानप्राप्ति होते. रानावनांतील वृक्षांपासून मला कांहींच शिकतां येणार नाहीं " असें त्याचें म्हणणें असे.

झेनोफॉननें सॉक्रेटिसाच्या संभाषणपद्धतीचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. तो म्हणतो, " सॉक्रेटीस फक्त मानवी प्रश्नांसंबंधीं संभाषणें करी. पावित्र्य म्हणजे काय, अपवित्र कशाला म्हणावें, ' वंदनीय ' किंवा ' गर्हणीय ' यांचा अर्थ काय, ' न्याय '—' अन्याय ' यांच्या व्याख्या कशा करावयाच्या अशा प्रकारचें संभाषणांतील विषय असत. एखाद्या गोष्टीचा नाद किंवा वेड, धैर्य, भित्रेपणा, सरकार, संस्थान, मुत्सद्दी, राज्यव्यवस्था वगैरे शब्दांचे अर्थ लोकांना त्याला स्पष्ट करून दाखवून त्याविषयींचें त्यांचें अज्ञान तो उघडकीस आणी. त्याच्या मतानें आपल्या मताप्रमाणें प्रश्नांचीं उत्तरें देणारा तो ज्ञाता, इतर गुलाम होण्यास लायक. "

याप्रमाणें लोकांची चांचणी घेत असतांना सॉक्रेटिसाला असें आढळून आलें कीं ॲथेनिअन नागरिकांत खऱ्या यथार्थ ज्ञानापेक्षां पोकळ ज्ञानाचा डौलच फार. कवींना स्वतःच्या कवितांचा अर्थ स्पष्ट करून सांगतां येत नाहीं, पण आपण कवि, आपण सर्वज्ञ अशी त्यांच्यांत व्यर्थ घमेंड दिसून येते. याचप्रमाणें शिल्पकार, गायनपटु, राजकारणी मुत्सद्दी वगैरे सर्व एका माळेचे मणी. या पोकळ ज्ञानामुळें खरे पंडित मागें पडले असें तो म्हणे.

नागरिकांचे केवळ व्यावहारिक दृष्टीचे, अर्धवट, अडाणी विचार व त्यावर आधारलेले आचार सॉक्रेटिसाला पसंत नव्हते. त्यांच्या अज्ञानाचें त्याला एकसारखें प्रत्यंतर येऊं लागल्यामुळें तो अधिकाधिक चिकाटीनें आपल्या उद्योगाला लागला, व आपल्या कार्याकरितां शेवटीं आपले प्राणहि खर्ची घालण्यास तो कचरला नाहीं.

लोकांना त्यांच्या अज्ञानाची जाणीव करून देण्याची सॉक्रेटिसाची विशिष्ट पद्धति असे. न्यायालयांत वकील फेरतपासणी ( Cross-examination ) घेतात तशी ही पद्धति होती. फेरतपासणीची पद्धति सॉक्रेटिसाच्या काळांत ॲथेन्सच्या न्यायालयांत चालू होती. सांपडेल त्या व्यक्तीशीं तो संभाषण करण्यास आरंभ करी. आपण स्वतः अज्ञानाचें पांघरूण घेऊन 'धैर्य', 'न्याय', 'पावित्र्य' असा एखादा शब्द प्रतिपक्षाच्या भाषणांत आला म्हणजे तो त्याचा कांटेकोर अर्थ काय म्हणून त्याला विचारी. तो त्याला त्या शब्दाची व्याख्याच करण्यास सांगे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मग त्यानें सांगितलेला अर्थ कसा चुकीचा आहे तें त्याला तो दाखवून देई. अशा रीतीनें आपल्या अर्थाची – व्याख्येची – अव्याप्ति, अतिव्याप्ति प्रतिपक्षाच्या ध्यानांत येई, व तो आपली चूक सुधारण्याचा पुनः पुनः प्रयत्न करी. पुन्हां सॉक्रेटिसानें त्याची चूक दाखवावी, पुन्हां त्यानें ती सुधारण्याचा प्रयत्न करावा. असें होतां होतां शेवटीं प्रतिपक्षाला आपलें अज्ञान कबूल करणें भाग पडे. स्वतः अज्ञानाचें पांघरूण घेऊन दुसऱ्याचें अज्ञान दाखविण्याच्या या पद्धतीला इंग्रजींत 'Socratic irony' असें नांव पडलें आहे.

झेनोफॉननें आपल्या ग्रंथांत सॉक्रेटिसाच्या या पद्धतीचें एक चांगलें उदाहरण दिलें आहे. युथिडीमस नांवाच्या एका नागरिकाला आपण राजकारणांत पडावें अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न होऊन लोकसभेच्या निवडणुकींत उमेदवार म्हणून उभें राहण्याची इच्छा झाली. त्यानें त्याप्रमाणें सॉक्रेटिसाला सांगितलें. हा लोकसभेच्या कामाला लायक नाहीं असें वाटून सॉक्रेटिसानें त्याला छेडण्यास सुरुवात केली. युथिडीमस महत्त्वाकांक्षी पण सालस, उदात्त स्वभावाचा होता. नागरिकांत न्यायाची चाड असावी असें त्याला वाटे. असत्य वचन, फसवणूक, चोरी, दुसऱ्याला दुखापत करणें, एखाद्याला गुलाम करून राबविणें वगैरे गोष्टी त्याला मान्य नव्हत्या. पण राजकारणी पुरुषाला केवळ नैतिक, उदात्त

विचार असून चालत नाहीं; त्याला खोल व व्यापक विचार करण्याची, एखाद्या प्रश्नाकडे चारी बाजूंनीं पाहण्याची शक्ति असावी लागते. तिच्या अभावीं तो मनुष्य राजकारणाला नालायक ठरतो. हें सत्य सॉक्रेटिसानें आपल्या मित्राला खालीं दिलेल्या संवादानें पटवून दिलें.

त्यांच्यामध्यें बोलण्याच्या ओघांत पुढील संभाषण झालें :—

**सॉक्रे.**—युथिडीमस, दुसऱ्याला दुखापत करणें, त्याला गुलाम म्हणून विकत घेणें, त्याच्याशीं लबाडीनें वागणें वगैरे गोष्टी तुमच्या मताप्रमाणें अन्यायाच्या खऱ्या; पण तुमच्या शत्रूशीं अशा तऱ्हेनें वागण्यांत अन्याय नाहीं ना ?

**युथिडीमस**—पण मित्राशीं किंवा आपल्या माणसाशीं तसें वागण्यांत अन्याय होतो ना ?

**सॉक्रे.**—समजा, एखाद्या मनुष्यानें आपल्या हट्टी मुलाला खोटें बोलून औषध घ्यावयास लाविलें किंवा सेनापतीनें खोटें बोलून आपल्या सैन्यास शत्रूशीं मोठ्या ईर्ष्येनें लढावयास लाविलें, तर तें कृत्य अन्यायाचें ठरेल का ? एखाद्याचा मित्र आत्महत्या करण्यास उद्युक्त झाला असल्यास त्याची फसवणूक करून विषाच्या प्याल्याऐवजीं दुसरें त्याच रंगाचें पेय देऊन त्यानें मित्राचा जीव वांचविला तर तो अन्याय का ?

**युथि.**—त्याला अन्याय म्हणतां येणार नाहीं. तर मग असें म्हणावें कीं मित्राला इजा व्हावी, त्याचें नुकसान व्हावें या हेतूनें त्याची फसवणूक केल्यास तें कृत्य अन्यायाचें होईल. पण, सॉक्रेटीस, खरें बोलावयाचें म्हणजे माझ्या या उत्तराच्या सत्यतेबद्दल मी साशंक आहें.

**सॉक्रे.**—बरें, तें असो. तुम्हांला दुसरा एक प्रश्न विचारतों. 'लोकसत्ताक' (Democracy) म्हणजे काय ? तुम्ही आतां निवडणुकीस उभे राहून राजकारण खेळणार, तेव्हां तुम्हांला या शब्दाचा अर्थ माहीत असणारच.

**युथि.**—'लोकसत्ताक' म्हणजे लोकांनीं, गरिबांनीं चालविलेलें राज्य.

**सॉक्रे.**—ठीक. पण तुम्ही गरीब–श्रीमंत कोणाला म्हणणार ?

**युथि.**—ज्यांची प्राप्ति अपुरी ते गरीब; ज्यांची जरुरीपेक्षां अधिक ते श्रीमंत.

**सॉक्रे.**—पण 'पुरेशी प्राप्ति' या शब्दांचा अर्थ सापेक्ष नाहीं का ? एखाद्या राजाला त्याची प्राप्ति अपुरी झाल्यास गरिबांत लेखावें लागेल, किंवा

ज्याच्या गरजा अति अल्प आहेत त्याची प्राप्ति फार थोडी असूनहि त्याची श्रीमंतांत गणना होईल.

यानंतर आत्मविश्वासानें उत्तरें देणारा युथिडीमस गोंधळून जातो, त्याची तिरपीट उडते, व शेवटीं 'तुम्हीं माझी अंगीकारावयाच्या कार्याला नालायकी मला पटवून दिली. मी यापुढें हा नाद सोडून देणेंच योग्य, मला लवमात्र ज्ञान नाहीं' असें म्हणून तो निघून गेला.

प्लेटोच्या 'युथिफ्रॉन' नामक संभाषणांत सॉक्रेटिसाच्या संभाषणपद्धतीचें असेंच एक उत्कृष्ट उदाहरण पाहावयास सांपडतें. सॉक्रेटिसावर अधार्मिकतेचा कांहीं नागरिक आरोप करतात. त्यासंबंधीं लोकसभेंत त्याच्यावर खटला होतो. 'धार्मिकता' (Piety) व 'अधार्मिकता' (Impiety) याविषयींचे जनतेचे विचार तर्कशुद्ध नाहींत असें त्याला न्यायाधिशांना दाखवावयाचें होतें. याविषयींचें हें संभाषण आहे. मुख्य न्यायाधिशासमोर फिर्यादींना आपली फिर्याद मांडावयाची होती. या अधिकाऱ्याच्या घरासमोर सॉक्रेटीस व युथिफ्रॉन यांची गांठ पडून संभाषण होतें असें प्लेटोनें दाखविलें आहे. या संभाषणाचा कांहीं भाग मुद्दाम खालीं दिला आहे.

**युथिफ्रॉन**—सॉक्रेटीस, या घरासमोर तुम्ही कां उभे? माझ्याप्रमाणें तुम्हांला येथें कांहीं फिर्याद मांडावयाची नसणार.

**सॉक्रेटीस**—मला फिर्याद द्यावयाची नाहीं. माझ्यावर फिर्याद व्हावयाची आहे.

**युथि.**—काय, तुमच्यावर फिर्याद! ती कोण करणार?

**सॉक्रे.**—मिलिटस म्हणून कोणी गृहस्थ आहे. तुम्हांला त्याची माहिती आहे का?

**युथि.**—मला त्याची कांहींच माहिती नाहीं. पण त्याचा आरोप तरी काय आहे?

**सॉक्रे.**—आरोप विचारतां? आरोप कांहीं लहानसहान नाहीं. त्याचें म्हणणें कीं मी तरुणांना बिघडवितों.

**युथि.**—तें कसें?

**सॉक्रे.**—तो म्हणतो मी नसते नवीन देव निर्माण करतों; माझा जुन्या देवांवर विश्वास नाहीं.

**युथि.**—आतां मी समजलों. सॉक्रेटीस, तुम्ही मला दैवी सूचना मिळते असें म्हणतां हेंच त्याच्या या आरोपाचें कारण. तुम्ही अशा रीतीनें नवीन गोष्टी आपल्या धर्मांत घुसडवितां असें त्याचें म्हणणें.

**सॉक्रे.**—तें असो. पण, काय हो युथिफ्रॉन, तुम्ही या ठिकाणीं कसे ? तुम्ही आरोपी म्हणून का फिर्यादी म्हणून येथें आलां आहांत ?

**युथि.**—मी फिर्यादी आहें.

**सॉक्रे.**—तुमची फिर्याद कोणावर आहे ?

**युथि.**—माझ्या वडिलांच्यावरच माझी फिर्याद.

**सॉक्रे.**—तुमचे वडील तर सभ्य गृहस्थ आहेत. तुमचा त्यांच्यावर आरोप तरी काय आहे ?

**युथि.**—आरोप खुनाचा.

**सॉक्रे.**—हाय रे दैवा ! खुनाचा आरोप ? खून झालेला माणूस तुमचा नातेवाईक होता कीं काय ? तसें कांहीं असल्याशिवाय तुम्ही फिर्याद करण्यापर्यंत गेलां नसतां.

**युथि.**—सॉक्रेटीस, मला तुमचा मोठा चमत्कार वाटतो. अशा वेळेस नातेवाईक किंवा तिऱ्हाईत हा विचार कशाला हवा ? हें खुनाचें कृत्य न्यायाचें किंवा अन्यायाचें आहे येवढाच विचार महत्त्वाचा. माझ्या वडिलांच्या बाबतींत खून झालेला मनुष्य आमच्या आश्रयावर राहणारा एक गरीब, शेतावर काम करणारा मजूर होता. दारूच्या अंमलांत त्यानें एका गुलामाला ठार मारलें. माझ्या वडिलांनीं त्या मजुराचे हातपाय बांधून त्याला एका खड्डयांत टाकून दिलें व त्याचें पुढें काय करावें म्हणून प्रश्न विचारण्याकरितां भविष्यवाद्याकडे त्यांनीं एक माणूस पाठविला. इकडे खुनी म्हणून त्यांनीं त्या मजुराची हेळसांड केली व तो बिचारा मरण पावला. वडिलांच्या हातून असा अन्यायानें खून झाला याची मला चीड येऊन मी वडिलांच्या वर फिर्याद करण्यास तयार झालों आहे. येवढ्याकरितां माझ्या घरच्या मंडळींचा माझ्यावर राग ! बापाच्या विरुद्ध फिर्याद करणार म्हणून मला ही मंडळी अधार्मिक म्हणतात. सॉक्रेटीस, हें तर त्यांचें धार्मिकता व अधार्मिकता यांचें ज्ञान !

**सॉक्रे.**—युथिफ्रॉन, आपल्या वडिलांवर फिर्याद करण्यांत तुम्हांला

अधार्मिक किंवा अपवित्र असें कांहीं दिसत नाहीं, त्याअर्थी तुम्हांला धार्मिक व अधार्मिक म्हणजे काय तें पूर्णपणें माहीत असलें पाहिजे.

**युथि.**—या शब्दांचा अर्थ न समजण्याइतका जर मी अडाणी राहिलों असेन तर मला कुचकामाचाच म्हटलें पाहिजे. मग माझ्यांत आणि इतर सामान्य माणसांत फरक काय राहिला ?

**सॉक्रे.**—तर मग, युथिफ्रॉन, मी तुमचाच शिष्य होतों म्हणजे या शब्दांचें मला ज्ञान होऊन मिलिटसनें माझ्यावर मी अधार्मिक असा आरोप केला आहे त्याचें न्यायासनासमोर निराकरण करतां येईल. युथिफ्रॉन, तर मग आतां धार्मिक, अधार्मिक या शब्दांचा मला अर्थ समजावून सांगा. वडिलांवर तुम्ही करीत असलेल्या फिर्यादीचें उदाहरण घेऊनच सांगा ना.

**युथि.**—सांगतों, ऐका. खून करणें, पवित्र वस्तूंचा विध्वंस करणें, अन्याय करणें अशा कृत्यांबद्दल मागेंपुढें न पाहतां, कृत्य करणारा आई, बाप कोणीहि असो, त्याचा विचार न करतां त्याला न्यायासनासमोर खेंचणें हें धार्मिक कृत्य, व त्याला मोकळें सोडणें हें अधार्मिक कृत्य. ह्याचें मी एक उदाहरण सांगतों. सर्व देवांत आपण झ्यूस अत्यंत न्यायी, थोर असें म्हणतों. तो देवाधिपति, देवांचा राजा. त्यानें आपल्या बापाला, क्रोनॉसला, तो आपली अपत्यें स्वतः खाऊन टाकतो म्हणून शृंखलांनीं बद्ध करून बंदिवान केलें. ही प्रत्यक्ष कथा माहीत असतांना हे शहाणे नागरिक मला अधार्मिक म्हणतात.. त्यांचा झ्यूसच्या कृत्याविषयीं एक न्याय, माझ्याविषयीं दुसरा.

**सॉक्रे.**—तें असो. पण माझा प्रश्न राहिलाच. धार्मिक, पवित्र कृत्य कोणतें तें तुम्हीं मला सांगितलें नाहीं. तुम्ही आपल्या वडिलांवर फिर्याद करतां ही धार्मिक गोष्ट असें तुम्ही म्हणतां.

**युथि.**—हो, अगदीं असेंच.

**सॉक्रे.**—आणखी दुसरींहि अनेक कृत्यें पवित्र असतात ना ?

**युथि.**—अर्थात्.

**सॉक्रे.**—मग आतां ही गोष्ट लक्षांत ठेवा. मीं तुम्हांला धार्मिक कृत्यें कोणतीं असें विचारलें नाहीं. मला अशा कृत्यांचीं उदाहरणें नकोत. सर्व पवित्र कृत्यांत पावित्र्याची विशेष खूण, पावित्र्याचा विशिष्ट गुण काय असतो तें मला कळलें पाहिजे. कोणत्या वैशिष्टयामुळें आपण या कृत्यांवर पावित्र्याचा

शिक्का मारतों ? हें वैशिष्ट्य एकदां बरोबर समजलें म्हणजे ती कसोटी आपल्याला प्रत्येक कृत्याला त्याचें पावित्र्य किंवा अपावित्र्य ठरवितांना लावतां येईल.

**युथि.**—देवांना जें प्रिय तें पवित्र.

**सॉक्रे.**—छान ! मला हवें तसें उत्तर तुम्हीं दिलें. पण तें बरोबर आहे कीं नाहीं हें मला सांगतां येणार नाहीं. तुम्ही त्याची सत्यता सिद्ध केली पाहिजे.

**युथि.**—निःसंशय.

**सॉक्रे.**—ठीक; तुमच्या मतें देवांना प्रिय तें पवित्र, त्यांना अप्रिय तें अपवित्र. तुम्हीं वर सांगितलेल्या झ्यूसच्या कथेप्रमाणें देवांच्या कथा सत्य मानतां. देवादेवांत मतभेद, कलह, द्वेषमत्सरादि दोष या कथांतून दिसतात व त्यांवर तुमचा विश्वास आहे.

**युथि.**—होय, माझा त्यांच्या सत्यतेवर विश्वास आहे.

**सॉक्रे.**—राग, द्वेष, मत्सर वगैरे कां उत्पन्न होतात हें सांगतां येईल का ? तुमच्या माझ्यांत एखादी संख्या, एखाद्या वस्तूचें मोजमाप यांविषयीं मतभेद झाला तर आपण न भांडतां किंवा न रागवतां प्रत्यक्ष पदार्थ मोजून किंवा त्याचीं मापें घेऊन सत्य काय तें ठरवूं हें खरें ना !

**युथि.**—दुसरें काय करणार ?

**सॉक्रे.**—भिन्न मतांमुळें आपल्याला राग येऊन आपण एकमेकांचे शत्रु व्हावे असे प्रश्न कोणते असतात तें तुम्हांला सांगतां येईल का ? कदाचित् या प्रश्नाचें तुम्हांला एकदम उत्तर देतां येणार नाहीं. आतां मी काय म्हणतों तें ऐका. एखादें कृत्य योग्य किंवा अयोग्य, नैतिक किंवा अनैतिक, मानास्पद किंवा लज्जास्पद यांसंबंधीं होणाऱ्या मतभेदांनीं आपण क्रुद्ध होऊन वरदळीवर येतों ना ?

**युथि.**—होय, अशाच बाबींत.

**सॉक्रे.**—देवसुद्धां भांडलेच तर अशा प्रश्नांवरच भांडतील ना ?

**युथि.**—होय, निश्चित.

**सॉक्रे.**—युथिफ्रॉन, तुमचें म्हणणें असें आहे कीं कांहीं देवांना एक कृत्य न्यायाचें वाटतें, कांहींना दुसरेंच एखादें न्यायाचें वाटतें. कांहींना जें नीतीचें वाटतें तेंच दुसऱ्यांना अनीतीचें वाटतें. तसें नसतें तर देवादेवांत कलह उत्पन्न होऊन युद्धें कां होतीं ?

**युथि.**—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

**सॉक्रे.**—याचा अर्थ असा कीं एकच कृत्य देवांना प्रिय असूं शकतें व अप्रियहि असूं शकतें.

**युथि.**—असें दिसतें खरें.

**सॉक्रे.**—याचा अर्थ असा कीं तेंच कृत्य पवित्र व अपवित्र ठरूं शकतें.

**युथि.**—होय, असें म्हणावें लागतें.

**सॉक्रे.**—तर मग तुम्हीं माझ्या मूळ प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं. कोणतें कृत्य पवित्र तसेंच कोणतें अपवित्र असूं शकतें असा माझा प्रश्न नव्हता. तुम्ही आपल्या वडिलांवर करणार असलेली फिर्याद झ्यूसला आवडेल, पण कदाचित ती क्रोनॉस किंवा ऑरेनॉस या देवांना अप्रिय होईल, अपवित्र वाटेल.

**युथि.**—पण, सॉक्रेटीस, एका मनुष्याचा दुसऱ्यानें अन्यायानें खून केला तर खुनी मनुष्याला शासन झालेंच पाहिजे याविषयीं सर्व देवांत एकवाक्यता आहे.

**सॉक्रे.**—युथिफ्रॉन, अन्यायानें खून करणाऱ्या खुनीला शिक्षा व्हावी याविषयीं माणसांत तरी तुम्हीं कधीं मतभिन्नता ऐकली आहे का ?

**युथि.**—कां बरें ? न्यायकचेऱ्यांतून तर खुनी मनुष्याला सोडविण्याची वकिलांची धडपड आपण रोज पाहतों.

**सॉक्रे.**—हे वकील आपल्या अशीलांनीं गुन्हा केला आहे पण न्यायाधिशांनीं त्यांना शिक्षा करूं नये असें कां म्हणत असतात ? या अशीलांनीं गुन्हा केला नाहीं असा त्यांचा दावा असतो. त्याप्रमाणेंच देवांत मतभिन्नता शिक्षा करण्याविषयीं नसते, खरोखरीं कृत्य अन्यायाचें आहे कीं नाहीं याविषयीं असते, हें खरें ना ?

**युथि.**— होय, तुमचें म्हणणें बरोबर आहे.

**सॉक्रे.**— तर मग, युथिफ्रॉन, एका मालकानें आपल्या चाकराचा खून करणाऱ्या इसमाला कोंडून ठेविलें, व पुढें त्याचें काय करावयाचें हें विचारण्याकरितां तो भविष्यवाद्याकडे जाऊन परत येण्यापूर्वी तो खुनी मरण पावला. ह्या खुनी मनुष्याचा मृत्यु अन्यायानें घडून आला असें सर्व देवांचें एकमत होईल हें तुम्हांला सिद्ध करतां येईल का ? वडिलांच्या हातून अशा माणसाला

मृत्यु आला तेव्हां मुलानें त्यांना आरोपी म्हणून न्यायासनासमोर खेंचणें योग्य आहे असें तुम्हांला कसें वाटतें ?

**युथि.**—मला हें तुम्हांला स्पष्ट करून सांगतां येणार नाहीं असें नाहीं. पण, सॉक्रेटीस, त्याला फार वेळ लागेल.

**सॉक्रे.**—म्हणजे मी तुमच्या न्यायाधिशापेक्षां डोक्यानें मठ्ठ आहे असें म्हणावयाचें. वडील अन्यायी आहेत हें तुम्ही न्यायाधिशापुढें सिद्ध करणार आहांत. बरें, हें फिर्यादीचें प्रकरण आपण सोडून देऊं. आपण 'पवित्र' काय व 'अपवित्र' काय हें पाहात होतों. तुमच्या म्हणण्यांत थोडा फरक करून आपण घटकाभर असें म्हणूं कीं सर्व देवांना जें तिरस्करणीय तें 'अपवित्र', त्यांना आवडतें तें 'पवित्र', व कांहीं देवांना तिरस्करणीय व कांहींना प्रिय तें अपवित्रहि नाहीं किंवा पवित्रहि नाहीं, हें म्हणणें तुम्हांला पटतें का ?

**युथि.**— हें पटण्यासारखें आहे. ही व्याख्या योग्य दिसते.

**सॉक्रे.**—योग्यायोग्यता ठरविली पाहिजे. आतां माझा प्रश्न असा कीं एखादें कृत्य पवित्र म्हणून देवांना प्रिय होतें, का तें देवांना प्रिय असतें म्हणून पवित्र ठरतें ?

**युथि.**—तें पवित्र असतें म्हणून देवांना प्रिय होतें.

**सॉक्रे.**—पण पवित्र कृत्य देवांना प्रिय असतें हें समजल्यामुळें त्या कृत्याचें पावित्र्य कशामुळें असतें तें समजत नाहीं. पावित्र्याचें वैशिष्ट्य कोणतें असा माझा प्रश्न राहतोच.

**युथि.**—सॉक्रेटीस, माझ्या मनांतला अर्थ तुम्हांला कसा स्पष्ट करून सांगावा हें मला समजत नाहीं.

**सॉक्रे.**—या कामीं मी तुम्हांला आतां थोडी मदत करतों. पवित्र कृत्यें न्याय्य असतात ना ?

**युथि.**—होय.

**सॉक्रे.**—पण सर्वच न्याय्य कृत्यें पवित्र असतात का ?

**युथि.**—कांहीं न्याय्य कृत्यांत पावित्र्य नसतें हें मला कबूल.

**सॉक्रे.**—बरोबर. आतां मला सांगा कोणत्या प्रकारच्या न्याय्य कृत्यांत पावित्र्य असतें ?

**युथि.**—मला वाटतें देवांसंबंधींच्या न्याय्य कृत्यांत पावित्र्य असतें. माणसांसंबंधींच्या न्याय्य कृत्यांत फक्त न्यायाचा प्रश्न येतो, पावित्र्याचा येत नाहीं. सॉक्रेटीस, हा प्रश्न लवकर सुटणार नाहीं. मला आतां कामाला गेलें पाहिजे.

असें म्हणून युथिफ्रॉननें तेथून पाय काढला. सॉक्रेटिसाच्या या संभाषण-पद्धतीनें दुहेरी कार्यभाग साधतो. जीवनांत विचारप्रवाह सतत चालू राहतो, व प्रवाहाचा उलट जीवनावर परिणाम होऊन मनुष्याचें आचरण सुधारत जातें. विचारानें जीवन प्रगतीच्या मार्गात राहतें; उलट विचाराचा जीवनाशीं प्रत्यक्ष संबंध आल्याकारणानें विचाराच्या प्रवाहाला खळ न पडतां तो वाढत जातो.

● ● ●

## ४. खटल्याची पार्श्वभूमि : खटला

मागील प्रकरणांत निवेदन केल्याप्रमाणें डेलिअम व अॅंफिपॉलिस या लढायांत सॉक्रेटिसाची रणांगणावरील कामगिरी चालूं असतां अॅथेन्स शहरांत कांहीं उपद्यापी लेखक त्याची टवाळी करण्यांत गुंतले होते. अॅरिस्टॉफेन्स हा नाटककार त्यांपैकीं एक होता. त्यानें आपल्या ‘ मेघ ’ (“ Cloud ”) नांवाच्या नाटकांत भौतिक तत्त्ववादी व “ सोफिस्ट ” यांच्या स्वभावविशेषांच्या मिश्रणानें सॉक्रेटिसाला अनुरूप असें एक अतिरंजित पात्र निर्माण करून त्याला जनतेपुढें हास्यास्पद व तिरस्करणीय करण्याच्या हेतूनें त्याची टवाळी केली होती. वरील दोन लढायांच्या मधील काळांत खि. पू. ४२३ मध्यें रंगभूमीवर या नाटकाचा पहिला प्रयोग झाला. अॅरिस्टॉफेन्सच्या मतानें अॅथेन्सचा तत्कालीन समाज नैतिक अधःपाताच्या व अवनतीच्या मार्गाला लागला होता. ‘ मेघ ’ नाटक लिहून त्याच्या द्वारें त्यानें या अनिष्ट परिस्थितीवर हल्ला चढविला होता. खि. पू. पांचव्या शतकाच्या अर्धशतकानंतर अॅथेन्समध्यें एक बौद्धिक क्रांति होत होती. या चळवळींत सोफिस्ट पंथीयांनीं विशेष भाग घेतला होता. परंपरित प्राचीन धर्म व नीति यांविषयीं जनतेचीं मतें साशंक होऊं लागलीं होतीं. अनादिकालापासून चालत आलेली परंपरा बाजूला सारून त्याठिकाणीं स्वतंत्र विचार व वैयक्तिक मतें येऊं पाहात होतीं. अॅरिस्टॉफेन्सला या नवीन वातावरणाचा तिटकारा वाटे. पूर्वीच्या नागरिकांचे साधे आचार, पर्शिअन युद्धांतील अॅथेनिअन लोकांचें कीर्तिवैभव, मॅरॅथॉनच्या रणभूमीवरील शूर लढवय्यांचें विनतक्रार आज्ञापालन वगैरे गोष्टींचें त्याला

अभिमानपूर्वक स्मरण होई, व त्या आतां नष्ट होत चालल्याबद्दल खेद होई. खैर, बेछूट विचार व सोफिस्ट पंथ या ऱ्हासाला कारण अशी त्याची समजूत होती, व म्हणूनच त्यानें त्यांच्यावर ' मेघ ' नाटक लिहून सणसणीत टीका केली. या नाटकांतील मुख्य भूमिका त्यानें सॉक्रेटिसाची घेतली आहे. त्याचें कारण अॅथेन्समधील बऱ्याच नागरिकांना सॉक्रेटीस सोफिस्ट पंथाचा आहे असें वाटत होतें व ॲरिस्टॉफेन्सचीहि अशीच समजूत होती. खरें पाहतां सॉक्रेटीस सोफिस्टांच्या विरुद्ध होता, पण हें पुष्कळांना माहीत नव्हतें. नाटकाच्या प्रधान भूमिकेकरितां त्याची निवड होण्याचें हें एक मुख्य कारण होतें. या भूमिकेच्या द्वारें सोफिस्टांवर टीकाशस्त्र उपसण्यास भरपूर वाव मिळणार होता. याशिवाय दुसरेंहि एक कारण होतें. सॉक्रेटिसाचा बोजड, अर्बुज चेहरा, त्याचें बसकें नाक, बटबटीत डोळे, तारवटलेल्या दारुड्यासारखी दृष्टि व गबाळा पोशाख यांमुळें तो अॅथेन्सच्या रस्त्यांतील जनतेच्या सतत डोळ्यांपुढें असे. सॉक्रेटिसाला जुने परंपरित विश्वास मान्य नाहींत, तो त्यांच्या विरुद्ध नेहमीं बोलत असतो येवढें लक्षांत ठेवून या पात्राची प्रेक्षकांना एकदम ओळख पटून विनोदाला व टीकेला रंग चढेल असें वाटून ॲरिस्टॉफेन्सनें या भूमिकेची योजना केली होती.

प्लेटोनें आपल्या ' अॅपॉलॉजी 'मध्यें या नाटकाचें खालीं दिल्याप्रमाणें वर्णन केलें आहे. त्यांत नाटककारानें एक भौतिक तत्त्ववेत्ता व एक सोफिस्ट यांचीं अतिरंजित चित्रें रंगवून विडंबन केलें आहे. या दोन भूमिका एकत्र करून एकाच व्यक्तींत पाहिल्या म्हणजे ॲरिस्टॉफेन्सचा सॉक्रेटीस आपल्यापुढें उभा राहतो. हा नाटकांतील सॉक्रेटीस एक बैरागी आहे. त्याच्या तोंडीं नाटककारानें भौतिकशास्त्रांसंबंधीं मूर्खपणाचे तर्कविरुद्ध विचार घालून प्रेक्षकांची करमणूक केली आहे. अॅथेनिअन नागरिकांना भौतिक तत्त्वज्ञ अनीश्वरवादी आहेत असें वाटे. नाटकांतील सॉक्रेटीस म्हणतो, " पृथ्वीचा संचालक झ्यूस देव नसून पृथ्वीची गति हीच तिची संचालक आहे. ग्रीक देवदेवतांचा पृथ्वीशीं कांहीं संबंध नसून पृथ्वीचीं कार्यें हवा, ईथर, मेघ व जीभ यांमुळें होत आहेत. " ॲरिस्टॉफेन्सनें असें दाखविलें आहे कीं सॉक्रेटिसामध्यें अनैतिक गोष्टी शास्त्रशुद्ध आहेत असें दाखविण्याची शक्ति आहे. याच शक्तीचा उपयोग करून तो कर्जबाजारी मनुष्याला आपल्या सावकारास

फसविण्यास मदत करतो. त्याच्याच शिकवणीनें अॅथेनिअन तरुण आपल्या आई-बापांस मारण्यास, त्यांचा अपमान करण्यास तयार होतात. नाटकाच्या शेवटीं संघगीतांत ( chorus ) सॉक्रेटिसानें आपल्या वागण्यानें जाणूनबुजून उघड्या डोळ्यांनीं देवांच्या विरुद्ध जाऊन पापी वर्तन केलें आहे असें सुचविलें आहे. सॉक्रेटीस आपल्या धर्ममतांमुळें अगोदरच जनतेंत अप्रिय झाला होता. हा तरुणांना बिघडवितो, दुष्कृत्यांना सात्त्विक सत्कृत्यांचें स्वरूप देतो असें लोकांचें म्हणणें असे. वास्तविक पाहतां भौतिक तत्त्ववादी व सोफिस्ट यांच्यांत कांहींच साम्य नव्हतें. पण अॅरिस्टॉफेन्सनें या दोघांची गल्लत करून उभयतांचे दोष सॉक्रेटिसाच्या माथीं मारले. आरंभापासून शेवटपर्यंत 'मेघ' नाटक सॉक्रेटिसाची नालस्ती करणारें आहे. नाटककारानें जनतेच्या अप्रियतेचा फायदा घेऊन अप्रियतेच्या आगींत तेल ओतलें. हीच आग भडकल्यामुळें ख्रि. पू. ४२३ मध्यें अॅरिस्टॉफेन्सनें व इतरांनीं न्यायालयांत सॉक्रेटिसावर केलेले आरोप त्याला शेवटपर्यंत भोंवले.

सोफिस्ट पंथाचा वर उल्लेख आला आहे. अॅथेनिअन नागरिकांना सॉक्रेटीस या पंथाचा आहे असें वाटत होतें. तथापि वर वर पाहणाऱ्यांना जरी सॉक्रेटीस व सोफिस्टपंथीय यांच्या विचारांत व आचारांत साम्य दिसलें तरी तो केवळ आभास होता. सॉक्रेटिसाची बाजू नीट लक्षांत येण्यास या ठिकाणीं सोफिस्ट पंथाची थोडीशी माहिती देणें अवश्य आहे. ख्रि. पू. पांचव्या शतकाच्या उतरार्धांत ग्रीस देशांत शिक्षकांचा एक विशिष्ट वर्ग अस्तित्वांत आला होता. या शिक्षकांना 'सोफिस्ट्स्' म्हणत. परिणामकारक लेखन, वक्तृत्व व चार लोकांत कसें वागावें या विषयांचे धडे हे शिक्षक नागरिकांना देत असत. या पंथीयांविषयीं सामान्यतः असा समज आहे कीं हे लोक बौद्धिक साशंकतावादी ( Intellectual sceptics ) असून ते आपल्याला नीतिशास्त्रांत पंडित मानीत. प्लेटोनें आपल्या "संवादां"त त्यांचें असेंच चित्र रेखाटलें आहे. पण प्रसिद्ध इतिहासकार ग्रोट याचें म्हणणें असें आहे कीं हें प्लेटोचें चित्र सत्याला धरून नाहीं. पहिली गोष्ट अशी कीं सोफिस्टांचा एखादा विशिष्ट पंथ किंवा विशिष्ट तत्त्वज्ञान होतें असें नाहीं. त्या लोकसत्तेच्या काळांत लोकमत अनुकूल करून घेण्याकरितां वक्तृत्वांत प्राविण्य मिळविण्याची आवश्यकता होती. सोफिस्ट शिक्षक निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें देत असत. त्यांनीं

लोकांना वक्तृत्वकला शिकविण्यास आरंभ केला. याच शिक्षकांपैकीं कांहींजण हळूहळू आपल्या शिष्यांना लोकाचाराचे धडे देऊं लागले. ग्रोट एक गोष्ट मात्र मान्य करतो. ती ही कीं सोफिस्टांचा हा शिक्षकांचा धंदा पुढें अवनतीच्या मार्गाला लागला. या धंद्यावर ते आपलें पोट भरूं लागले व त्यामुळें ग्रीक लोकांतील त्यांच्याविषयींचा आदरभाव नाहींसा झाला.

हल्लींच्या काळांत ' सोफिस्ट ' शब्दाचा अर्थ निंदाव्यंजक झाला आहे. हेत्वाभास उत्पन्न करून आपल्या विधानाची सत्यता पटविणाऱ्यास ' सोफिस्ट ' म्हणतात. या शब्दाला प्राचीन काळींच या अर्थाची छटा येऊं लागली होती. तथापि त्याच्या मूळ अर्थांत निंदात्मक असें कांहीं नाहीं. आतांच्या आपल्या काळांत वर्तमानपत्रें, नियतकालिकें, व्याख्यानें वगैरेंच्या द्वारें लोकशिक्षणाचें कार्य होतें तशा प्रकारचें कार्य सोफिस्ट शिक्षक करीत असत. हें कार्य केवळ ज्ञानप्रद नसून त्यांत व्यवहाराची शिकवणहि असे. मागणीप्रमाणें ज्ञान मिळे. ॲथेनिअन नागरिकांना त्या काळीं द्रव्यार्जन, राजकारण, लोकसत्तेंत अधिकार व सामाजिक महत्त्व यांस उपयुक्त होईल असें ज्ञान हवें होतें. पर्शिअन युद्धामुळें लोकसत्ताक राज्यपद्धतीची वाढ होऊं लागली होती. युद्ध-काळांत रणांगणावर लोकांनीं आपलें रक्त सांडलें होतें व अनेक हालअपेष्टा भोगल्या होत्या, त्यामुळें त्यांना राज्यकारभारांत आपला हात असावा, आपल्याला अधिकार असावा असें स्वाभाविकपणें वाटूं लागलें होतें. पेरिक्लिजच्या कारकीर्दीत ॲथेन्स शहर ललितकला, वाङ्मय, तत्त्वज्ञान यांचें माहेरघर झालें होतें. या क्षेत्रांतहि आपण वावरावें अशी इच्छा उत्पन्न झाल्यामुळें लोकांना बौद्धिक प्रगतीहि हवी होती. इतर देशांशीं दळवणळण वाढल्यामुळें तेथील राज्यपद्धति, सामाजिक आचारविचार, नीतिविषयक कल्पना यांच्याशीं त्यांची तुलना होऊं लागली. सामाजिक व धार्मिक बंधनें शिथील होऊन नष्ट होण्याच्या पंथास लागलीं. ॲथेनिअन नागरिक वाक्पटु म्हणून प्रख्यात होते. ते सर्व विषयांवर — तत्त्वज्ञानासारख्या कठीण विषयावरहि — भाषणें करीत. सामान्य जनतेला तत्त्वज्ञानाची गोडी अर्थातच नसे. लोकांना तत्त्वज्ञान्यांविषयीं फारसा आदर नसे, ते त्यांना विरोधच करीत. जनतेच्या मनांत गैरविश्वास व साशंकता उत्पन्न होऊं लागली. सामान्य लोकांचीं अनुमानें अनुभवजन्य ज्ञानावर उभारलेलीं असत. ते आपल्या ज्ञानाला तर्काची कसोटी लावण्यास

तयार नसत. त्यांना राजकारण, नीति, समाज इत्यादि विषयांसंबंधींच्या प्रश्नांची आवड होती. पण सत्य म्हणजे काय? नैतिक बंधनें स्वाभाविक आहेत कीं तीं समाजांतील संकेतांनीं निर्माण झालीं आहेत? दोन्ही प्रकारचीं असल्यास त्यांपैकीं स्वाभाविक कोणतीं व सांकेतिक कोणतीं? मानवी कार्ये परिणामकारक होण्यास व्यवहारी ज्ञान व तात्त्विक ज्ञान यांतील अधिक उपयुक्त कोणतें? लोकसत्ताक राज्यपद्धति, अल्पसत्ताक पद्धति व एकमुखी राज्यसत्ता यांत उत्तम पद्धति कोणती? अशा प्रकारच्या प्रश्नांची चर्चा नागरिकांत होत असे. जुने आचारविचार व रूढी लोकांच्या मनांतून उतरत चालल्या. पण ही नावड बंधनें पाळावयाचीं नाहींत, आचार बाजूला सारावयाचे, रूढी झुगारून द्यावयाच्या येवढ्याचपुरती होती. या नष्ट होणाऱ्या बंधनांची, आचारांची व रूढींची जागा कशी भरून निघावयाची हें त्यांना सांगतां येईना. त्यांच्या मतें पूर्ण स्वातंत्र्य म्हणजे मिळालेल्या स्वातंत्र्याचा व अधिकाराचा अनिर्बंधपणें इच्छेप्रमाणें उपयोग करणें. तथापि स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. स्वतंत्र व्यक्तीला स्वतःच बंधन घालून घ्यावें लागतें. आपण जें काय करणार तें कशा-करितां करणार, त्याचा हेतु काय, आपल्या कार्यपद्धतीनें तो सिद्ध होईल कीं नाहीं हें पाहावें लागतें, व हें ठरविल्यानंतर हेतुसिद्धीकरितां कार्याला स्वतःच इष्ट तें बंधन किंवा मर्यादा घालावी लागते. कार्याच्या यथार्थ ज्ञानाची सॉक्रे-टिसाच्या काळांत फार जरुरी होती. याच ज्ञानाच्या अभावीं व्यक्तीचें जीवन बेछूट होऊन बसलें होतें. द्रव्यप्राप्ति व अधिकारप्राप्ति हेंच लोकांचें ध्येय झाल्यासारखें होतें. हीं प्राप्त करून घेण्याचीं साधनें व उपाय यांच्या न्याय्या-न्याय्यतेविषयीं विचार करण्याच्या भानगडींत ते फारसे पडत नसत. अशा लोकांना शिक्षण देण्याचें — त्यांच्या या गरजा भागतील असें शिक्षण देण्याचें — काम सोफिस्टांनीं पतकरलें होतें. तरुणांना सार्वजनिक कार्याकरितां व राजकारणाकरितां तयार करणें, त्यांना वक्तृत्वविषयक सर्वांगीण शिक्षण देणें, वादांत प्रतिपक्षाशीं दोन हात करण्यास शिकविणें हीं कामें ते करीत; व त्यांबरोबरच भाषेचा अभ्यास, शब्दांचे अर्थ व त्यांचा उपयोग, तत्कालीन संशोधन, गणित, राज्यशासनशास्त्र वगैरे विषयांवर व्याख्यानें देत.

स्थूल दृष्टीनें पाहणाऱ्यांस सॉक्रेटीस व सोफिस्टपंथीय यांत भेद दिसत नाहीं. पण दोघेहि ज्ञानदानाकरितां शिक्षकाचें कार्य करणारे होते येवढेंच

त्यांच्यांतील साम्य. बाकी साम्यापेक्षां वैषम्यच अधिक. हें वैषम्य कसें होतें हें पाहण्यासारखें आहे.

सोफिस्ट लोक खऱ्या अर्थानें तत्त्वज्ञानी — तत्त्व जाणणारे — कधींच नव्हते. सत्यावर निष्ठा व विश्वास असल्याशिवाय तत्त्वज्ञानाला अस्तित्वच नाहीं. सोफिस्टांना ज्ञानप्राप्तीकरितां सत्यशोधन करण्याची आवश्यकता वाटली नाहीं. तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत त्यांचें नांव येतें; पण त्यांचें महत्त्व येवढेंच कीं त्यांनीं लोकांना दिलेलें शिक्षण व त्यांचा सामाजिक दर्जा यांवरून तत्कालीन समाजाची यथार्थ कल्पना येते. सोफिस्टांचें शिक्षणकार्य सॉक्रेटिसाच्या कार्याची व त्याच्या महत्त्वाची पार्श्वभूमि असें म्हणणें योग्य होईल. त्याच्या योगानें सॉक्रेटिसाचें कार्य उठून दिसतें. एका दृष्टीनें पाहतां सॉक्रेटिसानें सोफिस्टांच्या बौद्धिक व जीवनविषयक शिक्षणाला विरोध करण्यांत आयुष्य घालविलें. सॉक्रेटिसाच्या शिक्षणविषयक विचारांची दिशा सोफिस्टांच्यापेक्षां निराळीं होती. शिक्षण म्हणजे जीवनाची तयारी हें म्हणणें त्यालाहि मान्य होतें. पण त्यानंतर त्याचें म्हणणें असें होतें कीं जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाप्रमाणें, जीवनाच्या ध्येयाप्रमाणें शिक्षणाची दिशा बदलणार. सोफिस्टांपुढें जीवनक्रमाची आंखलेली दिशाच नव्हती तर शिक्षणाची दिशा तरी काय असणार ! जरुरीप्रमाणें सुख, संपत्ति, अधिकार इत्यादिकांचा लाभ होण्याच्या दृष्टीनें ते आपल्या शिष्यवर्गाला शिक्षण देऊन तयार करीत. सॉक्रेटिसाला समाजकार्य किंवा राजकारण यांत प्राविण्य नको होतें असें नाहीं, पण त्याचें प्राविण्याचें माप उच्च पातळीचें होतें. सोफिस्टांचें शिक्षण 'प्रेयसा'च्या प्राप्तीकरितां असें, सॉक्रेटिसाला तें 'श्रेयसा'करितां हवें होतें.

सोफिस्ट व सॉक्रेटीस यांच्यांतील दुसरा फरक हा कीं सोफिस्ट शिक्षक आपल्या उपजीविकेकरितां शिष्यांपासून शुल्क घेत. सॉक्रेटिसाचें ज्ञानदान फुकट असें. 'युथिफ्रॉन' संवादांत सॉक्रेटीस म्हणतो, "माझें मनुष्यमात्रावरील प्रेम मला जो जो भेटेल त्याच्या त्याच्याशीं संकोच न बाळगतां मोकळ्या मनानें एक पैसाहि न घेतां संभाषण करावयास लावतें. खरें बोलावयाचें झाल्यास शक्ति असती तर मींच माझें बोलणें ऐकून घेणाऱ्यांस आनंदानें पैसे दिले असते." सोफिस्ट शुल्क घेत हा कांहीं दोष म्हणतां येणार नाहीं. पण पैशाच्या लोभानें शिष्यांना खरें हितकर शिक्षण देण्याच्याऐवजीं त्यांना रुचेल

असें शिक्षण ते देत हा त्यांच्यांतु खरा दोष होता. शिष्यांनाहि सत्य, हितकर ज्ञानाची लालसा थोडीच होती! कामचलाऊ ज्ञान मिळालें म्हणजे त्यांचें काम भागें. सोफिस्ट शिक्षक विद्वान होते. आरंभींचे सोफिस्ट विचारी व आपली जबाबदारी ओळखणारे होते. पण पुढें या पंथीयांत समाजप्रियतेची इच्छा व सत्यनिष्ठेचा अभाव उत्पन्न होऊन वादविवादांतील तर्कशुद्धता व सत्यशोधन नष्ट झालीं, व त्यांच्या जागीं केवळ बुद्धीचें चापल्य दाखविण्याची हौस उत्पन्न झाली. तर्क व सद्सद्विवेक यांच्याशीं छत्तीसाचा आंकडा असणारीं तत्त्वें व आचरण यांचें समर्थन करण्यांत त्यांची बुद्धि खर्च होऊं लागली. या सर्व दोषांचा परिणाम व्हावयाचा तसा झाला. तरुणांना अनीतीच्या मार्गाला हे सोफिस्ट लावतात, त्यांना दुराचारी बनवितात असें म्हणून लोक त्यांचा तिरस्कार करूं लागले. याच कारणांनीं 'सोफिस्ट' म्हणजे ज्ञाता, पंडित हा मूळचा सदर्थ जाऊन त्या शब्दाला प्रचलित हीनार्थ चिकटला.

सॉक्रेटिसाची विचारसरणी सोफिस्टांच्यापेक्षां निराळी होती. ती समजल्या-शिवाय त्याच्या विधायक कार्याचें महत्त्व लक्षांत येणार नाहीं. शिवाय तो सोफिस्ट आहे असा एक आरोप त्याच्यावर न्यायकचेरींत करण्यांत आला होता, त्याचें त्यानें स्वंत: खंडन केलें आहे तेंहि अधिक स्पष्ट होईल.

सॉक्रेटिसाची सत्याकडे पाहण्याची दृष्टि सोफिस्टांपेक्षां भिन्न होती. या काळांत ॲथेन्समधील जनतेची मनोवृत्ति साशंक झाली होती. नुकत्याच होऊन गेलेल्या पर्शिअन युद्धामुळें समाजांत सर्व बाबींविषयीं अविश्वास उत्पन्न झाला होता. ॲथेन्सचा मोठेपणा ज्या रूढ आचारांवर उभारलेला होता त्यांवरील लोकांचा विश्वास ढळूं लागला होता. धार्मिक आचार, नैतिक आचरण, राजकीय व सामाजिक जीवनपद्धति या सर्वांविषयींच तरुण नाग-रिक साशंक होत होते. सोफिस्टांची शिकवणहि या साशंकतेला अंशतः कारण झाली. तथापि ही साशंकता सत्यप्रेम किंवा सत्यजिज्ञासा यामुळें उत्पन्न झालेली नव्हती. जुन्या गोष्टींत शोधून काढण्यासारखें कांहीं आहे असें तरु-णांना वाटत नव्हतें. प्रचलित धार्मिक आचार व व्यवहार मागील पिढ्यांत केवळ अरेरावीनें सुरू झाले होते; त्यांचें स्वरूप सांकेतिक आहे, ते नष्ट कर-ण्यानें समाजाचें अकल्याण होण्याचें कारण नाहीं अशी तरुण वर्गाची विचार-

सरणी होती. सत्ता व रूढ आचार यांच्याविरुद्ध उत्पन्न झालेल्या या क्रांतिकारक बंडाचे दुष्परिणाम सॉक्रेटिसाला स्पष्ट दिसत होते. त्याच्याप्रमाणें इतर कांहीं विचारी व पुराणमताभिमान्यांनाहि त्यांची जाणीव होती; पण हा बंडखोरपणा नाहींसा करण्याचा त्यांचा मार्ग सॉक्रेटिसाच्यापेक्षां भिन्न होता. सरकारी कायद्यांच्या नियंत्रणानें बंडखोरांना आळा बसेल असें त्यांना वाटत होतें. सॉक्रेटिसाची दृष्टि निराळी होती. कायद्याच्या नियंत्रणाचा परिणाम चिरकाल टिकणारा नसतो. अधिकाऱ्यांचें नियंत्रण हळूहळू ढिलें पडत जातें, व तें एकदां ढिलें पडलें म्हणजे पुन्हां स्थापन करणें कठीण पडतें, कांहीं वेळां अशक्यहि होतें, व मग सरकारचा बोज व त्याच्याविषयीं वाटणारा दरारा थोड्याफार प्रमाणांत नाहींसे होतात. सॉक्रेटिसाला लोकांना ज्ञान देणें हाच योग्य मार्ग वाटला. त्यानें तरुणांना सत्य व श्रेयस् शोधण्याच्या मार्गाला लाविलें. सत्य व श्रेयस् हींच खरीं हितकारक असा त्याचा पूर्ण विश्वास होता.

वर निदर्शित केलेली पांचव्या शतकांतील युद्धानंतरची ॲथेन्सची परिस्थिति व आजची जागतिक युद्धानंतर उत्पन्न झालेली लोकसत्तेच्या स्वातंत्र्यांतील भारताची परिस्थिति यांत पुष्कळ साम्य आहे. इंग्रजी सत्तेचा तडाखा दीडशें वर्षें अनुभविल्यानंतर भारताला नुकतेंच स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे. इंग्रजी सत्तेचे अनिष्ट परिणाम, द्वितीय जागतिक युद्धानें त्यांत पडलेली भर व प्रचलित अडचणींच्या परिस्थितींत सांपडलेलें, अननुभवी व थोडेंफार पक्षाभिमानी सरकार या कारणांनीं भारताची परिस्थिति बिकट झाली आहे. आतां आपल्याला पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यामुळें आपण अनिर्बंध वर्तन करण्यास मोकळे झालों आहोंत अशी एक समजूत जनतेंत सर्व साधारणपणें उत्पन्न झाली आहे. त्यांतच आपला पक्ष सत्तारूढ, आपण करूं ती पूर्व असें कांहींच्या डोक्यांत वारें भरलें आहे. याच भावनांनीं प्रेरित झालेले कांहीं अधिकारी अरेराव बनले आहेत. गुन्ह्यांचें वाढणारें मान सरकारचा दरारा कसा कमी होत चालला आहे हें दाखवितें. राष्ट्रनिष्ठा व नीति यांची जागा स्वार्थ व अप्रामाणिकपणा यांनीं घेतली आहे. अधिकाऱ्यांचा दरारा कमी झाल्यामुळें जनतेचींहि नैतिक बंधनें शिथील न झाल्यास नवल ! ॲथेन्सप्रमाणें आपणांमध्येंहि आचारांविचारांविषयीं साशंकता व अविश्वास दिसत आहेत. राजकारणव समाजकारण यांची आवड तरुणांत दृष्टीस पडते ही आनंदाची

गोष्ट अहे, पण त्यांत शिकण्याकरितां लागणारी ज्ञानाची आवड व दीर्घाभ्यासाची हौस फार थोड्यांत दिसून येतात. महत्त्वाकांक्षा व स्वार्थ यांनीं प्रेरित होऊन ब़रीच मंडळी या कार्यांना लागतात. जुने आचारविचार व रूढी तरुणांच्या मनांतून उतरत चाल्लीं आहेत, त्यांचा भाव कमी झाला आहे, त्यांचीं बंधनें ते झुगारीत आहेत हें कालमानाप्रमाणें ठीक आहे. पण सुटलेल्या बंधनांची जागा कशानें भरून काढावयाची हा प्रश्न सुटणें अवश्य आहे. हल्लीं समाजस्वास्थ्याचें मान किती खालीं गेलें हें आंकड्यांनीं सिद्ध करण्याचें कारण नाहीं. समाजस्वास्थ्य बंधनावांचून टिकत नाहीं. कालमानाप्रमाणें प्रचलित बंधनांत नवें-जुनें होणार व तसें होणें इष्टच आहे, पण ही क्रिया चालू असतांना नवीन येणाऱ्या बंधनांचा, आचारविचारांचा, ते हितकारक कीं अनहितकारक या दृष्टीनें विचार होणें अवश्य आहे. नाहीं तर जुन्या हितकारक आचारांचा व रूढींचा लोप होईल, व अनवस्था माजून समाज हळुहळू अधोगतीला लागेल. प्रजासत्ताक राष्ट्रांत स्वाभाविकपणें असणारे पक्षोपपक्ष ॲथेन्सप्रमाणें भारतांतहि आहेत.

वरील विचार निदर्शित करतांना थोडें विषयांतर झालें हें कबूल केलें पाहिजे. पण प्राचीन सॉक्रेटिसाच्या काळांतील ॲथेन्स व आतांचा आपला भारत यांत इतकें साम्य आहे कीं एकाचा विचार करतांना दुसऱ्याचा विचार मनांत आल्याशिवाय राहात नाहीं, व ही तुलना उद्बोधक असल्यामुळें तिचा उल्लेख करण्याचा मोह आवरत नाहीं. उल्लेख करण्याचें आणखीहि एक कारण आहे. तें हें कीं सॉक्रेटिसाच्या सत्यप्रियतेचा व सत्यशोधनाचा आपण विचार केल्यास तो प्रचलित परिस्थितींत फार उपयुक्त वाटेल.

हें अल्पसें विषयांतर सोडून देऊन आपण आपल्या विषयाकडे वळूं. सोफिस्ट व सॉक्रेटीस यांच्यांतील भिन्नतेचा आपण विचार करीत होतों. आतां या दोघांत एक विशेष फरक आहे तो पाहूं.

सॉक्रेटिसाची दृष्टि सत्यसशोधनाची होती, सोफिस्टांची तशी नव्हती. सॉक्रेटिसाला सत्याचें महत्त्व सर्वश्रेष्ठ वाटे, सोफिस्ट सत्याकडे कानाडोळा करीत. तत्कालीन तरुणांची मनोवृत्ति साशंकतेची होती हें वर निदर्शित केलेंच आहे. सॉक्रेटिसाचा विरोध साशंकतेला नव्हता; उलट प्रत्येकानें साशंक असावें असा

त्याचा आग्रह असे. मात्र ही साशंकता धार्मिक व सामाजिक बंधनांतून मुक्त होऊन सुखप्राप्ति सुकर व्हावी येवढ्याचकरितां नसावी, ती सत्यान्वेषणाकरितां असावी असें तो म्हणे. मन साशंक असल्याशिवाय तें सत्यान्वेषणाच्यामार्गी लागत नाहीं. सत्यप्रेमी सत्याच्या लाभाकरितां हरएक प्रकारचा त्याग करण्यास तयार असतो. एक सत्य सांपडलें, तर तो दुसरें शोधण्याच्या मार्गांत असतो. त्याच्या कार्यांत खळ पडत नाहीं. इंग्रजींत 'साशंक' या अर्थी 'Sceptic'[१] शब्द आहे. पुढें या शब्दाला धर्मावर विश्वास न ठेवणारा, पाखंडी असा दुसरा अर्थ आला, व या दुसऱ्या अर्थानें हा शब्द आतां वापरतात. पण सॉक्रेटिसाच्या काळीं या शब्दाचा मूळ अर्थच रूढ होता. सोफिस्टांची साशंकता मात्र दुसऱ्या अर्थानें होती. ग्रीक तरुणांत या काळांत उत्पन्न झालेली साशंकता अशा प्रकारची होती.

सॉक्रेटिसावर ॲथेन्सच्या अधिकाऱ्यांनीं आरोप ठेवून खटला भरला त्या वेळची त्या नगरची परिस्थिति वर सांगितल्याप्रमाणें होती. या खटल्याची सविस्तर हकीगत खालीं दिल्याप्रमाणें आहे.

खि. पू. ३९९ सालीं मेलेटस नांवाच्या एका नागरिकानें सॉक्रेटिसाचा ॲथेन्सच्या देवदेवतांवर विश्वास नाहीं, तो नवीन देवदेवता स्थापूं पाहतो, त्याचप्रमाणें ॲथेन्समधील तरुणांना भलभलत्या गोष्टी सांगून त्यांचीं मनें बिघडवितो असे आरोप करून त्याच्यावर न्यायालयांत फिर्याद केली. त्याची सविस्तर हकीगत देण्यापूर्वी हा खटला कसा चालला हें पूर्णपणें लक्षांत येण्यास ॲथेन्समधील न्यायालयें व न्यायदानपद्धति यांचें ज्ञान असणें अवश्य आहे. आपल्याकडील न्यायालयांवरून त्या न्यायालयाची कल्पना येणार नाहीं. ॲथेनिअन न्यायालयांत ५०१ पंच[२] असत. सांप्रतच्या काळांत पंचांचें काम आरोपी अपराधी कीं निरपराधी येवढेंच सांगण्याचें असतें. आरोपीला दोषी किंवा निर्दोषी ठरवून शिक्षा देण्याचें किंवा सोडून देण्याचें काम न्यायाधीश करतो. हें न्यायाधिशाचें काम ॲथेन्समध्यें पंचांनाच करावयाचें असे. न्यायकचेरींत न्यायाधिशाची अशी वेगळी नेमणूक होत नसे. खटला चालूं असतांना कांहीं

१. Grk. 'Scepsis = Philosophical doubt.

२. पंचांना 'Dicasts' म्हणत.

कारणानें प्रेक्षकांत गोंगाट झाल्यास सॉक्रेटिसाला गोंगाट बंद करण्याविषयीं पंचांना विनंति करावी लागे. अशी विनंति आपण न्यायाधिशाला करतों. सॉक्रेटिसाला ती पंचांनाच उद्देशून करावी लागे. आपल्या न्यायालयांत होणारी वकिलांचीं व साक्षीदारांचीं भाषणें न्यायाधिशाला उद्देशून करावीं लागतात. आपले पंच न्यायकचेरींत होणारीं वकिलांचीं भाषणें किंवा इतर चालूं असलेलें कामकाज शांतपणें ऐकतात व पाहतात प्रेक्षकांनासुद्धां स्वस्थ बसून निमूटपणें काय चाललें आहे तें पाहावयाचें असतें. अँथेनिअन न्याया-लयांतील प्रेक्षकवर्ग आरोपी वगैरेंच्या भाषणांवर मोठ्या उत्सुकतेनें मोठ-मोठ्यानें अनुकूल किंवा प्रतिकूल मतप्रदर्शन करी. वेळीं एखाद्याचें भाषण पसंत न पडल्यास " खालीं बसा " अशा आरोळ्या ठोकून प्रेक्षक भाषण थांबवीत.

वर सांगितल्याप्रमाणें मेलेटसनें आरोप करून सॉक्रेटिसाला न्यायाल्यांत खेंचलें होतें. त्याला लिकॉन नांवाच्या एका नागरिकाचा पाठिंबा होता. पण या फिर्यादीचा खरा सूत्रधार ॲनिटस नांवाचा एक कांतडीं विकणारा होता. तो राजकारणांत उत्साहानें भाग घेत असे. ' तीस अधिकाऱ्यांची बारभाई ' उलथून टाकून लोकसत्ता स्थापन करण्याच्या कामीं त्यानें कष्ट केले होते, तसेंच हालहि सोसले होते. त्याकारणानें लोकांत मानाचें स्थान मिळून त्याचें नाग-रिकांवर वजन असें. राजकारणी कार्यकर्त्यांतहि त्याच्या शब्दाला मान होता. पण त्याच्या पक्षांतील लोकांना आपल्या कार्याचें सयुक्तिक समर्थन करतां येत नसे व सॉक्रेटीस त्यांच्यावर स्पष्टपणें टीका करी. टीकेचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. हे लोक सॉक्रेटिसावर नेहमीं नाराज असत. वरील तीन्ही फिर्यादी याच पक्षांतले होते. ॲथेन्समधील शिक्षणपद्धतीवर एकदां सॉक्रेटिसानें कडक टीका केली होती. ती ॲनिटसला पसंत न पडून तो चिडून सॉक्रेटिसाला म्हणाला, " सॉक्रेटीस, तुम्हीं मागचापुढचा विचार न करतां उठतां बसतां लोकांवर टीकास्त्र धरीत असतां. आपण या बाबत थोडी काळजी घ्यावी असें मला तुम्हांला सुचवावेंसें वाटतें " असें प्लेटोनें आपल्या ' मेनो ' नामक संभाषणांत दाखविलें आहे.

मेलेटसनें न्यायालयांत पंचांच्यापुढें केलेला आरोप असा होता :—
" पिथसचा नागरिक मेलेटस, त्याचा मुलगा मी मेलेटस शपथ घेऊन सॉक्रे-

टिसावर असा आरोप करतों कीं ॲलोपिसीचा रहिवासी सॉफ्रॉनिकस, त्याचा मुलगा सॉक्रेटीस; या सॉक्रेटिसाची ॲथेन्सच्या देवदेवतांवर श्रद्धा नाहीं, तो नवीन नवीन देवदेवता प्रचारांत आणीत आहे. यामुळें हा गुन्हेगार ठरतो. शिवाय हा तरुणांना बिघडवितो हा त्याचा दुसरा अपराध. या अपराधां-करितां शिक्षा देहान्त." ॲथेन्सच्या कायद्याप्रमाणें फिर्यादीनेंच आरोपीची शिक्षा ठरवावयाची असे. प्रचलित देवतांवर अश्रद्धा व नवीन देवांची निर्मिति हा त्या काळीं भौतिक तत्त्वज्ञान्यांवर नेहमींचा आरोप असे. तरुणांना बिघडविण्याचा आरोप सोफिस्टांवर होई. सॉक्रेटीसहि सोफिस्ट अशी समजूत असल्यामुळें त्याच्यावर हा दुसरा आरोप आला.

खटल्याची पुढील हकीगत समजण्यापूर्वी ॲथेन्समधील न्यायालयांत खटला चालण्याची पद्धति माहीत होणें अवश्य आहे. एकंदर तीन भागांनीं खटला चाले असे. प्रथम फिर्यादीचीं भाषणें, नंतर आरोपी व त्याचे पाठीराखे स्नेही यांचीं बचावाचीं भाषणें, व शेवटीं न्यायाधिशांचें म्हणजे पंचांचें मत-निदर्शन व निकाल. या वेळीं आरोपी अपराधी ठरल्यास फिर्यादी आरोपीची शिक्षा सुचवी. शिक्षा कडक असल्यास कायद्यानें आरोपीला सौम्य शिक्षेची मागणी करतां येई, व तिच्या समर्थनार्थ भाषण करतां येई. पंचांच्या अंतः-करणांत दया उत्पन्न करण्याकरितां आपल्या बायकामुलांसहि त्यांच्यापुढें उभीं करण्यास त्याला मोकळीक असे. हें झाल्यावर पंचांनीं फिर्यादीनें सुचविलेल्या शिक्षेचा व फिर्यादीच्या दयेच्या याचनेचा विचार करून शिक्षा सांगावयाची. त्यांनीं देहान्त शिक्षा कायम केल्यास अकरा अधिकारी आरोपीला कारागृहात घेऊन जात. सॉक्रेटिसाला पंचांनीं देहान्त शासन सांगितल्यावर त्यानें पुन्हां एकदां भाषण केलें असें प्लेटोनें 'ॲपॉलॉजी'त दाखविलें आहे. पण ॲथे-निअन पंचांनीं आपल्या निकालानंतर सॉक्रेटिसाला भाषण कसें करूं दिलें असा प्रश्न येतो. तथापि प्लेटो स्वतः न्यायालयांत खटला चालू असतांना उपस्थित होता, तेव्हां त्यानें वस्तुस्थितीला सोडून लिहिलें नसावें. कसेंहि असलें तरी या बचावाच्या भाषणांत सॉक्रेटिसाचें व्यक्तिमत्त्व उतरलेलें असल्या-मुळें त्याचा सारांश येथें देण्यासारखा आहे.

सॉक्रेटिसानें आपल्या भाषणांत आरोप करणाऱ्यांचे दोन वर्ग केले. पहिल्या वर्गांत अनेक वर्षें नसते आरोप करणारे ॲरिस्टॉफेन्ससारखे नागरिक व दुसऱ्या

वर्गांत मेलेटस व त्याचे सहकारी येतात. प्रथम त्याने पहिल्या वर्गातील लोकांच्या आरोपांचें खंडन केलें. सॉक्रेटीस पंचांना उद्देशून म्हणाला, “ मी सोफिस्टहि नाहीं व भौतिक तत्त्ववादीहि नाहीं. ‘ सॉक्रेटीस सर्वांत शहाणा ’ असा डेलफायचा कौल मिळाल्यानंतर मी लोकांशीं संभाषण करून व त्यांना प्रश्न विचारून त्यांच्या ज्ञानाचा कस पाहूं लागलों म्हणून हे लोक माझ्यावर नाराज आहेत. आपलें अज्ञान उघडकीस आणलेलें माणसाला आवडत नाहीं. मी त्यांच्या अज्ञानावरील बुरखा दूर करूं लागलों त्याची त्यांना चीड आली. या पहिल्या वर्गातील आपल्यासारख्या नागरिकांचीच मला अधिक भीति वाटते. कारण बाल्यावस्थेपासून त्यांचे हे आरोप आपल्या कानांवर येत असल्याकारणानें आपल्या मनावर त्यांचा परिणाम झालेला असणार. आपण माझे पंच; आपण माझ्यावरील आरोपांचा निकाल करणार. या आक्षेपकांच्या टीकेनें आपल्या मनांत असें येत राहणार कीं सॉक्रेटीस नांवाचा एक आपल्याला शहाणा म्हणविणारा माणूस नागरिकांना खोट्यानाट्या गोष्टी सांगून त्यांना भलत्या मार्गाला लावतो. तो देवदेवतांसंबंधीं अविश्वास उत्पन्न करतो, पाताळाविषयीं कांहींच्याबाही विवेचन करतो, व भिकार गोष्टींना सोज्वल रूप देतो. मला खरें म्हणाल तर याच आक्षेपकांची भीति अधिक वाटते. कारण त्यांना व त्यांच्या श्रोत्यांना देवदेवतांची चर्चा करणारा, चिकित्सा करणारा मनुष्य नास्तिक वाटतो. त्यांचें म्हणणें खोडून काढणारा त्या वेळीं कोणी नसल्यामुळें आपल्या बालमनावर त्यांच्या म्हणण्याचा परिणाम होऊन माझ्याविषयीं आपल्या मनांत पूर्वग्रह उत्पन्न झालेला असणार. ”

पहिल्या वर्गातील आक्षेपकांनंतर सॉक्रेटीस मेलेटस, ॲनिटस व लिकॉन यांच्याकडे वळतो. प्रथम तो मेलेटसची उलट तपासणी घेतो. तिच्यांत मेलेटसचीं परस्परविरुद्ध, विसंगत उत्तरें येतात. तो एखाद्या लहान मुलाप्रमाणें मेलेटसला खेळवितो. ही तपासणी झाल्यावर सॉक्रेटीस बचावाचें भाषण करतो. तो म्हणतो :—

“ माझ्यावर माझ्या शत्रूंचे आरोप तरी काय आहेत ? ‘ सॉक्रेटीस समाजाला अपायकारक आहे कारण तो स्वर्गपाताळाविषयीं भलत्या कल्पना तरुणांच्या मनांत भरवितो, दुष्ट गोष्टींना तर्कांचें सोज्वळ रूप देतो, व आपलीं पाखंडी मतें लोकांत पसरवूं पाहतो. ’ ॲरिस्टॉफेन्स नाटककारानें आपल्या ‘ मेघ ’

नाटकांतील सॉक्रेटिसाला एका लोंबत्या टोपलींत बसवून झोंके घेतांना दाखविलें आहे, व ' मला हवेंत अधांतरीं चालतां येते ' वगैरे ज्यांचें मला यत्किंचितहि ज्ञान नाहीं अशा बाष्कळ गोष्टी त्याच्याकडून वदविल्या आहेत. यावर मला कोणी असें विचारील कीं, ' सॉक्रेटीस, या तुझ्या लोकांचें अज्ञान दाखविण्याच्या नादानें तूं आपल्यावर केवढें संकट ओढवून घेतो आहेस हें तुझ्या लक्षांत कसें येत नाहीं ? वेळेवर तुझ्या प्राणांवरसुद्धां बेतेल हें तुला कसें समजत नाहीं ? ' असा प्रश्न स्वाभाविक आहे, व त्याचें उत्तर देणेंहि मला अवघड नाहीं. मी रणांगणावर आपली कामगिरी किती कसोशीनें केली आहे हें आपण जाणतां. तेथें मानवी सेनानींनीं नेमून दिलेलें क्षेत्र मीं सोडलें नाहीं; तर मग जीवित-कार्याचें परमेश्वरानें आंखून दिलेलें क्षेत्र मी कसा सोडणार ? तें मला शक्य नाहीं. हें कार्य मीं सोडावें या अटीवर देहान्त शासनापासूनसुद्धां सुटका करून घेणें माझ्या हातून घडणार नाहीं, व त्याकरितां नागरिकांनीं माझ्यावर राग करण्याचें कारण नाहीं. एखादी गांधील माशी आळशी, मंद घोड्याला चावा घेऊन पळावयास लावते, त्याप्रमाणें परमेश्वरानें तुम्हांला चिमटे घेऊन जागें करण्याकरितां माझी योजना केली आहे. देहान्त शिक्षा देऊन तुम्हीं मला जगांतून कायमचें नाहींसें केलेंत तर तुमचेंच नुकसान होणार आहे. माझ्यामागें तुमचें खरें हित पाहून तें साधणारा पुरुष मिळणें कठीण पडेल. माझें सर्व आयुष्य तुमच्या हितार्थ मी वेंचीत आलों आहे. मी राजकारणांत भाग घेतला असता तर यापूर्वींच मला मृत्यूनें गांठलें असतें. कारण सर्व शहरभर इतका अन्याय भरला आहे कीं त्याला मी माझी सर्व शक्ति एकवटून विरोध केल्या-वांचून राहिलों नसतों, व त्याचा व्हावयाचा तो परिणाम झाला असता. तें असो. मला माझ्या आरोपाविषयीं येवढेंच सांगावयाचें आहे कीं अँथेन्सचा नागरिक या नात्यानें मी कायद्याला धरून वागलों आहे. माझीं संभाषणें उघड्या बाजारांत सर्वांसमक्ष होत असतात. तीं सर्वांना खुलीं असतात. मीं जर तरुणांना बिघडविलें तर कांहीं इतर नागरिक तरी माझ्यावर तसा आरोप कां करीत नाहींत ? त्यांना पुढें येण्याचें धैर्य होत नसेल तर त्यांच्या वडील मंडळींनीं किंवा नातेवाइकांनीं कां पुढें येऊं नये ? त्याला कारण एकच. तें हें कीं सॉक्रेटीस सत्य असेल तेंच बोलतो; ॲनिटस मात्र असत्यप्रेमी आहे ". सॉक्रेटिसाला पंचांना येवढेंच सांगावयाचें होतें. त्यांच्या मनांत दया उत्पन्न

करून त्याला दयेची याचना करावयाची नव्हती. असें करणें ॲथेन्सच्या नागरिकाला लाजिरवाणें आहे असें तो म्हणे. शिवाय कायद्याप्रमाणें वागून न्याय करण्याची पंचांनीं शपथ घेतलेली असते. दया उत्पन्न करून त्यांना भावनावश करणें म्हणजे त्यांना घेतलेली शपथ मोडण्यास लावण्यासारखें आहे असें तो म्हणे. " मी जर सत्याला सोडून वागलों व दयेची याचना करूं लागलों तर ' सॉक्रेटीस अधार्मिक आहे ' असा माझ्यावर येणारा आरोप मींच सिद्ध केल्यासारखें होईल " असें शेवटीं सांगून सॉक्रेटिसानें आपलें भाषण संपविलें.

या नंतर पंचांनीं २८१ विरुद्ध २२० मतांनीं सॉक्रेटिसाला दोषी ठरविलें. फिर्यादी मेलेटस यानें देहान्त शिक्षाच या अपराधाला अवश्य हें सकारण दाखविण्याकरितां भाषण केलें. ॲथेन्सच्या कायद्याप्रमाणें आरोपीला सौम्य शिक्षा सुचविण्याची परवानगी असे, तिला अनुसरून सॉक्रेटिसानें पुढील भाषण केलें :—

" बहुमतानें मी अपराधी ठरणार अशी माझी अटकळ होतीच, तेव्हां दुसरी शिक्षा काय सुचवावी याचा मी विचार करीत होतों. मी निरपराधी आहें अशी माझी खात्री आहे. वास्तविक मी नागरिकांचा हितकर्ता आहें. त्यांच्या कल्याणार्थ मीं केलेलें कार्य लक्षांत घेऊन ॲथेन्सच्या जनतेनें ' प्रिटेनिअम् '[1] मध्यें ऑलिंपिअन खेळांतील यशस्वी खेळाडूंप्रमाणें माझा योगक्षेम चालवावा. विचार करतां मला अमकी शिक्षा व्हावी असें मीं कां सुचवावें ? मी अन्यायी नाहीं असें माझी मनोदेवता मला सांगते. दुसरें असें कीं मृत्यु इष्ट कीं अनिष्ट हें मला माहीत नाहीं. दुसरी कोणतीहि शिक्षा अनिष्टकारक हें कळत असून ती कशी सुचवावी ? दंडाच्या शिक्षेंत अनिष्टकारक असें कांहीं नाहीं. ती सुचवावी तर दंड भरण्यास मजजवळ काय आहे ? मी दरिद्रीनारायण. संपत्ति, कुटुंबाचें कल्याण, सैन्यांतील अधिकार, जनतेपुढील वक्तृत्व, राजकार्यांतील अधिकाराच्या जागा वगैरे बाबी पुष्कळांना मोलाच्या वाटतात.

---

१. प्रिटेनिअम् ( Prytaneum ). या शब्दाचा मूळ अर्थ नगरमंदिर. अशीं मंदिरें प्राचीन ग्रीक नगरराज्यांत सर्व शहरांत असत. मंदिरांत ' प्रिटेन्स ' ( मॅजिस्ट्रेट ) जमत असत. मंदिरांत आपल्या कार्यांनीं नगराला अलंकृत करणाऱ्या थोर पुरुषांचा नगरराज्याच्या खर्चानें सन्मान होई व चरितार्थहि चाले.

या सर्वांवर मीं केव्हांच पाणी सोडलें. या भानगडींत माझ्यासारख्या सत्याभिमानी माणसाला जागा नाहीं हें मीं ओळखलें होतें. माझ्या या भाषणावरून मी हट्टी व गर्विष्ठ आहे असा तुमचा ग्रह होईल, पण तो बरोबर नाहीं. देहान्त शिक्षेचा खटला एक दिवसांत संपलाच पाहिजे असा कायद्याचा निर्बंध नसता तर मीं अधिक भाषण करून मी निरपराधी आहें अशी आपली खात्री केली असती. मी अपराधी असें माझें मन मला सांगत नसतांना केवळ जीव वांचविण्याकरितां मी अपराध पदरांत बांधून घेणार नाहीं. मला कोणी विचारील, 'सॉक्रेटीस, तूं ॲथेन्स सोडून गेल्यास काम भागेल. तूं तसें कां करीत नाहींस?' त्याला उत्तर येवढेंच कीं असें करणें माझ्याबाबतींत वाटतें इतकें सोपें नाहीं. कारण अशा रीतीनें शिक्षा टाळून माझ्या मनाला शांति मिळणार नाहीं. ॲथेन्स सोडल्यावर परमेश्वरानें नेमून दिलेलें कार्य मला पार पाडतां येणार नाहीं व माझ्या हातून आज्ञाभंग घडेल. आणखी असें पाहा कीं, आपल्या वरिष्ठाची आज्ञा न पाळणें अत्यंत लज्जास्पद व घातकारक आहे असें मी समजतों. मग तो वरिष्ठ माणूस असो किंवा परमेश्वर असो. 'सॉक्रेटीस, एक वेळ आम्ही तुला क्षमा करतों, तूं आपल्या ह्या अंगीकृत कार्यापासून परावृत्त हो' असेंहि तुम्ही मला म्हणाल, पण तें मला मान्य होणार नाहीं. नागरिक हो, माझ्या मनांत आपल्याविषयीं अत्यंत आदर व प्रेम आहे. तथापि परमेश्वराची आज्ञा पाळणें हें माझें पहिलें कर्तव्य आहे. जोंपर्यंत माझ्या शरिरांत ही प्राणज्योत तेवत आहे तोंपर्यंत माझ्या पवित्र व्रतापासून मी काडीभरहि ढळणार नाहीं. माझ्या मित्रांनो, ही कामगिरी परमेश्वरानें माझ्यावर सोंपविल्याबद्दल तुम्ही आपल्याला भाग्यवान समजा. तुम्ही आपल्या आत्म्याची उन्नति करण्याकडे लक्ष द्या हेंच ना मी तुम्हांला शिकवितों. मला एकदांच काय, पण अनेकदां मरणाची शिक्षा झाली तरी माझें व्रत मी सोडणार नाहीं. मेलेटस व ॲनिटस मला इजा करूं शकणार नाहींत. परमेश्वर दुष्टांपासून सज्जनांचें रक्षण करतो. नगरबंधूंनो, ह्या भाषणानें मला आपला जीव वांचवावयाचा आहे असें समजूं नका. पण येवढें मात्र खरें कीं माझ्या देहान्त शासनानें तुम्ही खास पापाचे धनी व्हाल. माझ्यामागें माझी जागा घेणारा तुम्हांला दुसरा कोणी आढळणार नाहीं. कायद्याप्रमाणें मला सौम्य, दंडाची शिक्षा सुचवितां

येईल. पण नुकतेंच म्हटल्याप्रमाणें मी दरिद्रीनारायण. तथापि, मी एक मिना[1] दंड देऊं शकेन. तेव्हां मला एक मिना दंड व्हावा असें मी सुचवितों, किंवा वाटल्यास माझ्या मित्रांच्या सूचनेप्रमाणें तीस मीना दंड करावा, कारण इतका दंड भरण्याची जबाबदारी ते घेत आहेत. ''

या भाषणानंतर पंचांना सॉक्रेटिसाला देहान्त शिक्षा देणें भाग पडलें. शिवाय त्याचें कार्य त्यांच्या मनांत डांचत होतेंच. त्याला जगांतून नाहींसा केल्याशिवाय आपल्यामागचें हें शुक्लकाष्ठ थांबणार नाहीं, तो अशींच प्रश्नोत्तरें करून आपलें अन्यायी वर्तन लोकांपुढें मांडीत राहणार, असा विचार करून पंचांनीं शिक्षा सांगितल्यावर खटला संपतो. पण त्याला आणखी एक भाषण करण्याची परवानगी मिळते असें प्लेटोनें ' ॲपॉलॉजी 'त दाखविलें आहे. हें भाषण प्रतिकूल व अनुकूल मतें देणाऱ्या दोन्ही पंचांना उद्देशून केलें आहे. आपल्याविरुद्ध मतें देणाऱ्यांची त्यांच्या अन्यायी मतदानाबद्दल तो तीव्र शब्दांनीं निंदा करतो, व या अन्यायाचा पुढें अनिष्ट परिणाम होऊन त्यांच्यावर आपत्ति कोसळेल असें बजावून सांगतो. सॉक्रेटीस शेवटीं त्यांना उद्देशून म्हणाला, '' ॲथेनिअन नागरिक हो, या शिक्षेमुळें तुमची दुष्कीर्ति होईल. ' शहाण्या माणसाला तुम्हीं मारलें ' असें लोक तुमच्या तोंडावर म्हणतील......मनुष्याच्या अंतकालीं त्याची भविष्यवाणी अत्यंत तेजस्वी व प्रखर असते. मी तुमचें भविष्य तुम्हांला सांगतों. माझ्या मृत्यूनंतर मृत्यूपेक्षांहि भयंकर आपत्ति तुमच्यावर कोसळेल. तरुण पिढी तुमच्या अन्यायाचा सूड उगवील. '' हें भविष्य पुढें खरें ठरलें.

अनुकूल मतें देणाऱ्या पंचांना उद्देशून सॉक्रेटीस म्हणाला, '' तुम्ही आनंदांत राहा; तुम्हांला माझ्याकरितां दुःख होण्याचें कारण नाहीं. मृत्यु म्हणजे चिरकाल टिकणारी, स्वप्नरहित निद्राच; किंवा मृत्यु हा इहलोकापेक्षां सरस अशा लोकास जाण्याचा प्रवास. त्या लोकांत थोर पुरुषांची गांठ पडते. वरील दोन गोष्टींपैकीं कोणतीहि खरी असली तरी मृत्यु हितकारकच आहे. माझा मृत्यु परमेश्वरी इच्छेनें होत आहे. माझा पाठीराखा दीमन लहानसहान बाबतींतसुद्धां एखादें कृत्य त्याज्य असल्यास पूर्वसूचना देतो, पण या खटल्यांत

१. १ मिना = ४ पौंड.

मी सकाळीं घर सोडल्यापासून तशी एकहि सूचना मिळाली नाहीं. हा मृत्यु मला उपकारकच असला पाहिजे. शेवटीं पंचांना मला एकच विनंति करावयाची आहे. ती येवढीच कीं, जर कांहीं कारणानें माझे मुलगे तुमच्यापुढें येण्याचा प्रसंग आला व त्या वेळीं ते सद्गुणांपेक्षां संपत्तीला अधिक मान देतात व स्वतः कुचकामाचे असून आपल्याला मोठे समजतात असें तुम्हांला आढळून आलें तर मीं जशी आज तुमची कानउघाडणी केली तशी तुम्हीं त्यांची करा. पण आतां आपण एकमेकांचे निरोप घेण्याची वेळ आली आहे. मी मृत्यूच्या स्वाधीन होण्याकरितां व तुम्ही जिवंत राहण्याकरितां. जीवन व मृत्यु यांत सरस काय हें एक परमेश्वरच जाणतो. ''

प्लेटोच्या ' ॲपॉलॉजीं 'तील हीं भाषणें सॉक्रेटिसाच्या पंचांपुढें प्रत्यक्ष केलेल्या भाषणांशीं कितपत उतरतील असा प्रश्न येथें स्वाभाविकपणें उत्पन्न होतो. झेनोफॉनच्या ' मेमोरिअल्स 'वरून येवढें मात्र समजून येतें कीं पंचांना विनंति करून व त्यांची थोडीशी मनधरणी करून त्याला अनुकूल मत मिळवितां आलें असतें. झेनोफॉनच्या सांगण्याप्रमाणें त्यानें बचावाचें भाषण तयार करूं नये असा देवानें कौल दिला होता. रिडेलनें ' ॲपॉलॉजीं 'तलीं भाषणें प्लेटोच्याच लेखणींतून उतरलीं आहेत असें सिद्ध केलें आहे. उलटपक्षीं जर्मन लेखक ट्सेलरचें म्हणणें असें कीं हीं भाषणें सॉक्रेटिसाचीं स्वतःचींच आहेत व तसें त्यानें आपल्या बाजूनें सिद्ध केलें आहे. या भाषणांची भाषा कृत्रिम व अलंकारिक आहे, या भाषेची पद्धति प्लेटोची दिसते व विशेष म्हणजे झेनोफॉनचें मत नास्तिपक्षीं आहे असें रिडेलचें म्हणणें. हीं संभाषणें सॉक्रेटिसाचीं स्वतःचीं असोत किंवा प्लेटोच्या लेखणींतून उतरलेलीं असोत; तीं कोणाचींहि असलीं तरी त्यांत न्यायालयांतील सॉक्रेटिसाचें चित्र वाचकांपुढें हुबेहूब उभें राहतें. प्लेटोच्या लेखणीनें तत्कालीन न्यायालय व तेथील कार्य यांची आपल्याला बरोबर कल्पना आणून दिली आहे. हीं भाषणें खरोखर सॉक्रेटिसाचीं कीं प्लेटोचीं हा प्रश्न ऐतिहासिक सत्यशोधनाच्या दृष्टीनें महत्त्वाचा असला तरी आपल्याला तो गौण आहे. प्लेटो खटला चालू असतांना न्यायालयांत हजर होता. सॉक्रेटिसानें आपला बचाव कसा केला हें त्यानें प्रत्यक्ष पाहिलें होतें. त्याला आपल्या गुरूविषयीं फार आदर होता. असें असतांना त्याचीं हीं भाषणें सत्याला सोडून असतील असें वाटण्याचें कारण नाहीं.

वर दिलेल्या आरोपांपेक्षां सॉक्रेटिसावर आणखी विशेष आरोप कोणते होते यांविषयीं स्पष्ट उल्लेख कोठें दिसत नाहीं. सरकारद्रोही गुन्हे आपल्या हातून घडले नाहींत असें तो 'अ‍ॅपॉलॉजी'त म्हणतो. झेनोफॉननें आपल्या पुस्तकांत त्याचे नागरिकांना वाटणारे कांहीं अपराध निदर्शित केले आहेत. अ‍ॅथेन्समधील गुप्त मतदानानें सरकारी अधिकारी निवडण्याची पद्धति सॉक्रेटिसाला पसंत नव्हती. तिच्यांतील दोष दाखवून राज्यघटनेविषयीं तो अनादर उत्पन्न करतो असा एक आरोप त्याच्याविरुद्ध होत असे. आपल्याला उपयोगी पडणाऱ्या नागरिकांवरच त्याचें खरें प्रेम असतें व फक्त त्यांच्याविषयींच आदर बाळगण्यास तो तरुणांस सांगतो. अ‍ॅलिसबायडीज व क्रिटिअस यांच्या गुन्ह्यांना जबाबदार सॉक्रेटीसच असा लोकप्रवाद होता होमर व हिसिऑड यांच्या काव्यांतून आपल्याला अनुकूल असे उतारे घेऊन त्यांचा तो दुरुपयोग करतो असाहि एक आक्षेप त्याच्यावर होता. सॉक्रेटिसाला मतदानपद्धति मान्य नव्हती, तिच्यावर तो टीका करी हें निर्विवाद आहे. त्याचप्रमाणें राजकारण ही एक कला आहे, ती अत्यंत महत्त्वाची आहे. तिच्यांत प्राविण्य मिळविण्यास शिक्षण, ज्ञान व कुशलता इतर कलांपेक्षां अधिक लागतात; केवळ मतदानानें राजकारणी अधिकाऱ्यांची निवड करणें अनिष्टकारक आहे असें तो म्हणत असे. हे सर्व आक्षेप त्याच्याविरुद्ध येत. त्यांचा उल्लेख न्यायालयांत आरोपींनीं थोडाफार केला होता. तथापि त्यांचा खरा, विशेष भर दिलेला आरोप सॉक्रेटीस आपल्या शिकवणीनें तरुणांस बिघडवितो हा होता.

कायद्याच्या दृष्टीनें न्यायालयांतील पंचांचा निकाल योग्य होता, तरी विचारी माणसास तो मान्य होण्यासारखा नव्हता. सॉक्रेटिसाची वागणूक केव्हांहि कायद्याविरुद्ध नसे. कायदे पसंत पडोत वा न पडोत, ते पाळणें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे असें त्याचें म्हणणें असें. अ‍ॅथेन्सचा धर्म त्याला मान्य होता व म्हणूनच तो प्रार्थना वगैरे धार्मिक कृत्यें वेळेवर करी. अ‍ॅथेन्समधील राजकीय संस्थांतून सुधारणा व्हावी, त्या सदोष आहेत, असें त्याचें मत होतें व तें तो स्पष्ट बोलून दाखवी. तथापि त्या संस्थांच्या कायद्यांचें त्यानें उल्लंघन केव्हांहि केलें नाहीं. आपल्या मताच्या समर्थनार्थ तो केव्हां केव्हां ग्रीक कवि होमर व हिसिऑड यांच्या काव्यांतील उतारे तरुणांना म्हणून दाखवितो अशी एक त्याच्याविरुद्ध तक्रार होती. पण त्याचा

देशाभिमान विचारांत घेतल्यास केवळ कांहीं उतारे मतसमर्थनार्थ तरुणांना म्हणून दाखविले हा विचारी माणसाला गुन्हा वाटणार नाहीं.

पंचांचा निकाल विचारी जनतेला पटणारा नसला तरी ॲथेन्सच्या नागरिकांना सामान्यतः तो मान्य होण्यासारखा होता. सॉक्रेटिसाच्या खटल्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टि निराळी होती. सॉक्रेटीस सुधारणाप्रिय होता. धर्म, राजकारण, शिक्षण वगैरे सर्व बाबतींत अधिकाऱ्यांचें व रूढींचें वर्चस्व गाजून जनतेची विचारशक्ति नष्टप्राय झाली होती, व त्याकारणानें सर्वत्र दोष उत्पन्न झाले होते. धर्म, राजकारण वगैरे क्षेत्रांतील दोष नाहींसे व्हावेत यासाठीं त्याला या सर्व क्षेत्रांत सुधारणा हवी होती व तेवढ्याकरितां तो जनतेंत जागृति उत्पन्न करीत होता. त्याच्या प्रयत्नाला ॲथेन्सच्या तरुण नागरिकांत चांगलें यश येत होतें. रूढींच्या प्रवाहांत वाहात जाणाऱ्या पुराणमतवादी नागरिकांना सॉक्रेटीस तरुणांना बिघडविण्यास व शहराची बसलेली घडी विसकटविण्यास कारण होणार आहे असें स्वाभाविकपणें वाटलें. पण हा कांटा सहज निघण्यासारखा नव्हता. तो पंचांच्या निकालानें कायमचा निघणार हें पाहून या लोकांना आनंदच झाला.

ॲथेन्समधील त्या वेळचें राजकारण पाहिल्यास मेलेट्स, ॲनिटस व लिकॉन यांनीं सॉक्रेटिसाला न्यायालयांत खेंचलें याचा अधिक उलगडा होण्यासारखा आहे. त्या वेळीं ॲथेन्सच्या राजकारणांत मुख्यत्वेंकरून दोन पक्ष वावरत होते. एक अल्पसंख्याक पक्ष ( Oligarchic Party ) व दुसरा लोकसत्ताक पक्ष ( Democratic Party ). या दोन्ही पक्षांना विरोध करणारा ( Moderate Oligarchs ) नांवाचा तिसरा मवाळ अल्पसंख्याक पक्ष होता. पक्षाचें सहकार्य मिळविण्याच्या उद्देशानें पहिल्या दोन पक्षांनीं आपल्या पक्षांतील सभासदांची संख्या वाढविली. तिसऱ्या पक्षाचा नेता थिरॅमिनीस आपल्या पक्षाचा कार्यभाग साधण्याच्या हेतूनें प्रथम अल्पसंख्याक पक्षाला मिळाला, पण तेथें आपलें जमेल असें न वाटून तो लोकसत्ताक पक्षांत सामील झाला. पण या पक्षानें वरवर जरी थिरॅमिनीसला आपण त्याची सल्लामसलत घेतों असें दाखविलें तरी सत्ता आपल्याच हातांत ठेविली होती. या अस्थिर वातावरणामुळें राजकारणाचा पाया ढांसळल्यासारखा होऊन अल्पसंख्याकांना मागें सारून लोकसत्ताक पक्ष सत्ताधीश

झाला. अल्पपक्षानें तीन कार्यांचा कार्यक्रम आंखला होता. पहिलें, पायदळांत ( Hoplites ) लष्करी काम करण्यास नकार देणाऱ्या नागरिकांचे हक्क काढून घेणें; दुसरें, राजकारणांतील कार्यकर्त्यांचें वेतन बंद करणें; तिसरें, गुप्त मतदान-पद्धतीनें चिठ्ठ्या टाकून मॅजिस्ट्रेट्स्‌ची निवड करणें. सॉक्रेटीस दुसऱ्या व तिसऱ्या कलमांना अनुकूल होता, त्यामुळें तो मवाळ अल्पपक्षाचा कैवारी ठरला. त्यामुळें सत्ताधारी लोकसत्ताक पक्ष नाराज झाला. त्याला आपलीं मतें तर्कशुद्ध पद्धतीनें तरुणांना पटवून देणाऱ्या सॉक्रेटिसाची एक अडचण वाटूं लागली. त्यांच्याच प्रेरणेनें वरील नागरिकांनीं सॉक्रेटिसावर आरोप केले असावेत. राजकारणांत पक्षापक्षांमध्यें कशा उलाढाली होत असतात तें आजहि आपण प्रत्यहीं पाहतों. सॉक्रेटिसावर आलेला प्रसंग पाहून त्याच्या मित्रांनीं या लढ्यांतून आपलें अंग काढून घेतलें व प्राण वांचविण्याकरितां नगरत्याग स्वीकारला. पुढें कांहीं दिवसांनीं ते परत आले पण त्यानंतर ते राजकारणांत केव्हांहि पडले नाहींत. त्यांच्यापैकीं विशेष प्रख्यात प्लेटो. त्यानें आपल्याला तत्त्वविवेचनाच्या कार्याला वाहून घेतलें व पुन्हां प्रचलित राजकारणाकडे तोंड फिरविलें नाहीं. इतकेंच नाहीं, तर राजकारण सर्वस्वीं सोडल्याचें त्यानें स्पष्ट शब्दांनीं जाहीर केलें.

मानवी व्यवहाराविषयींचे प्रचलित रूढ प्रचार कसे पोकळ तर्कविरुद्ध आहेत, व त्यांमुळें नागरिकांचें कसें अनहित होतें हें दाखविण्याच्या हेतूनें सॉक्रेटिसाचें संभाषणद्वारा सत्यसंशोधनाचें कार्य चालूं होतें. त्याच्यावर येणाऱ्या आक्षेपांवरून तत्कालीन ग्रीक लोकांची आपल्या नगरराज्याविषयींची भावना समजून घेण्यासारखी आहे. ग्रीक मनुष्याला आपल्या नगरांतील रूढ चाली नगरराज्याचे कायदेच असें वाटे. त्या काळीं ग्रीसमध्यें ‘ राज्य ’ शब्दाचा अर्थ आतांच्यापेक्षां निराळा होता. राज्य ही केवळ नागरिकांची मालमत्ता व प्राणरक्षण करण्याकरितां निर्माण झालेली संस्था नसून जिच्याविषयीं नागरिकांनीं पूज्यभाव बाळगावा अशी पवित्र संस्था या दृष्टीनें ग्रीक नागरिक आपल्या नगरराज्याकडे पाहात असत. नगरराज्य ही त्यांची एक धार्मिक बाब असे. ही त्यांची भावना लक्षांत ठेविली तर नगरराज्यपद्धतीवर, रूढ चालीरीतींवर व मतांवर टीका करून त्यांचा फोलपणा दाखविण्याऱ्या सॉक्रेटिसावर लोकांचा इतका प्रखर कटाक्ष कां असावा व फिर्यादींची मजल देहान्त शिक्षेपर्यंत

कां जावी हें समजणें अवघड नाहीं. बचावाच्या भाषणांत सॉक्रेटिसानें आपल्या मतांच्या समर्थनावर भर दिला याचेंहि कारण हेंच. हीं भाषणें म्हणजे त्याचें तत्त्वज्ञान व जीवनक्रम यांचें समर्थनच म्हटल्यास चालेल. त्यानें आपल्या भाषणांत क्षमेची याचना केव्हांहि केली नाहीं किंवा आपल्या कृत्यांबद्दल एका शब्दानेंसुद्धां पश्चात्ताप दाखविला नाहीं. ॲथेनिअन नागरिकांविषयीं त्यानें केव्हांहि अनादराची भाषा वापरली नाहीं. न्यायालयांतील भाषणांत तो नागरिकांचा आदरपूर्वक प्रेमानें उल्लेख करतो. त्यांच्याशीं त्याचें भांडण नव्हतें. त्यांच्या अज्ञानाबद्दल त्याला खरोखर वाईट वाटून त्यांच्या विचारांतील चुका दाखवून त्यांचें अज्ञान दूर करण्याचा त्यानें आमरण प्रयत्न केला. त्यांची अन्यायमूलक आज्ञा त्यानें पाळली नाहीं हीच काय ती त्याची त्यांच्याविरुद्ध वागणूक. या वागणुकीचे कितीहि घोर परिणाम असले तरी त्यानें त्यांची पर्वा केली नाहीं.

ॲथेन्सच्या नागरिकांना पुढें आपल्या कृत्याचा लवकरच पश्चात्ताप झाला. त्यांनीं मिलिटसला ठार मारलें असें ॲलेक्झँड्रिआचे लोक म्हणत असत. नागरिकांनीं सॉक्रेटिसाचा एक पुतळा उभा केला असेंहि त्यांचें म्हणणें होतें. पण या शब्दांवर अलीकडील लेखक विश्वास ठेवीत नाहींत. आतांचें सामान्यपणें मान्य झालेलें मत असें आहे कीं सॉक्रेटीस ॲलिसबायडीज व क्रिटो यांना आपल्याविरुद्ध चिथावणी देत आहे असें वाटून राजकारणी नागरिकांना सॉक्रेटिसाची धास्ती वाटूं लागली होती. सॉक्रेटिसानें ही कारवाई करूं नये येवढीच त्यांची इच्छा होती. तो जगांतून नाहींसा व्हावा असें त्यांना वाटत नव्हतें. ॲथेन्सच्या सर्वच नागरिकांचें त्याच्याशीं वैर होतें असें नाहीं. त्याच्या मृत्यूनें कांहीं नागरिकांना मनापासून बरें वाटलें, पण पुष्कळांना फार दुःख झालें.

● ● ●

## ५. कारागृहवास : विषप्राशन

सॉक्रेटिसाच्या न्यायालयांतील शेवटच्या भाषणानंतर कारागृहाच्या अधि-काऱ्यांनीं त्याला कारागृहांत नेऊन पायांत बेड्या ठोकून कोंडून ठेवलें. ॲथेन्सच्या कायद्याप्रमाणें देहान्त शिक्षा पंचांनीं शिक्षा सांगितल्यानंतर चोवीस तासांच्या आंत अंमलांत यावयास पाहिजे होती. पण या कायद्याला एक अपवाद होता. डेलॉस येथें एक ॲपॉलोचें देवालय होतें. ॲथेनिअन नागरिकांना दरवर्षी या ठिकाणीं कांहीं खंडणी जहाजांतून पाठवावयाची असे. हें जहाज ॲथेन्सहून सुटल्यानंतर परत येईपर्यंत देहान्त शिक्षा अंमलांत आणावयाची नाहीं असा नियम होता. हें खंडणीचें जहाज नुकतेंच रवाना झाल्याकारणानें सॉक्रेटिसाची शिक्षा अंमलांत आणणें महिनाभर लांबणीवर पडलें होतें. हा महिन्याचा कारागृहवास व नंतर त्याला शेवटीं करावें लागलेलें विषप्राशन हे दोन्ही भाग महत्त्वाचे आहेत. दोन्ही भागांत त्याचे स्वभावविशेष व उच्च कोटींतील सद्‌गुण ठळकपणानें दिसून येतात.

हे भाग प्लेटोनें आपल्या ' क्रिटो ' व ' फीडो ' या संभाषणांत उत्कृष्ट रंगविले आहेत. या संभाषणांत आलेल्या गोष्टी प्रत्यक्ष घडून आल्या किंवा नाहीं हें ठरविण्यास कांहीं साधन नाहीं. कदाचित् प्लेटोच्या कल्पनासृष्टींतीलहि त्या असूं शकतील. प्लेटोची कल्पनाशक्ति असाधारण होती यांत शंका नाहीं; तथापि एक गोष्ट सत्य कीं सॉक्रेटिसाच्या स्नेहीमंडळींना त्याचे प्राण वांचवावे असें वाटत होतें, व म्हणून स्वाभाविकपणें कारागृहांतून पळून जाण्याविषयीं त्यांनीं त्याला सुचविलें असावें. तुरुंगांतून पळून जाण्याचा मार्ग ॲथेनिअन

नागरिकांच्या अंगवळणीं पडला होता. 'फीडो' मध्यें विषप्राशनाची हकीगत प्लेटोनें वर्णिली आहे. या संभाषणांत चरित्रविषयक भागाबरोबर आत्म्याच्या अमरत्वाविषयीं कांहीं तात्त्विक विवेचन आलें आहे. प्रस्तुत प्रकरणांत चरित्र-विषयकच माहिती द्यावयाची आहे. या दोन्ही भागांत येणारा चरित्रविषयक भाग केवळ त्रोटक शब्दांनीं देण्यापेक्षां प्लेटोच्याच संभाषणांतून अवश्य तितका घेतल्यास अधिक मनोरंजक व उद्बोधक होईल. त्यांत रेखाटलेलें सॉक्रेटिसाचें स्वभाव-चित्रहि यथार्थ पाहावयास सांपडेल.

क्रिटो नांवाचा एक धनाढ्य नागरिक सॉक्रेटिसाचा जिवाभावाचा स्नेही होता. त्यानें डेलॉसचें जहाज परत येईतों आपल्या स्वतःच्या जामीनकीवर सॉक्रेटिसाला मोकळें सोडावें अशी पंचांना विनंति केली होती, पण ती त्यांनीं मान्य केली नाहीं. सॉक्रेटीस तुरुंगांत गेल्यावर क्रिटोनें त्याची भेट घेतली. त्या वेळीं झालेल्या संभाषणाचा कांहीं भाग पुढें दिला आहे.

**सॉक्रे.**—क्रिटो, इतक्या लवकर तुम्ही कां आलांत ?

**क्रिटो**—जरा लवकर खरेंच, नुकतेंच उजाडलें आहे.

**सॉक्रे.**—पण तुम्हांला अधिकाऱ्यांनीं आंत सोडलें ही नवलाची गोष्ट आहे. तुम्हांला येऊन वेळ तरी किती झाला ?

**क्रिटो**—झाला थोडासा वेळ.

**सॉक्रे.**—मग मुकाट्यानें कां बसलां ? मला कां उठविलें नाहीं ?

**क्रिटो**—सॉक्रेटीस, खरोखर काय सांगावें ! दुःखामुळें माझी झोंप अगदीं उडाल्यासारखी झाली आहे; असें झालें नसतें तर बरें झालें असतें. तुम्हांला अशा प्रसंगीं इतकी गाढ झोंप येत असलेली पाहून मला आश्चर्य वाटतें. तुमच्या विश्रांतीला व्यत्यय येऊं नये म्हणून मीं तुमची झोंपमोड केली नाहीं. यापूर्वी अनेकदां मीं तुमची समाधानी वृत्ति पाहिली आहे. पण ही आतांची मृत्यूची आपत्ति विनाआयास इतक्या शांतपणानें सहन करतां हें विशेष आहे.

**सॉक्रे.**—इतक्या उतारवयांत मी जर मृत्यूवर राग केला तर तो वेडेपणाच ! पण तें असो. तुम्ही इतक्या सकाळींच इकडे कां आलां ?

**क्रिटो**—तुम्हांला एक कटु वार्ता सांगावयाची आहे. तुम्हांला ती कटु नाहीं, पण मला आणि तुमच्या सर्व मित्रांना ती जितकी कटु तितकीच दुःख-दायक आहे.

**सॉक्रे.**—कां, जहाज डेलॉसहून परत आलें वाटतें ? माझा देहान्त त्याच्या येण्यावर अवलंबून आहे.

**क्रिटो**—नाहीं, जहाज आलें आहे असें नाहीं. पण तें आज येईल अशी बातमी आहे. असें झालें तर, सॉक्रेटीस, तुमच्या आयुष्याचा अंत उद्यां होणार!

**सॉक्रे.**—देवांची इच्छा असली तर तसें होवो! पण जहाज आज येईल असें वाटत नाहीं.

**क्रिटो**—कां बरें ?

**सॉक्रे.**—नुकतेंच मला रात्रीं स्वप्न पडलें. बरें झालें तुम्हीं मला उठविलें नाहीं.

**क्रिटो**—काय बरें तें स्वप्न ?

**सॉक्रे.**—पांढरें स्वच्छ वस्त्र परिधान केलेली एक गोरीपान सुंदर स्त्री माझ्याकडे येतांना दिसली. ती हांक मारून मला म्हणाली, "सॉक्रेटीस, तूं सुंदर थिआ प्रांताला आजपासून तिसऱ्या दिवशीं पोहोंचशील."[१]

**क्रिटो**—खरेंच, मोठें चमत्कारिक स्वप्न!

**सॉक्रे.**—पण मला तरी निदान त्याचा अर्थ स्पष्ट दिसतो.

**क्रिटो**—होय, पूर्णपणें स्पष्ट आहे. पण, सॉक्रेटीस, माझें ऐकून तुम्ही आपले प्राण वांचवा अशी तुम्हांला मला शेवटची विनंति करावयाची आहे. तुमचें मरण म्हणजे आपत्तिसर्वस्व! तुमच्या मृत्यूनें मला पुनः कधीं लाभणार नाहीं अशा मित्राला मी अंतरेन. येवढेंच नाहीं, तर ज्यांना तुमचा माझा स्नेहसंबंध माहीत नाहीं त्यांचा असा अपवाद येईल कीं मी थोडाफार पैसा खर्चण्यास तयार झालों असतों तर तुमची सुटका झाली असती, पण मी आपल्या पदराला खार लावून घेण्यास तयार नव्हतों. सॉक्रेटीस, याच्यापेक्षां अधिक निंदास्पद असें काय असणार ? आम्हीं द्रव्य देऊन तुमची सुटका करण्यास तयार होतों, पण तुम्हीं तें नाकारलें या म्हणण्यावर जगाचा विश्वास बसणार नाहीं.

**सॉक्रे.**—पण, भल्या गृहस्था, जगाच्या मताची आपण येवढी काळजी

१. 'The third day hence shalt thou fair Phthia reach'—Homer.

कां करावी ? ज्यांच्या शब्दाला किंमत द्यावीशी वाटते तें थोर लोक आपल्यावर विश्वास ठेवतील.

**क्रिटो**—सॉक्रेटीस, जगाच्या म्हणण्यालासुद्धां किंमत द्यावी लागते. तुमचीच गोष्ट घ्या ना. जगाचा आरोप खोटा असला तरीसुद्धां तो माणसाचा सर्वस्वीं नाश करूं शकतो हें तुमच्याच आतांच्या स्थितीवरून दिसेल. तथापि हा विचार आपण बाजूला ठेवूं. तुम्हांला मी व तुमची इतर मित्रमंडळी यांच्यावर गदा येईल अशी भीति वाटते का ? तुम्ही तुरुंगांतून पळून गेलांत तर आम्हीं तुम्हांला या कामीं मदत केली, या कामांत आमचें अंग होतें असें लोक म्हणूं लागतील, आम्हांला अधिकाऱ्यांपासून त्रास होईल, दंड भरावा लागेल, वेळेवर आमची मालमत्ताहि जप्त होईल, किंवा दुसरीहि एखादी कडक शिक्षा तुमच्याकरितां आम्हांला भोगावी लागेल असें तुम्हांस वाटत असावें. त्याबद्दल तुम्ही काळजी करूं नका. तुमचे प्राण वांचविण्याकरितां ह्या सर्व प्रसंगांना तोंड देणें हें आम्ही आमचें कर्तव्य समजतों. कृपा करून आमची विनंति मान्य करा.

**सॉक्रे.**—मला हीच भीति वाटते. भीति वाटण्याचीं दुसरींहि कारणें आहेत.

**क्रिटो**—आमच्याविषयीं तुम्ही मुळींच काळजी करूं नका. फारसें द्रव्य खर्च न करतां आम्हांला तुमची येथून सुटका करतां येईल. ही बातमी बाहेर फोडणाऱ्यांचीं तोंडें बंद करण्यासहि फार खर्च करावयास नको. माझें स्वतःचें द्रव्य मी या कामीं खर्च करणार आहें. तें थोडें असलें तरी तेवढ्यांत काम भागेल. माझा पैसा घेणें तुम्हांला पसंत नसेल, तर दुसरे इतर शहरांचे कांहीं नागरिक खर्च करण्यास तयार आहेत. थीब्जचा रहिवासी सिमिॲस तर खर्चाकरितां लागणारी रक्कम घेऊनच आला आहे. त्याच्याप्रमाणें सिबीस व इतर कांहीं लोक तयार आहेत. सर्व तयारी झाली आहे. तुम्ही कृपा करून नाहीं म्हणूं नका. 'ॲथेन्स सोडून मी कोठें जाणार ?' असें तुम्हांला वाटेल. असें तुम्ही न्यायालयांत म्हणालां होतां. हा प्रश्न येण्याचें कारण नाहीं. इतर पुष्कळ शहरांत तुमचें स्वागत होईल. वाटल्यास तुम्ही थेसलींत राहा. तेथेंहि माझे पुष्कळ मित्र आहेत. ते आनंदानें तुम्हांला आश्रय देतील.

सॉक्रेटीस, तुम्ही चुकत आहां. प्राण वांचविण्याऐवजीं मरण पतकरून

तुम्ही नेमकें तुमच्या शत्रूंना इष्ट तीच गोष्ट करीत आहां. त्यांना तुमची पीडा कायमची नाहींशी व्हावयास पाहिजे आहे. त्याहीपेक्षां विचार करण्याची गोष्ट म्हणजे तुम्हीं मरणामुळें आपल्या मुलांबाळांना वाऱ्यावर सोडल्यासारखें होणार आहे. तुम्ही जिवंत राहिलांत तर त्यांचें शिक्षण करून त्यांना मार्गाला लावाल. आपल्या मुलांच्या शिक्षणाची, त्यांना योग्य वळण लावण्याची जबाबदारी आपल्यावर असते याची तुम्हांला जाणीव नाहीं का ? मला तर असें वाटूं लागलें आहे कीं तुम्ही आजपर्यंत सद्‌गुणांवर भर देऊन बोलत आलांत, आणि आतां मात्र शूर, सद्‌गुणी पुरुषाप्रमाणें न वागतां कमकुवत मनानें आपली जबाबदारी टाळीत आहां. तुमची आतांची वागणूक तुम्हांला, मला व माझ्या मित्रांना, सर्वांनाच लज्जास्पद आहे. लोकांची समजूत अशी होणार कीं न्यायालयांत जाण्याचें कांहीं कारण नसतां तुम्ही जाऊन पंचांपुढें उभे राहिलां, बचावाचें भाषण केलें, आणि आतां प्राण वांचविण्याची आलेली संधि गमवतां, या सर्व गोष्टींना तुमचा भ्याडपणाच कारण. ही घटना, सॉक्रेटीस, तुम्हांला घातक होईल, इतकेंच नाहीं तर ती तुम्हां-आम्हांला दोघांनाहि निंदास्पद होणार आहे. आतां विचार करण्यासुद्धां अवधि नाहीं. काय करायचें तें आजच्या रात्रींच घडलें पाहिजे. पळाच्या विलंबानेंसुद्धां आपला नाश होणार आहे. सॉक्रेटीस, तुम्हांला मी पुन्हां आग्रहाची विनंति करतों, कृपा करून माझें म्हणणें मान्य करा.

**सॉक्रे.**—प्रिय क्रिटो, माझे प्राण वांचविण्याची तुमची इच्छा योग्य असल्यास ती बहुमोल आहे; पण ती जर अयोग्य असेल तर ती अत्यंत घातक होईल. तुमच्या योजनेप्रमाणें वागावें किंवा वागूं नये ह्याचा विचार केला पाहिजे. मी आजपर्यंत तर्कशुद्ध शब्दांवरच विश्वास ठेवीत आलों आहे. असे शब्दच फक्त खरे अशी विचारांतीं माझी खात्री झाली आहे. माझ्यावर आतां हें संकट आलें आहे म्हणून माझी तर्कशुद्ध विचारसरणी मी बाजूला सारणार नाहीं. या कारागृहांत रात्रीं पळून जाणें म्हणजे अर्थात् ॲथेन्सच्या पंचांना – नागरिकांना – न जुमानतां, त्यांचा निकाल डावलून जाणें हें खरें ना ?

**क्रिटो**—होय, तुमचें म्हणणें बरोबर आहे.

**सॉक्रे.**—तर मग अशा रीतीनें नागरिकांच्या मान्यतेशिवाय निघून जाणें न्याय्य कीं अन्याय्य हें पाहिलें पाहिजे. तुम्ही म्हणतां लोक मला नांवें ठेवतील,

भ्याड म्हणतील, मीं जबाबदारी टाळली अशी निंदा करतील. पण बहुजन मला काय म्हणेल याचा विचार करण्यापेक्षां एकच सूज्ञ माणूस – ज्याला न्याय्यान्याय्य समजतें आहे असा एकच माणूस – खरोखर काय म्हणेल हें लक्षांत आणणें श्रेयस्कर असें तुम्ही कबूल कराल. या दृष्टीनें विचार करून जर पळून जाणें हेंच न्याय्य ठरलें तर पळून जाण्याचा विचार करतां येईल. तें अन्याय्य असा कौल मिळाला तर तो विचार सोडून देऊं. माझ्या सुटकेकरितां होणारा खर्च, लोकनिंदा, मुलांबाळांच्या शिक्षणाची हेळसांड, त्यांची होणारी आबाळ वगैरे प्रश्न तुम्हीं पुढें आणलेत; पण, क्रिटो, ज्यांना एखाद्याला सहज लीलेनें यमसदनास पाठवितां येतें किंवा तितक्याच सहज रीतीनें त्याचा जीव वांचवितां येतो, अशा लोकांच्या मनांतील हे प्रश्न आहेत. आपला मार्गदर्शक कोण ? तर्कशुद्ध विचार ना ? लांचलुचपत देऊन मीं सुटका करून घ्यावी कीं नाहीं हें शुद्ध तर्कानें ठरविलें पाहिजे. त्यानें सुटकेला प्रतिकूल मत दिल्यास आपण मृत्यु आणि त्याच्याबरोबर येणाऱ्या दुसऱ्याहि आपत्ति पतकरणेंच इष्ट होईल.

**क्रिटो**—सॉक्रेटीस, तुमचें म्हणणें बरोबर आहे. पण आपण आतां करावयाचें काय ?

**सॉक्रे.**—तें आपण सर्वजण मिळून विचार करून ठरवूं. माझें म्हणणें तुम्हांला खोडून काढतां आल्यास माझी खात्री होऊन मी तुमच्या सांगीप्रमाणें वागेन. पण तसें न झाल्यास नागरिकांच्या अनुमतीशिवाय सुटून जाण्याविषयीं मला आग्रह करूं नका. मी तुमच्या इच्छेप्रमाणें वागण्यास उत्सुक आहें. मी चुकत आहें असें तुम्हांला वाटतां कामा नये. माझ्या म्हणण्याचें आधारभूत तत्त्व तुम्हांला पटतें का पाहा. मी तुम्हांला कांहीं प्रश्न विचारतों त्यांचीं उत्तरें देतां आल्यास द्या.

**क्रिटो**—मी प्रयत्न करीन.

**सॉक्रे.**—न्याय्य, तर्कशुद्ध कृत्य केल्यानें येणारी मृत्यूसारखी आपत्ति टाळण्याकरितां अन्याय्य, अनैतिक आचरण करणें हें दुष्कृत्य नाहीं का ? तसेंच तें लज्जास्पदहि नाहीं का ?

**क्रिटो**—असें आचरण दुराचरणच.

**सॉक्रे.**—तर मग आपलें आचरण अन्याय्य असतां कामा नये.

**क्रिटो**—अर्थात्.

**सॉक्रे.**—आपल्या हातून अन्याय केव्हांही घडूं नये याचा अर्थ अन्यायाचासुद्धां प्रतिकार अन्यायानें करणें अन्यायच होईल ना ?

**क्रिटो**—होय, अन्यायानें प्रतिकार करणें ही चूकच.

**सॉक्रे.**—असें असेल तर अन्याय्य आचरण, अन्यायाचा अन्यायानें प्रतिकार, आपला घात करणाऱ्याचा घात करून घेतलेला सूड हीं सर्व अन्यायांत दुष्कृत्यांत मोडतात असें ठरलें. निदान मी असें आजपर्यंत मानीत आलों आहे. तुम्हांला याच्याविरुद्ध कांहीं म्हणावयाचें असल्यास सांगा.

**क्रिटो**—तुमचें मत मला सर्वस्वीं मान्य आहे.

**सॉक्रे.**—आतां मला सांगा मनुष्यानें ठरलेल्या नियमांनीं व कायद्यांनीं चालावें किंवा त्यांतून बचावासाठीं पळवाट काढावी ?

**क्रिटो**—नियमांनींच चालणें इष्ट.

**सॉक्रे.**—सरकारी अनुमतीशिवाय मीं सुटका करून घेतली तर मीं कायद्याचीं बंधनें तोडल्यासारखें होणार नाहीं का ? माझें असें वर्तन सरकारला घातक नाहीं का ?

**क्रिटो**—तुमचें म्हणणें मला नीटसें कळलें नाहीं.

**सॉक्रे.**—कल्पना करा कीं मी अगदीं पळून जाण्याच्या बेतांत आहे आणि इतक्यांत सरकारी अधिकारी व पंचमंडळी येऊन त्यांनीं मला विचारलें, " सॉक्रेटीस, हें तुम्हीं काय चालविलें आहे ? तुमच्या मनांत काय आहे ! तुम्ही पळून जाण्याचा प्रयत्न करून ॲथेन्सच्या न्यायव्यवस्थेचा किंबहुना सर्व ॲथेन्स शहराचा शक्य तितका नाश करीत नाहीं का ? ज्या राज्यांत कायद्याचा दरारा नाहीं, नागरिकांनीं तो वाटेल तेव्हां धाब्यावर बसवावा, तें राज्य टिकूं शकेल का ? " या प्रश्नांना, क्रिटो, आपल्याला काय उत्तर देतां येईल ? 'अधिकाऱ्यांनीं मला अन्यायानें शिक्षा दिली आहे' असें मीं म्हणावें का ?

**क्रिटो**—नाहीं, असें म्हणणें अयोग्य होईल.

**सॉक्रे.**—आणि समजा, न्यायाल्यांतील पंचांनीं मला विचारलें, "पंचांचा निकाल मान्य करावयाचा असा सर्व नागरिकांचा अर्थात् तुमचाहि संकेत नव्हता का ? रणांगणावर, न्यायाल्यांत व इतरत्र सर्व ठिकाणीं आपल्या

शहराची आज्ञा पाळणें हें नागरिकांचें कर्तव्य आहे. आज्ञा अन्यायाची असल्यास त्यांनीं तसें सिद्ध केलें पाहिजे. पण तसें कांहीं न करतां आज्ञाभंग करून शहराच्या नाशाला कारण होणें हा परमेश्वराच्या आज्ञेचा भंग होय. " क्रिटो, हें त्यांचें म्हणणें योग्य नाहीं का ?

**क्रिटो**—त्यांचें म्हणणें सयुक्तिक आहे.

**सॉक्रे.**—पुढें ते असें म्हणतील, " सॉक्रेटीस, आमची राज्यव्यवस्था, कायदे-कानू ज्या नागरिकाला मान्य नसतील त्याला शहर सोडून जाण्यास आम्हीं परवानगी दिली आहे हें तुम्हांला ठाऊक आहे. ज्या अर्थी तुम्हांला शहर सोडावेंसें वाटलें नाहीं त्या अर्थी तुम्हांला येथील राज्यव्यवस्था, कायदे-कानू मान्य आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. न्यायालयांत खटला चालण्याच्या वेळींहि तुम्हांला नगरत्याग करावयाला मोकळीक होती. पण त्या वेळीं तुम्हीं आढ्यतेनें मरण पतकरलें. ' नगरत्यागापेक्षां मी मृत्यू पतकरीन ' हे तुमचे शब्द होते. हें सर्व मान्य करून आतां तुम्ही पळण्याचा घाट घालून कायद्याचा अनादर व शहराचा नाश करण्यास तयार झालां आहांत याची तुम्हांला लाज नाहीं वाटत ? तुमच्या न्यायान्यायाच्या गप्पा, तुमची नीतीची चाड, तुमचें सत्यान्वेषण हीं सर्व आतां कोठें गेलीं ? " मला वाटतें माझी इतकी शोभा होण्याचा संभव असतांना तुम्ही माझें मन वळवूं शकणार नाहीं. तथापि तुम्हांला तसें करतां येईल असें वाटल्यास तुम्हांला काय सांगावयाचें असेल तें सांगा.

**क्रिटो**—यावर माझें बोलणेंच खुंटलें !

**सॉक्रे.**—तर मग, क्रिटो, ईश्वर दाखवील त्या मार्गानें आपण जाऊं.

याप्रमाणें शेवटपर्यंत तत्त्वनिष्ठ राहून सॉक्रेटिसानें क्रिटोच्या पळून जाण्याच्या योजनेला मान्यता दिली नाहीं. शेंवटीं डेलॉसहून एक महिन्यानंतर जहाज परत आलें व विषप्राशनानें शिक्षेची अंमलबजावणी झाली.

प्लेटोनें आपल्या ' फीडो ' नामक संभाषणांत विषप्राशनाची कथा चित्तवेधक शब्दांनीं सविस्तर सांगितली आहे. ही कथा प्लेटोच्या ' संभाषणां 'तूनच शक्य तितका त्याच्याच शब्दांचा अनुवाद करून येथें दिली आहे.

विषप्राशनाच्या दिवशीं सॉक्रेटिसाजवळ फीडो, क्रिटो वगैरे त्याची मित्रमंडळी बसली होती. फीडोचा स्नेही एखिक्रेटस यानें फीडोला त्या दिवशींची

साद्यंत हकीगत विचारली असतां त्या वेळीं त्यांचें झालेलें संभाषण प्लेटोनें कल्पनेनें रंगविलें आहे. हें संभाषण कल्पित असलें तरी त्यांतील विषप्राशनाच्या हकीगतीचा भाग ऐतिहासिक सत्य आहे असें मानण्यास हरकत नाहीं. प्लेटो त्या दिवशीं सॉक्रेटिसाजवळ नव्हता हें खरें, परंतु इतर त्याच्याजवळ असलेल्या नागरिकांकडून त्यानें सर्व हकीगत ऐकलेली असणार. प्लेटोच्या 'संभाषणां'तील कथासंबद्ध भाग पुढें दिला आहे :—

**एखिक्रेटस**—फीडो, सॉक्रेटिसांनीं विषप्राशन केलें त्या वेळीं तुम्ही तेथें स्वतः होतां का तुम्हांला ती हकीगत दुसऱ्यांकडून कळली ?

**फीडो**—मी स्वतः तेथें हजर होतों.

**एखि.**—तर मग मरणापूर्वी सॉक्रेटीस काय म्हणाले, त्यांना मृत्यु कशारीतीनें आला तें मला सांगतां का ? मला हें सर्व ऐकण्याची फार इच्छा आहे. त्यांनीं विषप्राशन केलें व त्यांचा अंत झाला येवढेंच आम्हांला समजलें आहे.

**फीडो**—डेलॉसचें जहाज परत येण्याला महिनाभर अवकाश असल्यामुळें त्यांची शिक्षा तितकी लांबली हें तुम्हांला कळलेंच असेल.

**एखि.**—होय, तें कळलें. पण त्यांच्या मृत्यूची सविस्तर हकीगत सांगा. मृत्युपूर्वी ते काय म्हणाले ? त्यांचे स्नेहीसोबती त्या वेळीं जवळ होते, का त्यांना जवळ राहण्यास अधिकाऱ्यांची परवानगी नव्हती वगैरे सर्व कांहीं कळूं द्या. गोष्टी घडल्या असतील अगदीं तशाच सांगा.

**फीडो**—बरें तर सांगतों. काय सांगूं, एखिक्रेटस, त्या दिवशीं माझ्या मनाची अगदीं अनपेक्षित अशी विलक्षण स्थिति झाली. फारच विलक्षण ती ! मृत्युसमयीं सॉक्रेटिसांच्या चेहऱ्यावर दिसणारें समाधान, त्यांच्या वागण्यांत व बोलण्यांत दिसत असलेली आनंदी वृत्ति, मनाची निर्भयता व अंतःकरणाची थोरवी या सर्वांचा माझ्यावर असा कांहीं अद्भुत परिणाम झाला कीं माझ्या प्रिय मित्राच्या मृत्यूच्या प्रसंगीं मी त्याच्याजवळ उभा आहें असें मला वाटलें नाहीं, किंवा त्याला येणाऱ्या मृत्यूचा खेदहि झाला नाहीं. माझी खात्री होती कीं सॉक्रेटिसांच्या परलोकींच्या यात्रेंत देवांची त्यांच्यावर काळजीपूर्वक नजर राहील व परलोकीं जर कोणाला सुख लाभणें शक्य असेल तर तें त्यांना लाभेल. या विचारामुळें मला त्यांच्या मृत्यूबद्दल खेद झाला नाहीं. मरणाच्या अगोदर

कांहीं काळ आमच्यांत तात्त्विक चर्चा चालली होती, पण नेहमींसारखें त्यांत माझें मन रमेना. हा थोर पुरुष थोड्याच वेळांत कालवश होणार या विचारानें मनांत सुख व दुःख यांची येरझार चालली होती. आमचें सर्वांचें त्या वेळीं आळीपाळीनें हंसणें व अश्रू ढाळणें चालू होतें.

**एखि.**—सॉक्रेटिसांजवळ त्या वेळीं कोण कोण होते ?

**फीडो**—अॅथेनिअन नागरिकांपैकीं अॅपोलोडोरस, क्रिटो व त्यांचा मुलगा क्रिटोब्युलस व आणखी पांचचारजण होते. प्लेटो आजारी असल्यामुळें येऊं शकला नाहीं.

**एखि.**—अॅथेन्साशिवाय इतर शहरांतील कोणी होते का ?

**फीडो**—थीब्ज व ईजिना येथील दोनचार मंडळी होती. नांव घेण्यासारखे म्हणजे मेगारा शहरचे युक्लीडीज आले होते. आतां त्या दिवसाची सर्व हकीगत शक्य तितकी सविस्तर सांगतों. विषप्राशनाच्या आदल्या दिवसापर्यंत मी व इतर मंडळी कारागृहाच्या जवळच असलेल्या न्यायालयांत सकाळीं जमत असूं. कारागृहाचा दरवाजा लवकर उघडत नसे. तोंपर्यंत आम्हीं आपआपसांत गप्पा मारीत कांहीं वेळ दरवाजा उघडण्याची वाट पाहात बसत असूं. दरवाजा उघडला म्हणजे आंत जाऊन आम्ही सर्व दिवस सॉक्रेटिसांच्या संगतींत घालविण्याचा प्रघात ठेविला होता. विषप्राशनाच्या आदल्या दिवशीं संध्याकाळीं डेलॉसचें जहाज आल्याची बातमी आली होती, त्यामुळें आम्ही त्या दिवशीं सकाळीं दररोजच्यापेक्षां लवकरच न्यायालयांत जमलों. कारागृहाचा दरवाजा उघडतांच आम्ही रोजच्याप्रमाणें आंत शिरूं लागलों तों ‘ मी तुम्हांला बोलावीन तोंपर्यंत आंत जावयाचें नाहीं ’ असें म्हणून द्वारपालानें आम्हांस हटकलें. ‘ आज असें कां ? ’ या आमच्या प्रश्नास, ‘ कारागृहाचे अकरा अधिकारी आतां येऊन सॉक्रेटिसांच्या बेड्या काढणार आहेत व आजच्या शिक्षेच्या समयीं कसें वागावयाचें त्याविषयीं त्यांना कांहीं सूचना देणार आहेत, म्हणून तुम्हांला आतांच सोडतां येत नाहीं ’ असें आम्हांस उत्तर मिळालें. थोड्याच वेळानें परवानगी मिळून आम्ही आंत गेलों. सॉक्रेटिसांच्या पायांतील शृंखला निघाल्या होत्या. त्यांची पत्नी झँटिपी तुम्हांला माहीत आहे. ती आपल्या लहान बालकाला घेऊन त्यांच्याजवळ बसली होती. आम्हांला पाहतांच ‘ सॉक्रेटीस, तुमच्या मित्रांची आणि तुमची आजची शेवटचीच भेट, शेवटचेंच

बोलणें चालणें ! ' असें म्हणून तिनें हंबरडा फोडला. ' क्रिटो, तिला कोणीतरी घरीं पोंचवा ' असें सॉक्रेटिसांनीं सांगितल्यावरून क्रिटोच्या गड्यांनीं तिला रडत ओरडत घरीं पोंचविलें. सॉक्रेटीस शांतपणें बिछान्यावर उठून बसले व पाय आंखडून घेऊन ते हातानें चोळूं लागले. पाय चोळीत चोळीत ते म्हणाले, ' मनुष्य सुख सुख म्हणून म्हणतो ती काय अजब चीज आहे ! त्याच्या उलट जें दुःख, त्याच्याशीं तरी या सुखाचा निगडित संबंध किती आश्चर्य-कारक आहे ! तीं दोन्ही मनुष्याला एकाच वेळीं भोगतां येणार नाहींत, पण त्यांपैकीं एकाच्यामागें लागून त्याची प्राप्ति झाल्यास त्याच्यामागोमाग दुसरें ठेवलेलेंच. जणूं कांहीं पाठीला पाठ चिकटलेलीं जुळीं भावंडेंच. मला वाटतें इसॉपनें त्यांच्यावर एक कल्पितच गोष्ट लिहिली असती. त्या गोष्टींत तो म्हणाला असता, " सुख व दुःख हीं दोघें एकदां भांडूं लागलीं व हें भांडण मिट-विण्याकरितां देव त्यांच्यामध्यें पडला. पण त्याच्यानें जेव्हां भांडण मिटेना तेव्हां त्यानें त्या दोघांचीं टोंकें एकमेकाला चिकटावून टाकलीं. तेव्हांपासून एकाच्या दर्शनाच्या पाठोपाठ दुसऱ्याचें दर्शन होतेंच होतें. " माझ्या बाबतींत आज तेंच घडत आहे. त्या शृंखलांनीं पाय दुखत होते, आतां त्या निघाल्यामुळें मला कितीतरी सुख होत आहे. '

सिबीज मध्येंच सॉक्रेटिसांना म्हणाला, " सॉक्रेटीस, बरी आठवण झाली. तुम्हांला एक प्रश्न विचारावासा वाटतो. तुम्हीं कारागृहांत ' ॲपॉलोचें स्तोत्र ' व ' इसॉपच्या गोष्टी ' काव्याच्या वृत्तबद्ध रचनेनें लिहिल्या आहेत. त्यांविषयीं कांहीं मित्रमंडळी विचारीत असतात. तुम्हीं यापूर्वी कवितेची एक ओळसुद्धां कधीं लिहिली नाहीं, मग आतांच ही स्फूर्ति कशी झाली ? एकदोन दिवसां-पूर्वीच इव्हेनसनें मला हा प्रश्न विचारला होता. तुम्हीं याचें कारण मला सांगि-तल्यास मला त्याच्या प्रश्नाचें उत्तर देतां येईल. इव्हेनस स्वतः काव्य करतो हें तुम्हांला माहीत आहे. " सॉक्रेटीस म्हणाले, " तर मग त्याला खरें काय तें कळूं दे. त्याला सांग कीं त्याच्याशीं किंवा त्याच्या काव्याशीं स्पर्धा करावी म्हणून ही रचना मीं केली नाहीं. त्याच्याशीं चढाओढ करणें फार कठीण आहे हें मी जाणून आहें. मला पडलेल्या कांहीं स्वप्नांचा अर्थ लावण्याच्या भरांत त्यांचा खरेपणा पाहण्याकरितां कवितारचनेचा मी केवळ प्रयोग करीत होतों. खरी गोष्ट अशी. सरकारनें माझ्यावर खटला भरण्यापूर्वी एकाच अर्थाचीं

अनेक स्वप्नें मला पडलीं होतीं. ' सॉक्रेटीस, काव्यरचना कर ' असा एकच ध्वनि त्या सर्वांतून निघत असे. शर्यतींत पळणाऱ्या तरुणांना ' धांवा, धांवा ', असें ओरडून प्रेक्षक प्रोत्साहन देतात, तसेंच मी माझें जीवितकार्य करीत असतांना मला हीं स्वप्नें प्रोत्साहन देतात, असें इतके दिवस वाटत असे. तत्त्वान्वेषण हेंच सर्वांत श्रेष्ठ काव्य अशी माझी समजूत होती. हेंच काव्य मी रचीत राहावें अशी या स्वप्नांची आग्रहाची सूचना होती असा मीं त्या वेळीं त्यांचा उलगडा केला. परंतु कारागृहांतहि जेव्हां तींच स्वप्नें पडूं लागलीं तेव्हां लौकिक अर्थानेंच काव्यरचना करावी असा आदेश असावा असा अर्थ घेऊन मीं ही रचना केली. येथेंहि मला ईश्वरी आज्ञा मोडवेना म्हणून इहलोकींची याला संपविण्यापूर्वी स्वप्नांतील सूचनेप्रमाणें काव्य करण्याचा मीं विचार केला. सुरुवातीच्या दिवशीं ॲपॉलोच्या जत्रेचा व अन्नसंतर्पणाचा दिवस असल्यामुळें त्या देवाचें स्तोत्र मीं रचिलें. नंतर मला ठाऊक असलेल्या व मला सहज मिळण्यासारख्या असलेल्या इसॉपच्या गोष्टींना कवितेचें रूप दिलें. माझ्या विचाराला असें वाटलें कीं कवि होऊं इच्छिणाऱ्या मनुष्याला सत्यकथेपेक्षां कल्पित कथाच घेणें योग्य. माझें व कल्पनेचें वावडें, यास्तव इसॉपच्या कथांचा आश्रय घेणें भाग पडलें. " यानंतर सॉक्रेटीस मला पुढें म्हणाले, " सिब्रीज, इव्हेनसला म्हणावें शहाणा असलास तर माझ्या पाठोपाठ शक्य तितक्या त्वकर इहलोकाचा निरोप घे. आज मी हें जग सोडीन असें वाटतें. "

त्यावर सिमिॲस सॉक्रेटिसांना म्हणाला, " ही तुमची सूचना किती चमत्कारिक ! इव्हेनसची व माझी पुष्कळदां भेट होते. त्याची मला जी काय माहिती आहे त्यावरून ही सूचना त्याला मानवेल असें वाटत नाहीं. "

सॉक्रेटीस म्हणाले, " कां बरें ? इव्हेनस तत्त्वज्ञानी नाहीं का ? तो तत्त्वज्ञानी आहे हें मला माहीत आहे. इव्हेनस किंवा दुसरा कोणीहि तत्त्वज्ञानाचा अभ्यासी मरणाचा आनंदानें स्वीकार करील. मात्र आत्महत्या करणें अयोग्य असल्याकारणानें तो आपल्या हातांनीं आपला गळा दाबणार नाहीं ही गोष्ट खरी. " इतकें बोलून सॉक्रेटिसांनीं आपले पाय बिछान्यावरून जमिनीवर ठेवले व पुढील सर्व संभाषण संपेपर्यंत ते तसेच पडून राहिले.

विषप्राशनाला अद्यापि थोडा अवकाश होता. त्या वेळांत सॉक्रेटिसांचें आपल्या मित्रमंडळीशीं आत्म्याच्या अमरत्वाविषयीं संभाषण झालें. संभाषणाच्या

अनुक्रम २८०७५ विभाग ... क्र. ...

शेवटीं "आतां विषप्राशनाची वेळ झाली आहे. अधिकारी येण्यापूर्वी मी स्नान करतों. स्नान आतांच उरकून घेतलें, म्हणजे मागाहून मृतदेहाला स्नान घालण्याचा तुमचा त्रास वांचेल", असें म्हणून सॉक्रेटीस स्नानाकरितां उठले. ते उठूं लागतांच क्रिटोनें त्यांना विचारलें, "सॉक्रेटीस, तुमच्या मुलांबाळां-विषयीं किंवा इतर गोष्टींविषयीं तुम्हांला मला किंवा इतर मित्रांना कांहीं शेवटीं सांगावयाचें आहे का ? आम्हांला तुमची कांहीं तरी सेवा करतां आली तर ती सांगा." सॉक्रेटीस म्हणाले, "मी आजपर्यंत सांगत आलों त्याप्रमाणें तुम्ही आचरण ठेवा म्हणजे माझी सेवा घडली. तुम्ही आपली स्वतःची काळजी घ्या म्हणजे माझी, माझ्या मुलांबाळांची सेवा केल्यासारखें होईल. पण स्वतःविषयीं निष्काळजी राहून आजपर्यंतचीं किंवा आतांच या घडीला झालेलीं संभाषणें व वादविवाद आचरणांत न आणाल तर मला आतां देणार असलेलीं वचनें निरर्थक ठरतील."

"आम्ही सर्वजण तुमच्या म्हणण्याप्रमाणें आचरण ठेवण्याचा होईल तितका प्रयत्न करूं" असें म्हणून क्रिटोनें विचारलें, "सॉक्रेटीस, तुमचा अंत्यविधि कसा करावयाचा तें कळल्यास बरें."

सॉक्रेटीस म्हणाले, "माझा अंत्यविधि तुमच्या इच्छेप्रमाणें करा. पण मला दोन्ही हातांनीं घट्ट धरून ठेवण्याची मात्र खबरदारी घ्या." नंतर ते माझ्याकडे पाहून हंसून म्हणाले, "फीडो, आतांपर्यंत तुमच्याशीं संभाषण करणारा, आपले विचार सुव्यवस्थितपणें मांडणारा, सॉक्रेटीस आहे, त्याचें शरीर नाहीं अशी मला क्रिटोची खात्री करतां येत नाहीं. त्याची अजून अशी समजूत आहे कीं माझें आतां लवकरच प्रेत होणारें भौतिक शरीरच सॉक्रेटीस. विषप्राशनानंतर मी तुमच्यामध्यें राहणार नाहीं, भाग्यवान लोकांचें सुख अनुभविण्यास मी पर-लोकीं जाईन असें सांगून मीं तुमचें समाधान केलें. माझ्या म्हणण्याची सत्यता सकारण पटवून देण्याची पराकाष्ठा केली. इतकें होऊन शेवटीं 'तुमचा अंत्य-विधि कसा करावयाचा ?' असें हा क्रिटो मला विचारतो, तेव्हां माझ्या बोलण्यावर पाणी पडलें असेंच ना ! न्यायालयांत खटल्याच्या वेळीं मी पळून जाणार नाहीं येवढ्याकरितां तो जामीन राहिला. आतां मृत्यूनंतर मी तुमच्या-मध्यें राहणार नाहीं, येथून निघून जाईन अशी त्याची खात्री पटविण्याकरितां तुम्ही मला जामीन राहा, म्हणजे त्याचें माझ्या मृत्यूचें दुःख कांहींसें कमी

होईल. माझें प्रेतभूत शरीर थडग्यांत ठेवतांना किंवा चितेवर त्याला अग्नि देतांना ' सॉक्रेटिसाला मृत्यूनंतर काय या यातना ! ' असें त्याला आतां वाटतें आहे तें वाटणार नाहीं. प्रिय क्रिटो, माझा अंत्यविधि असें म्हणतोस, पण अंत्यविधि माझा नाहीं माझ्या शरीराचा. बोलतांना शब्द यथार्थ न वापरणें ही केवळ साधी चूक नाहीं. तिचा आत्म्यावर परिणाम होतो, ती त्याला अधोगतीला नेते. माझ्या देहाची व्यवस्था तुम्हांला योग्य वाटेल तशी करा. मात्र ती माझ्या देहाची करीत आहांत, माझी नाहीं हें लक्षांत आणून दुःख करूं नका. उलट मी पुण्यलोकीं जात आहें म्हणून आनंद माना. तुम्हांला बरें वाटेल व योग्य दिसेल तसा माझ्या देहाचा अंत्यविधि करा. "

इतकें बोलून सॉक्रेटीस उठून स्नानाकरितां दुसऱ्या खोलींत गेले. आम्हांला तेथेंच बसावयास सांगून क्रिटो त्यांच्याबरोबर गेला. आम्ही चालू विषयाची चर्चा करीत व सॉक्रेटिसांवर आलेल्या आपत्तीचा विचार करीत बसून राहिलों. पित्याला मुकून आम्ही आतां पोरके होणार असें वाटूं लागलें. स्नान करून सॉक्रेटीस बाहेर आले. त्यांच्या मुलांना त्यांना भेटण्याकरितां आणिलें होतें. एक मुलगा मोठा होता, दोन ल्हान होते. त्यांच्याबरोबर कुटुंबांतील इतर स्त्रिया आल्या होत्या. क्रिटोच्या समोर त्यांच्याशीं चार शब्द बोलून व पुढें त्यांनीं कसें कसें वागावयाचें तें सांगून सॉक्रेटिसांनीं त्यांना घरीं पोंचविण्यास सांगितलें, व आपण आमच्यांत येऊन बसले. या वेळीं सूर्यास्ताचा समय झाला होता. कारागृहांतील अधिकाऱ्यांचा एक शिपाई त्यांच्याजवळ येऊन म्हणाला, " सॉक्रेटीस, तुम्ही इतर गुन्हेगारांसारखे नाहीं, तुम्ही विचारी आहां हें मला ठाऊक आहे. अधिकाऱ्यांच्या आज्ञेप्रमाणें मी विषाचा प्याला त्यांच्यापुढें करतों त्या वेळीं ते क्रुद्ध होऊन मला शिव्याशाप देतात. पण आजपर्यंत येथें आलेल्या अपराध्यांत तुमच्यासारखा थोर अंतःकरणाचा व सौम्य स्वभावाचा पुरुष मीं पाहिला नाहीं. तुम्ही माझ्यावर राग करणार नाहीं. ज्यांच्यावर या शिक्षेचा दोष येतो त्यांच्यावर तुमचा राग असणार. असो, माझा तुम्हांला शेवटचा रांम राम ! हा अटळ भोग होईल तितका हलका मानून सहन करण्याचा प्रयत्न करा. मी कां आलों हें तुम्हांला माहीत आहेच. " इतकें बोलून डोळ्यांतील अश्रू पुशीत तो बाहेर गेला.

तो जात असतांना सॉक्रेटीस वर त्याच्याकडे पाहून म्हणाले, " राम राम,

तूं म्हणतोस तसा मी वागेन. " नंतर आमच्याकडे वळून ते म्हणतात, " किती सभ्य व विनयशील हा माणूस ! महिनाभर मी येथें असतांना हा वारंवार माझी भेट घेई व कधीं कधीं माझ्याशीं बोलत बसे. याचें अंतःकरण किती थोर ! आतां पाहा माझ्याकरितां हा रडतो आहे. क्रिटो, चल, त्याची आज्ञा आपल्याला पाळली पाहिजे. विष तयार झालें असलें तर येऊं द्या; तयार नसलें तर तयार करण्याची व्यवस्था करा. "

क्रिटो म्हणाला, " नाहीं, सॉक्रेटीस, मला वाटतें सूर्य अद्यापि अस्तास गेला नाहीं, तो टेंकडीवर तळपत आहे. शिवाय मला माहीत आहे कीं विष-प्राशनाची सूचना मिळतांक्षणींच इतर अपराधी विषप्राशन करीत नाहींत. ते मनसोक्त खाऊन-पिऊन घेतात, मित्रमंडळीशीं चार शब्द बोलून सावकाश विषाचा प्याला हातांत घेतात. म्हणून म्हणतों कांहीं घाई करूं नका, अद्यापि अवधि आहे. "

सॉक्रेटीस म्हणाले, " क्रिटो, इतर अपराधी असें वागतात हें साहजिकच आहे. कारण अशा वागण्यानें आपला फायदा होतो अशी त्यांची समजूत असते. पण माझ्या हातून असें साहजिकच होणार नाहीं, कारण विषप्राशनाला विलंब केल्यानें मी कांहीं मिळवीन असें मला वाटत नाहीं. उलट आशाळ-भूतपणानें संपुष्टांत आलेलें आयुष्य घटका अर्धघटका वांचविण्याचा मला तिटकारा वाटतो. मुकाट्यानें विलंब न लावतां मी सांगतों त्याप्रमाणें करा. "

हे निकराचे शब्द ऐकून क्रिटोनें एका गुलामाला विषाचा प्याला आण-ण्यास सांगण्याविषयीं खूण केली. गुलाम बाहेर गेला व थोड्या वेळानें विष देणाऱ्या मनुष्याला घेऊन आला. त्या मनुष्याला सॉक्रेटीस म्हणाले, " विषप्राशनाच्या समयीं मीं काय करावयाचें, कसें वागायचें हें तुम्हांला माहीत असेलच. " सेवक म्हणाला, " तुम्ही फक्त हें ' हेमलॉक 'चें (Hemlock) विष प्राशन करून पाय जड होत आहेत असें वाटे तोंपर्यंत चालत राहा व नंतर स्वस्थ पडा. विष आपलें काम करील. " असें सांगून त्यानें आपल्या-बरोबर आणलेला विषाचा प्याला सॉक्रेटिसांच्या हातांत दिला. एखिक्रेटस, सॉक्रेटिसांनीं प्याला अगदीं शांतपणें हातांत घेतला. तो घेतांना त्यांचा हात कांपला नाहीं, किंवा चेहऱ्याचा रंग बदलला नाहीं. त्या सेवकाकडे टक लावून

त्यांनीं शांतपणें त्याला विचारलें, "पेल्यांतील याच पेयानें देवास अर्घ्यप्रदान करण्यास तुमची हरकत आहे काय ?" "सॉक्रेटीस, कार्यभागाला पुरेल इतकेंच विष आम्ही तयार करतों" असें सेवकानें उत्तर दिलें. सॉक्रेटीस म्हणाले, "समजलों. तरी पण निदान हा पुढचा प्रवास उत्कर्षकारक व्हावा अशी मला देवाची प्रार्थना केलीच पाहिजे. हीच माझी प्रार्थना. ती फलप्रद होवो." असें म्हणून शांतपणें, आनंदानें त्यांनीं विष प्राशन केलें. आतांपर्यंत आम्ही सर्वांनीं आपलें दुःख कसें तरी दाबून ठेवलें होतें, पण आतां मात्र राहावेना. कितीहि दाबून ठेवलें तरी माझ्या डोळ्यांतून अश्रू गळूं लागले. हातांनीं तोंड झांकून मी रडूं लागलों. माझें रुदन सॉक्रेटिसांकरितां नव्हतें, तें मी अशा थोर मित्राला अंतरलों हें माझें दुर्दैव म्हणून होतें. क्रिटोला तर विषाचा प्याला दिसतां क्षणींच अश्रू आवरेनात. तो विषप्राशन होतांना तें पाहण्यास खोलींत न थांबतां थोडा वेळ बाहेर निघून गेला. खोलींत आल्यापासूनच ॲपॉलो-डोरसचे डोळ्याचें पाणी खळलें नाहीं. आतां तर तो ओक्साबोक्सी रडूं लागला, आणि त्याच्या रडण्यानें एक सॉक्रेटीस सोडल्यास आम्हां सर्वांनाच भडभडून आलें ! हें पाहून सॉक्रेटीस आम्हांला म्हणाले, "तुम्हीं हें काय चालविलें आहे ? बायकांनीं रडून गोंधळ करूं नये म्हणून मीं त्यांना घरीं पाठविलें. माणसाच्या मृत्यूच्या समयीं भोंवतालीं शांतता असावी असें मीं ऐकलें आहे. तुम्हीं आतां शांतपणानें हें सर्व सहन करा. रडत बसूं नका." सॉक्रेटिसांचे हे शब्द ऐकून आम्हांला लाज वाटून आम्हीं रडूं आवरलें. सेवकानें केलेल्या सूचनेप्रमाणें पाय जड होई तोंपर्यंत ते चालत होते; नंतर खालीं पडून राहिले. विषाचा प्याला देणारा सेवक मधून मधून त्यांचे पाय व पोटऱ्या तपाशीत होता. थोड्या वेळानें पाय जोरानें दाबून त्यानें "तुम्हांला हा दाब समजतो आहे का ?" असें विचारलें. सॉक्रेटिसांकडून "नाहीं" असें उत्तर मिळतांच तो पाय, पोटऱ्या वगैरे वर वर तपाशीत गेला. सॉक्रेटिसांचें शरीर थंडगार पडून ताठ होऊं लागलें. त्यांना स्वतःला हें समजत होतें. ते म्हणाले, "असेंच काळजापर्यंत होत गेलें म्हणजे मृत्यु येईल." कमरेपर्यंत शरीर गार पडलें तेव्हां त्यांनीं तोंडावरील आच्छादन दूर केलें आणि ते म्हणाले, "क्रिटो, ॲस्लेपिअस देवाला एक कोंबडा देण्याचा मीं नवस केला होता. तो द्यावयाचा राहिला आहे, तो द्यावयास विसरूं नकोस." "तो नवस मी फेडीन" असें सांगून

क्रिटोनें त्यांना " तुमची आणखी कांहीं इच्छा आहे का ? " असें विचारलें, पण त्याच्या प्रश्नाला उत्तर मिळालें नाहीं. थोड्या वेळानें शरीर हलल्यासारखें दिसलें. जवळच्या सेवकानें पाहिलें तों सर्व कारभार आटपला होता ! क्रिटोनें सॉक्रेटिसांचें तोंड व डोळे आपल्या हातानें मिटले.

एखिक्रेटस, सर्वांत शहाणा, न्यायी व श्रेष्ठ अशा आपल्या या मित्राचा असा अंत झाला !

● ● ●

# ६. स्वभावविशेष

मानवी जीवनांत विचार, उच्चार आणि आचार यांचा मेळ फार थोड्या व्यक्तींत पाहावयास सांपडतो. संतश्रेष्ठ तुकाराम ' बोले तैसा चाले ' या कोटींतील पुरुषास वंदनीय मानतात. सॉक्रेटिसाची गणना अशा थोर पुरुषांत प्रामुख्यानें करणें योग्य होईल. अनेक अलौकिक गुणांचें तो माहेरघर होऊन बसला होता. तथापि या सर्वांत त्याचा सर्वश्रेष्ठ गुण विचाराप्रमाणें उच्चार व उच्चाराप्रमाणें आचार हाच होता.

सॉक्रेटिसाची परमेश्वरावरील अढळ श्रद्धा त्याच्या अनेक सद्‌गुणांचें अधिष्ठान होती. ' मी नास्तिक नाहीं, माझा देवावरील विश्वास इतरांच्यापेक्षां कणभर अधिकच आहे ', असें तो न्यायालयांत पंचांना ठांसून सांगतो. फक्त परमेश्वरच सर्वज्ञ आहे असें त्याचें म्हणणें असें. माझें जनसेवेचें सतत चालू असलेलें कार्य ईश्वरी संदेशामुळें होत आहे असें तो समजे. परमेश्वरावरील अढळ श्रद्धेमुळें त्याच्यांत धर्मनिष्ठा उत्पन्न झाली होती. त्याच्या सर्व जीवनावर येथून तेथून या निष्ठेची छाया पडलेली दिसते. प्रार्थना केल्याशिवाय त्याचा दिवस जात नसे. तो विषप्राशनाच्या वेळीं प्याल्यांतील विषानेंच अर्घ्यप्रदान करण्याची इच्छा प्रदर्शित करतो, पण तसें करणें शक्य नाहीं असें पाहून कोरड्या शब्दांनींच प्रार्थना करून तो आपली इच्छा पुरी करतो. अगदीं शेवटच्या क्षणीं ॲस्लेपिअस देवाचा नवस फेडावयाचा राहिल्यामुळें तो क्रिटोला ' देवाला एक कोंबडा द्यावयाचा राहिला आहे, तो द्यावयास विसरूं नको ' असें बजावून सांगतो.

परमेश्वरावरील श्रद्धा व धर्मनिष्ठा यांप्रमाणेंच सत्याच्या लालसेची आणखी एक मनोवृत्ति सॉक्रेटिसांत उत्कटतेनें वास करीत होती. सत्यान्वेषणाचें कार्य म्हणजे परमेश्वराचें कार्य अशी त्याची भावना असल्यामुळें त्यानें याच कार्याला आपल्याला आजीव वाहून घेतलें होतें. या कार्याचा आपल्याला परमेश्वराकडून आदेश मिळाला आहे असा त्याचा विश्वास होता व तसें तो स्पष्टपणें नागरिकांना सांगण्यास कचरला नाहीं. हें सत्यान्वेषणाचें कार्य त्यानें संभाषणद्वारां केलें. सत्यान्वेषणाबरोबरच जिज्ञासा वाढूं लागली. सत्याची लालसा, उत्कट जिज्ञासा व तर्कशुद्ध विचार यांच्यामुळें त्याचीं संभाषणें परिणामकारक होऊन विरोधी पक्षाला अखेरीस त्याचें म्हणणें मान्य करावें लागें. प्लेटोनें आपल्या ' सिंपोझिअम ' नामक ग्रंथांत सॉक्रेटिसाचा शिष्य व ॲथेन्सचा एक प्रसिद्ध बुद्धिमान नागरिक ॲलिसबायडीज[1] याच्या मुखानें आपल्या गुरूच्या भाषणाचा श्रोत्यांवर होणारा परिणाम पुढीलप्रमाणें वर्णन केला आहे. ॲलिसबायडीज म्हणतो :—

" मी जेव्हां सॉक्रेटिसाचें भाषण लक्षपूर्वक ऐकतों तेव्हां मी देहभान विसरून समाधीपेक्षांहि पलीकडील अवस्थेचा अनुभव घेत असतों. त्याच्या भाषणानें, प्रवचनानें किंवा संभाषणानें अंतःकरण उचंबळून नाचूं लागतें व नेत्रांवाटें आनंदाश्रूंच्या धारा वाहूं लागतात. माझ्यासारखीच इतरांची अवस्था झालेली माझ्या दृष्टीस पडते. पेरिक्लीजसारख्या नामांकित वक्त्यांचीं

---

१. **ॲलिसबायडीज** ( खि. पू. ४५०–४४० ) हा ॲथेन्सच्या नागरिकांचा एक प्रख्यात राजकारणपटु पुढारी व सॉक्रेटिसाचा एक आवडता विद्यार्थी होता. पॉटिडिआच्या लढाईत सॉक्रेटिसानें त्याचा जीव वांचविला व पुढें डेलिअमच्या लढाईत त्यानें सॉक्रेटिसाला वांचविलें. ॲलिसबायडीजच्या उधळपट्टीच्या व दुराचाराच्या आचरणानें व सोटेशाही वर्तनानें हा लोकसत्ता नष्ट करील अशी नागरिकांना भीति वाटूं लागली. हर्मीज देवाची मूर्ति फोडण्यांत त्याचें अंग होतें असें न्यायालयांत सिद्ध होऊन त्याला देहान्त शासनाची शिक्षा झाली. पण तो स्पार्टाला पळून गेला व स्पार्टाच्या बाजूनें ॲथेन्सविरुद्ध लढूं लागला. पुढें स्पार्टाच्या राजाची मर्जी खप्पा झाल्यामुळें तो ॲथेन्सला परत आला, व नागरिकांनींहि त्याचे दोष विसरून त्याला सरसेनापति केलें.

भाषणें मीं ऐकलीं आहेत, त्यांना मी पुष्कळ नांवाजतों. पण त्यांच्या भाषणांचा माझ्या मनावर इतका परिणाम कधीं झाला नाहीं, त्यांच्या वक्तृत्वानें माझें अंतःकरण उचंबळून आलें नाहीं, किंवा माझ्या अधोगतीची जाणीव उत्पन्न होऊन अंतःकरणाला वेदना झाल्या नाहींत. सॉक्रेटिसाचीं संभाषणें मात्र ही जाणीव करून देऊन मला मानसिक वेदना भोगावयास लावीत. मला वाटें असें लाजिरवाणें जिणें जगण्यांत काय अर्थ ! याक्षणीं जरी मीं त्याचें भाषण ऐकलें तरी त्याचा असाच परिणाम होईल अशी माझी खात्री आहे. तो आपल्या संभाषणानें मीं असावें त्यापेक्षां फार हीन स्थितीला पोहोंचलों आहे व ॲथेनिअन राजकारणांत खेळत राहून मी आत्महिताची हेळसांड करीत आहें असें मला निश्चितपणें कबूल करावयास लावील. याच भीतीनें मनांत असलें तरीसुद्धां कानांत बोटें घालून 'सायरन'[१] च्या मधुर गायनापासून लांब पळून जावें तसा सॉक्रेटीस भाषण करीत असतांना मी लांब पळून जातों. तसें न केल्यास मी वृद्धावस्था येईपर्यंत त्याच्याशेजारीं भाषणच ऐकत बसावयाचा. त्याच्याच एकट्याच्या भाषणांत अशी शक्ति होती कीं तिच्या योगानें माझ्या अधोगतीची मला लाज वाटावयाची. त्याच्या कानउघाडणीविरुद्ध मला ब्रसुद्धां काढणें शक्य नव्हतें. पण त्याला सोडावयाचा अवकाश, कीं माझी राजकारणाची महत्त्वाकांक्षा बळावलीच. आणि म्हणून मी त्याला टाळीत असतों. त्याला पाहिलें कीं मला लाजल्यासारखें होतें. कित्येकदां तर हा एकदां मरेल तर बरें होईल असें मनांत येतें. पण तो जर खराच कालवश झाला तर मला अत्यंत दुःख होईल ! थोडक्यांत सांगावयाचें तर त्याच्याविषयीं काय म्हणावें हेंच मला समजत नाहीं."

आपल्या नगरबांधवांशीं संभाषणें करून विचारविनियम करण्यांत व त्यांना त्यांच्या चुका दाखविण्यांत सॉक्रेटिसाला खरा आनंद होई. हें त्याचें अत्यंत आवडीचें व त्याच्या दृष्टीनें पवित्र कार्य असल्यामुळें त्याच्या संभाषणांत

---

१. **सायरन**—ग्रीक पुराणांत कथांतील सायरन नांवाच्या अर्धांग मानवाचें अर्धांग पक्ष्याचें असणाऱ्या गाणारणी होत्या. त्या एका बेटांत खडकावर बसून आपल्या मनोवेधक गाण्यानें जाणाऱ्या-येणाऱ्या खलाशांना मोह पाडून त्यांचीं जहाजें खडकांकडे आणवून त्यांचा नाश करीत.

मनाची शांतता व अंतःकरणाची कळकळ दिसून येत. त्याचीं भाषणें ॲलिस-चायडीजनें वर वर्णन केल्याप्रमाणें परिणामकारक होऊन श्रोत्यांच्या विश्वासास पात्र ठरत व त्याच्यावर त्यांची अढळ भक्ति जडे यांत नवल कसलें ? स्वतंत्रपणें विचार करण्याची शक्ति व अंतःकरणांत कळकळ असल्याकारणानें आपलीं भाषणें परिणामकारक करण्याकरितां त्याला उसनें अवसान आणण्याचें कारण नव्हतें.

सॉक्रेटिसाची बुद्धि कुशाग्र होती. तशीच त्याला मनुष्यस्वभावाची उत्तम पारख करतां येत असे. माणसाचे गुणदोष, त्याचा शहाणपणा व मूर्खपणा त्याला तेव्हांच दिसत. तथापि तो मनाचा मोठा असल्यामुळें त्यानें कोणा-चाहि कधीं अपमान केला नाहीं किंवा कोणाकडे तुच्छतेनें पाहिलें नाहीं. त्याचें एकंदर वर्तन पाहतां तो प्रेमळ अंतःकरणाचा, मनुष्यमात्राशीं सहानु-भूतीनें वागणारा, दुसऱ्याचें मन जाणणारा, विनोदी, खेळकर स्वभावाचा होता असें म्हणतां येतें. वादविवादांत प्रतिपक्षाचें म्हणणें तो शांतपणें ऐकून घेई. प्रतिपक्षाची जिज्ञासा कितपत आहे हें तो तेव्हांच ओळखी. खरें पाहिल्यास वादविवाद करण्यानें त्याच्या हातून शिक्षकाचें कार्य होत असे तरी त्यानें शिक्षकाची भूमिका कधींच घेतली नाहीं. दुसऱ्याला शिकविण्याचा आव तो आणीत नसे. इतरांप्रमाणें मी जिज्ञासु असून नवीन नवीन ज्ञान मिळ-विण्याकरितां भेटेल त्याच्याशीं संभाषण करतों असें तो म्हणे. तो म्हणतो, "मी नवीन सत्य निर्माण करीत नाहीं. प्रतिपक्षाच्या मनांत अज्ञात, सुप्तावस्थेंत अस-लेलें सत्य बाहेर आणून त्याला तें पटवून द्यावें हा माझा हेतु असतो. माझें कार्य सुइणीसारखें आहे. मी माणसाच्या मनांत अडकून बसलेल्या आत्म्याची — सत्याची — सुटका करतों." त्याच्या म्हणण्याचा रोख हा कीं मानवी मनांत वसत असलेलें सुप्तावस्थेंतील सत्य तो मोठ्या कुशलतेनें जगापुढें आणतो. त्याची वादविवाद-पद्धति पाहिली म्हणजे त्याचें म्हणणें अतिशयोक्तीचें नाहीं हें कबूल करणें भाग पडतें.

सत्याची चाड व अन्यायाची चीड हे सॉक्रेटिसाचे गुणांतले गुण. आर्जि-न्यूसीच्या लढाईत जय मिळाल्यानंतर सेनानींच्या हलगर्जीपणामुळें अनेक जहाजें बुडून चार हजार शिपाई बळी पडले असा आरोप आणून नागरिकांनीं त्या सेनानींना न्यायालयासमोर उभें केलें होतें. त्याप्रसंगीं सत्याची चाड बाळगून

सॉक्रेटिसानें सेनानींची बाजू कशी घेतली हें मागें आलेंच आहे. तसेंच अॅथेन्स शहरांत प्रजासत्ताक राज्य नष्ट होऊन लिसँडरची हिटलरशाही चालू असतांना लिऑनला पकडून आणण्याचा हुकूम त्यानें कसा बाजूला सारला ह्याचाहि उल्लेख मागील एका प्रकरणांत झाला आहे. याप्रसंगीं जिवावर धोका आला असतांनाहि त्यानें सत्याची कांस सोडली नाहीं. क्रिटो व त्याचे इतर स्नेही कारागृहांतून त्याची सुटका करण्याचा प्रयत्न करीत होते, परंतु 'तसें केल्यास कायदेभंग होऊन मी माझें नागरिकाचें कर्तव्य करण्यास चुकेन', असें म्हणून त्यांची सूचना त्यानें करारीपणानें अमान्य केली. ही सूचना नाकारतांना त्यानें दिलेल्या कारणपरंपरेनें त्याची कर्तव्याची जाणीव व न्यायप्रियता दिसतात; इतकेंच नाहीं, तर त्यांच्यामागें दृष्टीस पडणारी तर्कशुद्ध विचारसरणी, नागरिक म्हणून येणाऱ्या जबाबदारीची जाणीव व तत्त्वनिष्ठा ठळकपणानें नजरेंत भरतात.

सॉक्रेटिसाचे इतर नांवाजण्यासारखे गुण त्याचा स्वाभिमान व शांत स्वभाव हे होत. मॅसिडोनिआचा राजा आर्किलेअस यानें सॉक्रेटिसासारखा थोर पुरुष आपल्या दरबारीं असावा या इच्छेनें आपल्या वकिलाबरोबर नजराणा पाठवून आपली इच्छा प्रदर्शित केली. सॉक्रेटिसानें आलेल्या वकिलाला नकार दिला. त्याच्या मित्रांनीं नकाराचें कारण विचारतां तो म्हणाला, "आपण त्या पुरुषाकडे गेलों तर त्याचे उपकार फेडण्याचें सामर्थ्य आपल्यांत असणें अवश्य आहे. निस्पृह मनुष्यानें ताबेदारी पतकरणें बरें नाहीं." हाच स्वाभिमान न्यायालयांतील पंचांसमोर केलेल्या भाषणांत निदर्शित होतो. सॉक्रेटीस म्हणतो, "मी न्यायाधिशांची पायधरणी केली नाहीं किंवा बायकामुलें आणून त्यांच्या मनांत दया उत्पन्न केली नाहीं. याचें कारण मला गर्व आहे किंवा मी तुमचा तिरस्कार करतों हें नाहीं. खरें कारण हें कीं दयेची याचना करणें अॅथेन्सच्या नागरिकाला लाजिरवाणें आहे. शिवाय दुसरें असें कीं, अपराधाची शिक्षा भोगण्याऐवजीं न्यायाधिशांजवळ दयेची भिक्षा मागणें हें अन्यायाचें आहे. शक्य असेल तर मी आपला निरपराधीपणा सिद्ध करावा. न्यायालयांत मित्रांना एक न्याय, शत्रूंना दुसरा असें होत नाहीं. न्यायाधिशांनीं न्याय देण्याची शपथ घेतली आहे. दुसऱ्यांना सत्याच्या कथा मी सांगतों, आणि मी त्याच्या उलट वागल्यास लोकांना तोंड कसें दाखवूं? अप्रामाणिकपणा व अपकीर्ति म्हणजे मृत्यु."

याप्रमाणें सॉक्रेटिसाच्या न्यायालयांतील शेवटच्या भाषणांत त्याचे उत्कृष्ट गुण व्यक्त झाले आहेत. परमेश्वरावरील अढळ श्रद्धा, धर्मावरील दृढ निष्ठा, धैर्य, सत्यप्रियता, अमर्याद त्याग, तीव्र जिज्ञासा, स्वाभिमान, मनःसंयम वगैरे अनेक सद्गुणांचें सॉक्रेटीस एक स्थान होऊन राहिला होता. आदर्श नागरिक, आदर्श सेवक, आदर्श शिक्षक यांचें उदाहरण म्हणून सॉक्रेटिसाकडे बोट दाखवावें.

एकच ध्येय डोळ्यांपुढें ठेवून त्यांतच तल्लीन होणाऱ्या थोर पुरुषांचें लक्ष इतर गोष्टींकडे वेधलें जात नाहीं. सुख-संपत्ति, घरदार वगैरे त्यांना तृण-तुल्य वाटतात. शरीरसुखाला ते किंमत देत नाहींत. सॉक्रेटिसाचें जीवन सर्वस्वीं अशाच प्रकारचें होतें. त्याच्या स्वतःच्या गरजा फारच थोड्या असत. राहणी अगदीं साधी. उन्हाळ्यांत व थंडींत, तिन्ही त्रिकाळ त्याच्या अंगावर एकच वस्त्र असे. रस्त्यांतून तो जाऊं लागला म्हणजे ही एक विचित्र वल्ली आहे असें वाटून सर्वांनीं त्याच्याकडे कुतूहलानें पाहात राहावें. त्याचें खाणेंपिणें, कापडलत्ता सर्वच अस्ताव्यस्त. ही स्वारी राही तेव्हां दोनदोन दिवस उपाशी राही, नाहीं तेव्हां अजीर्ण होईतों खाण्यास कचरत नसे. दारू ढोसूं लागला म्हणजे त्यानें पेल्यावर पेले रिकामे करावे; पण या बहादुराच्या अंगावर ती यत्किंचितहि येत नसे. तो पोशाखाविषयीं नेहमीं बेफिकीर असे. चार-चौघांत वावरतांना पोशाख नीट व्यवस्थित असावा असें त्याला केव्हांच वाटलें नाहीं. वर म्हटल्याप्रमाणें भर थंडींत किंवा ऐन उन्हाळ्यांत त्याच्या अंगावर एकच एक वस्त्र असे. पायांत पादत्राण आहे किंवा नाहीं याची त्याला दादहि नसे. या अशा प्रकारच्या वृत्तीमुळें सॉक्रेटिसाचें सर्व आयुष्य अठरा विसवे दारिद्र्यांत गेलें. त्यानें न्यायालयांत 'दंड झाल्यास मजजवळ तो भरण्यास काय आहे! फार झालें तर एक मिना दंड देऊं शकेन' असें सांगितलें. झेनोफॉनच्या म्हणण्याप्रमाणें त्याची एकंदर चीजवस्त १२० मिन्यांपेक्षां अधिक नव्हती. त्याचे श्रीमंत स्नेही त्याला द्रव्याची मदत करण्यास पुढें येत पण ती तो नाकारी. तो पूर्णपणें निरिच्छ होता. वडिलांनीं आपल्यामागें दोन हजार मिना ठेविले होते, ते सॉक्रेटिसानें गरजू मित्रांस देऊन टाकले. तो एकदां म्हणाला, "मी किती सुखी आहें. सुखोपभोगाचे पदार्थ मिळविण्या-करितां व नंतर त्यांचें रक्षण करण्याकरितां मला श्रम करावे लागत नाहींत व

दुःखहि होत नाहीं." एकदां सहज तो जवळ असलेल्या मित्रमंडळींस म्हणाला, 'पैसे असते तर मी अंगरखा केला असता.' हें ऐकतांच 'मी पैसे देईन', 'मी पैसे देईन', अशी मित्रमंडळींत अहमहमिका लागली. अर्थात् त्यानें मदत स्वीकारली नाहीं हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. ही कथा लिहितांना सेनेका म्हणतो, "त्याची अंगरख्याची गरज स्नेह्यांस अगोदरच कळावयास हवी होती. ते बेटे मंदबुद्धीचे असावेत."

सॉक्रेटिसाची राहणी अत्यंत साधी व खाणेंपिणें अतिशय गरिबीचें असें. झेनोफॉन् 'मेमोरॅबिलिआ'मध्यें म्हणतो, "सॉक्रेटिसाचें खाणेंपिणें व वस्त्र-प्रावर्ण एखाद्यानें आपल्या गुलामाला दिलें असतें तर तो गुलाम त्याच्या घरांतून पळून गेला असता." सॉक्रेटीस म्हणे, "निरिच्छेनें मनुष्य ईश्वरसदृश होतो. मनुष्याला कोणत्याच गरजा नसणें हें दैवी जीवन, व अत्यंत थोड्या गरजा असणें हा दैवी जीवनाला पोहोंचण्याचा जवळचा मार्ग". तथापि त्याचा पोशाखाविषयींचा बेफिकीरपणा व खाण्यापिण्याकडे दुर्लक्ष याचा अर्थ तो ऐहिक सुखांना विटला होता किंवा तो विरक्त होता असा नाहीं. ध्येयसिद्धि हवी असल्यास ती दारिद्य व हालअपेष्टा सोसल्याशिवाय प्राप्त होणार नाहीं हें मनांत ठेवून तो संयमानें वागे. मन त्याच्या ताब्यांत असे; तो सुखोपभोगांचा गुलाम झाला नाहीं. नागरिक बांधवांशीं विविध विषयांवर चर्चा करावी, त्यांच्याशीं खेळीमेळीनें वागावें यांतच त्याचा खरा आनंद असे. सुखोपभोगाची संधि येई त्या वेळीं तो सुखहि अनुभवी. त्याचा जीवनक्रम एखाद्या स्थित-प्रज्ञाला साजेसा होता. स्वेच्छेनें पतकरलेलें दारिद्य त्याची त्यागी वृत्ति दाख-विते. वडिलोपार्जित सुमारें पांचशें मिना त्यानें गरजू मित्रांस देऊन टाकले. त्याचा त्याग अनेक प्रसंगीं आपण पाहिला आहे. पॉटिडिआच्या वेढ्यांत त्यानें ॲल्सिबायडीजचे प्राण वांचविले, पण आपण मागें राहून त्यानें पराक्रमाकरितां स्वतःला मिळावयाचें बक्षीस तो ॲल्सिबायडीजचा पराक्रम असें सांगून त्याला देवविलें. हें त्याच्या त्यागाचें व शालीनतेचें एक ठळक उदाहरण आहे. तो स्थितप्रज्ञाप्रमाणें सुखदुःखाची पर्वा न करतां विचारांत निमग्न होऊन राहात असला तरी रुक्ष मनाचा होता असें नाहीं. केव्हां केव्हां त्याच्या भाषणांत विनोदाच्या छटा दृष्टीस पडत. त्याचा मित्र ॲपॉलोडोरस त्याला अंतसमयीं म्हणाला, "तुम्ही निरपराधी असतां मरत आहां याचें मला फार दुःख होतें!"

" तर मग काय मी अपराधी म्हणून मरूं ? " असें त्याला सॉक्रेटिसानें विनोदानें विचारलें. तसेंच क्रिटोनें त्यानें कारागृहांतून आपण केलेल्या योजनेप्रमाणें पळून जावें अशी आग्रहाची विनंति केली त्यावर त्याला मिळालेल्या उत्तरांतहि विनोदाची छटा आहे, आणि हा विनोद केव्हां तर मृत्यूचा क्षण अगदीं येऊन ठेपला होता त्या वेळीं. सॉक्रेटीस म्हणाला, " क्रिटो, या ॲटिकाबाहेर लोक मरत नाहींत असें एखादें स्थळ असलें तर सांग. अरे, लोक काय म्हणतील हा प्रश्न नाहीं. पळून जाणें न्याय्य कीं अन्याय्य हा प्रश्न आहे. सत्यप्रिय परमेश्वर काय म्हणेल ? अयोग्य कृत्य म्हणजे अपकीर्ति व नाश ! "

आलफ्रेड डब्ल्यू. बेन यांनीं सॉक्रेटिसाच्या स्वभावविशेषांचें यथार्थ वर्णन केलें आहे. ते म्हणतात, " सॉक्रेटिसाचे सर्व स्वभावविशेष व त्याचें तत्त्वज्ञान एकाच शब्दांत सांगावयाचें झाल्यास ' सुसंगतपणा ' या शब्दांत सांगतां येईल. मनांत उद्भवणाऱ्या उत्तमोत्तम विचारांचा अत्यंत संयमानें हितकर स्वरूपांत आचार; कोणत्याहि आमिषाला बळी न पडणारा दृढ संयम; संकटकालीं न डगमगणारें धैर्य; स्वतःच्या किंवा इतरांच्या स्वार्थी विचारांना थारा न देणारी न्यायबुद्धि; शब्द व अर्थ, अर्थ व विचार, आणि विचार व आचार, यांत कांटेकोर संगति ठेवणारा सत्यवक्तेपणा; विरोधाला वाव न देणारी तर्कशुद्धता; तर्कविरुद्ध विधान अमान्य करणारा आत्मविश्वास; स्वातंत्र्याकरितां कार्य करण्यास लागणारी मनाची उदारता; केवळ परहित साधणारी भूतदया; व सर्वत्र सुसंगतपणा राखण्याचें बौद्धिक वेड; ह्या गुणांनीं सॉक्रेटिसानें येवढें मोठें नांव मिळविलें. त्याच्या सुसंगतपणाच्या वेडानेंच त्याचें जीवन निष्कलंक राहिलें. "[१]

१. " The Greek Philosophers "–Alfred W. Benn.

• • •

# सॉक्रेटीस

## तत्त्वज्ञान

# ७. पार्श्वभूमि

युरोपांतील देशांपैकीं ग्रीस एक लहानसा देश, पण अडीच हजार वर्षांपूर्वी या देशाची कीर्ति फार मोठी होती. तत्त्वज्ञान्, विज्ञान, ललितकला, पराक्रम इत्यादि अनेक बाबींत इतर देशांपेक्षां त्यानें अधिक प्रगति केली होती. भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणें ग्रीक तत्त्वज्ञानाचाहि लौकिक आजपर्यंत चालत आला आहे. युरोपिअन तत्त्वज्ञानाची इमारत ग्रीक तत्त्वज्ञानाच्या पायावर उभारलेली आहे. या इमारतीचीं निरनिराळीं अनेक दालनें आपल्या दृष्टीसमोर आहेत, पण त्यांचा पाया सॉक्रेटिसानें घातला हें सर्वांना मान्य आहे. सॉक्रेटिसाचें स्वतःचें एखादें विवक्षित दर्शन होतें असें नाहीं, पण त्यानें आपल्या तत्त्वज्ञानानें विविध दर्शनांची किंवा वादांची शास्त्रशुद्ध उभारणी कशी व्हावयास पाहिजे हें लोकांस शिकविलें, व म्हणूनच त्याच्या तत्त्वज्ञानाला "तत्त्वज्ञानाचें तत्त्वज्ञान" असें म्हणतात.

सॉक्रेटिसाच्या तत्त्वज्ञानाचा विचार करण्यापूर्वी त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या व त्याला समकालीन असलेल्या तत्त्वज्ञांचें तत्त्वज्ञान कसें होतें हें पाहणें अवश्य आहे. कारण, हेंच तत्त्वज्ञान सॉक्रेटिसाच्या तत्त्वज्ञानाला कारणीभूत झालें. त्याचें तारुण्य पूर्वकालीन बुद्धिवंतांच्या अभ्यासांत गेल्याकारणानें त्यांच्या विचारांचा त्याच्यावर परिणाम झाला होता. त्यानें त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला होता. तत्कालीन गणित व इतर शास्त्रें यांचें त्याला ज्ञान झालें होतें, खगोल व भूमिति त्याला अवगत होतीं, व पूर्वीच्या तत्त्वज्ञांच्या मीमांसांशीं त्याचा परिचय होता. पण या तत्त्वज्ञांचा स्वतःचा अभ्यास व विचार केवळ भौतिकशास्त्रांपुरते

होते. हे सर्व भौतिकशास्त्रवेत्ते होते, ते निसर्गाचे अभ्यासक होते. सॉक्रेटिसाचें मन प्रथम कांहीं दिवस त्यांच्या तत्त्वज्ञानांत रंगलें, पण पुढें हळूंहळूं त्याचा हा ओढा कमी होऊं लागला. प्रोटॅगोरॅस[1] वगैरे तत्त्वज्ञांना मानव व मानवी समाज यांच्या अभ्यासाचें अधिक महत्त्व वाटूं लागलें. सॉक्रेटिसानें भौतिकशास्त्रांचा विचार करणेंच सोडून दिलें. हीं शास्त्रें केवळ नित्यव्यवहाराच्या दृष्टीनें उपयुक्त आहेत. खगोलाच्या अभ्यासानें खलाशी जलपर्यटन सुखानें करूं शकतात, वनस्पतींच्या शास्त्राचा वैद्यांना उपयोग होतो. असाच उपयोग इतर भौतिकशास्त्रांचा आहे. शिवाय या भौतिक तत्त्वज्ञांत तरी एक विचार कधीं दृष्टीस पडतो का असें तो विचारी. तो म्हणतो, "हे निसर्गाचे तत्त्वज्ञ — भौतिक तत्त्वज्ञ — वेड लागलेल्या माणसांसारखे असतात. त्यांचे सिद्धान्त एकमेकांशीं कधीं जुळावयाचे नाहींत. त्यांचीं शास्त्रें अशीं कीं त्यांच्यापासून विशेष फलप्राप्ति नाहीं, त्यांचें ज्ञान होणें अशक्य. या शास्त्रांचा अभ्यास अधार्मिक, पापमूलकच म्हटला पाहिजे. कारण ज्या गोष्टी मानवांपासून गुप्त ठेवण्याची देवांची इच्छा असते, त्या गोष्टी उघड्या करण्याचा या लोकांचा प्रयत्न असतो. या अभ्यासांत काळाचा अपव्यय करण्यापेक्षां अधिक उपयुक्त असें ज्ञान मिळविण्याच्यामागें लागणें किती तरी चांगलें."[2]

निसर्गाचा अभ्यास सॉक्रेटिसाच्या मतें गौण स्वरूपाचा होय, व म्हणूनच त्यानें हा अभ्यास करण्याचा विचार सोडून दिला. त्याच्या मतानें निसर्गाचे नियम बदलणें अशक्य. निसर्गाच्या गोष्टी त्याच्या नियमांप्रमाणें घडावयाच्या तशाच घडणार. त्यांना बंधन घालून मानवाला निसर्गावर मात करतां येणार नाहीं, त्या त्याला आपल्या ताब्यांत आणतां येणार नाहींत. याच कारणामुळे मानवी जीवनाशीं निसर्गाचा कांहीं संबंध नाहीं. आधुनिक शास्त्रीय प्रगतीच्या काळांत सॉक्रेटिसाचें हें मत कदाचित बदललें असतें; पण त्याचें मानवी जीवनाच्या मानानें निसर्गाचा अभ्यास गौण हें मत बदललें असतें असें वाटत नाहीं. आज निसर्ग मानवाच्या बराच ताब्यांत आला आहे. इतकेंच नाहीं, तर ताब्यांत राहून गुलामाप्रमाणें तो त्याची सेवा करीत आहे. पण यामुळें मानवाच्या जीवनांत ऐहिक सुखाच्या दृष्टीनें फरक पडला असला तरी

---

१. प्रोटॅगोरॅस—खि. पू. सुमारें ४८०—४११. २. 'ॲपॉलॉजी'—प्लेटो.

त्याच्या अंतःसृष्टींत, त्याच्या मनोविकारांत विशेष फरक पडला आहे असें म्हणतां येत नाहीं. विमानें, तारायंत्रें, रेडिओ वगैरे अनेक सुखसमृद्धीचीं साधनें शास्त्रीय ज्ञानानें मानवाला दिलीं आहेत; तथापि त्यामुळें त्याची नीतिमत्ता वाढविण्याला, मन सुसंस्कृत व सात्त्विक बनण्याला मदत झाली आहे असें कितपत म्हणतां येईल? निसर्गाचें ज्ञान दुधारी हत्यार आहे. ' अन्न तारी, अन्न मारी ' ही म्हण या ज्ञानाला उत्तम लागूं पडते. हें ज्ञान मानवाला देवाच्या पदवीला नेईल, तेंच त्याला हिंसक राक्षस करून सोडील. दोन्ही प्रकारचीं उदाहरणें आपण पाहात आलों आहों. याच कारणामुळें सॉक्रेटिसाला भौतिकशास्त्रीय ज्ञान गौण वाटलें. या ज्ञानाचा सदुपयोग व्हावयाचा असेल तर हें ज्ञान उपयोग करणाऱ्या मानवाला शुद्ध, खरें ज्ञान होणें अवश्य आहे. ज्याच्या योगानें माणूस सच्छील बनतो, ज्याच्या योगानें त्याला आपलें खरें हित समजतें तेंच खरें ज्ञान. त्याच ज्ञानाची पायरी सर्वांत श्रेष्ठ असें तो म्हणे. चांगला जोडा करण्यांत हेतु काय हें कळल्याशिवाय चांभाराला चांगला जोडा करतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें राष्ट्राचें खरें हित कशांत आहे हें समजल्याशिवाय माणूस राजकरणपटु होणार नाहीं. तसेंच मानवी जीवन म्हणजे काय व तें कसें जगावें याचें ज्ञान झाल्याशिवाय मनुष्याला हितकर जीवन जगतां येणार नाहीं. हें ज्ञान भौतिकशास्त्रांपासून मिळणें अशक्य व म्हणूनच ह्या शास्त्रांचें ज्ञान गौण असें त्याच्या मनानें घेतलें होतें.

या काळांत सॉक्रेटिसाचें एकट्याचेंच मत भौतिकशास्त्रांविरुद्ध होतें असें नाहीं. जेव्हां समाजामध्यें एखादी नवीन विचारांची लाट उसळते तेव्हां ती एकाच व्यक्तीच्या मनांत उत्पन्न होत नाहीं. निरनिराळ्या कारणांमुळें समाजाच्या एकंदर विचारांत क्रांति होत असते. नवीन विचार कांहीं लोकांच्या मनांत वावरूं लागतात; व अशा वातावरणांत एखादा स्पष्टवक्ता, कर्तृत्ववान पुरुष निर्माण होऊन नवीन विचारांना वाचा फोडतो. कोणतीहि क्रांति अकस्मात झालेली दिसली तरी ती अकस्मात घडून आलेली नसते. नवीन विचारांची आग समाजांत त्यापूर्वी बराच काळ धुमसत असते. कर्तृत्ववान व्यक्तीची गांठ पडतांच ती पेट घेते व समाजाला तिच्या ज्वाला दिसूं लागतात येवढेंच.

सॉक्रेटिसाच्या पूर्वीचे तत्वज्ञानी विश्वाचा प्रश्न सोडवूं पाहात होते. विश्वाची निर्मिति कशी झाली असावी, भौतिक पदार्थांचें मूलतत्त्व कोणतें असावें,

पदार्थांची उत्पत्ति, स्थिति व लय कशीं होतात, असे प्रश्न त्यांच्यापुढें असत. त्यांनीं मानव व मानवी समाज यांचा विचार केला नाहीं. पण पुढें खि. पू. पांचव्या शतकांत जनतेचें लक्ष या प्रश्नांनीं वेधलें. ॲथेन्स या काळांत इतर ग्रीक नगरराज्यांवर सत्ता चालवूं लागलें होतें व त्यामुळें या शहराला सार्वभौमत्व प्राप्त झालें होतें. नागरिकांत तरतरीत बुद्धि खेळत होती, व राजकारण व अधिकारपदें यांत ते गढून गेले होते. त्यांना राजकीय प्रश्न सोडवावयाचे होते, जनतेच्या नीतिमत्तेचा विचार करावयाचा होता, व सामाजिक प्रश्न कसे सोडवितां येतील हें पाहावयाचें होतें. न्याय-अन्याय कसे ठरवावयाचे, सत्यासत्याची कसोटी काय, श्रेयस् सरस कीं प्रेयस्, अशा प्रश्नांचा ते विचार करूं लागले. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे नागरिकांची दृष्टि मानवाकडे वळूं लागली होती.

सोफिस्ट पंथाचे अनुयायी वरील प्रश्नांचीं उत्तरें देत असत. त्यांच्या शिष्यवर्गाला ते या बाबींत मार्गदर्शन करीत. पण मागें आपण पाहिलेंच आहे कीं सोफिस्टांची राजकारणाची शिकवण व नीतिसंबंधीं विचार म्हणजे अस्पष्ट, शिथील विचारांचा बाजार. त्यांची एकंदर शिकवण वरवरची, जुजबी, हातांतील काम भागविण्यापुरती किंवा दुसऱ्या शब्दांत म्हणावयाचें झाल्यास वेळ मारून नेण्यापुरती असे. तर्कशुद्ध विचारानें आपल्यापुढील प्रश्न सोडविण्याचा त्यांनीं कधीं प्रयत्न केला नाहीं. त्यांच्या शिष्यांनाहि तर्काच्या कसोटीची कधीं जरूर भासली नाहीं. त्यांचें तात्पुरतें काम भागलें कीं ते संतुष्ट होत. सॉक्रेटिसाला हें मान्य नव्हतें म्हणून त्याचा सोफिस्टांना नेहमीं विरोध असे. अशा प्रकारें त्याला एका बाजूनें भौतिकशास्त्रज्ञ व दुसऱ्या बाजूनें सोफिस्ट यांना विरोध करावा लागला. भौतिकशास्त्रज्ञांची त्याला आडकाठी होत नसे. त्यांना त्याच्याविरुद्ध जाण्याचें कारण नव्हतें. दोघांचे दोन भिन्न मार्ग होते येवढेंच. पण सोफिस्टांचा मार्ग सॉक्रेटिसाच्या विरोधानें बिकट होऊं लागल्याकारणानें ते त्याच्याविरुद्ध असत.

वरील विरोधापेक्षां ॲथेन्सच्या इतर नागरिकांचाच विरोध फार तीव्र होता. शेवटीं त्यांच्याच विरोधाला तो बळी पडला. सॉक्रेटिसाच्या चाळिशीच्या सुमारास ॲथेन्समध्यें नैतिक व धार्मिक विचारांची एक मोठी खळबळ उठवून

देणारी क्रांतिकारक लाट उत्पन्न झाली होती. ती उत्पन्न करणाऱ्या बुद्धिवंतांपैकीं सॉक्रेटीस स्वतः एक होता. त्या काळांत ॲथेन्सच्या नागरिकांत परमेश्वरावर श्रद्धा, त्याच्या न्यायीपणावर व त्याचप्रमाणें आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास आढळत नसे. सॉक्रेटिसाचा या सर्वांवर अढळ विश्वास होता, व त्यामुळें तात्त्विक प्रश्नांसंबंधीं पूर्वपरंपरा सोडून त्यानें अगदीं नवीन मार्ग धरला होता. हा मार्ग सामान्य जुन्या रूढींतील पुराणमतवाद्यांना भ्रमिष्टपणाचा, आढ्यतेचा व उच्छृंखलपणाचा वाटे. ॲरिस्टॉफेन्सनें सॉक्रेटिसाला आपल्या 'मेघ' नाटकांत हास्यास्पद बनवून त्याची टर उडविण्याचा कसा प्रयत्न केला होता हें आपण मागें पाहिलें आहे. पेलॉपोनिशिअन युद्धाच्या काळांत सर्व प्रकारच्या, सर्व दर्जाच्या नागरिकांस सत्पथावर आणण्याच्या कामगिरीमुळें तो जनतेंत अप्रिय झाला होता. या युद्धामुळें ॲथेन्स बिकट परिस्थितींत सांपडलें होतें. त्याचें सार्वभौमत्व नष्टप्राय झालें होतें. जनता जवळ जवळ अन्नाला महाग झाली होती. या कारणांनीं सामान्यतः सरळ मनाचे नागरिकसुद्धां सॉक्रेटिसाच्या उलट जाऊन त्याच्यावर प्रचलित, रूढ असलेल्या जीवनक्रमाच्याविरुद्ध बंड करणारा बंडखोर असा आरोप करूं लागले.

याप्रमाणें सोफिस्टांची दिखाऊ व कामचलाऊ शिकवण, पुराणमताभिमान्यांचें पूर्वपरंपरेवरील प्रेम, व भौतिक तत्त्वज्ञांची केवळ निसर्गाकडे पाहण्याची दृष्टि, यांनीं ॲथेन्सच्या नागरिकांच्या मनांत अस्थिरता उत्पन्न झाली होती. त्यांना कोणी तरी यथार्थ मार्गदर्शन करणें अवश्य होतें. सॉक्रेटिसाला या परिस्थितीची तीव्र जाणीव झाली. मानवाचें हित दिखाऊ शिक्षणांत नसून तें ज्ञानप्राप्तींत आहे असें त्याच्या मनानें घेतलें. त्याला आपल्या नगरबांधवांत योग्य मार्गदर्शन व हितकर ध्येय यांची उणीव सर्वत्र दिसूं लागली. आपलें खरें हित कशांत आहे याचें मनुष्यमात्राला ज्ञान असलें पाहिजे असें त्याचें म्हणणें असे. त्याला हें ज्ञान ॲथेन्सच्या नागरिकांना करून द्यावयाचें होतें. ज्ञानदान हें त्याचें एकमेव ध्येय होतें. त्याला मानवी जीवनाची हितकर योजना आंखावयाची होती व जीवनाचे नियम ठरवावयाचे होते. केवळ अधिकाराच्या जोरावर एखादी कृति केली किंवा एखादा आचार अंधविश्वासानें एकाकडून दुसऱ्याकडे जात जात रूढ झाला म्हणून ती कृति किंवा तो आचार

व्यक्तीला व समाजाला हितकर होतो असें नाहीं. बऱ्याच लोकांची विचार-सरणी कशी चुकीची असते, आपलें खरें हित कशांत आहे हें त्यांना कसें कळत नाहीं, जीवनाचें ध्येय काय असावें, नागरिकांचीं कर्तव्यें कोणतीं वगैरे गोष्टींचें नगरबांधवांना ज्ञान करून देण्याकरितां सॉक्रेटिसानें त्यांच्याशीं संभाषणें सुरू केलीं. या संभाषणांतून प्रदर्शित झालेल्या विचारांत ज्ञान, सत्य, धर्म इत्यादि विषयांवरील त्याचीं मतें दृष्टीस पडतात व त्यांवरून त्याच्या तात्त्विक विचारांचें स्वरूप कळतें. या एकंदर परिस्थितींतून व विचारसरणींतून सॉक्रेटिसाचें तत्त्वज्ञान निर्माण झालें. या तत्त्वज्ञानाचें स्वरूप आपल्याला पाहावयाचें आहे.

● ● ●

## ८. ज्ञानमार्ग

सॉक्रेटिसाच्या कार्याला दिशा दाखविणाऱ्या परिस्थितीचें स्वरूप मागील प्रकरणांत आपण पाहिलें. रूढ आचार नष्ट झाल्याकारणानें समाजांत शिस्त राहिली नाहीं, जुन्या मतांवरील श्रद्धा लुप्त होऊन नवीन पाखंडी विचार येऊं लागले आहेत व त्यामुळें समाजांत अनवस्था उत्पन्न झाली आहे असें पुराण-मताभिमानी लोकांना वाटूं लागलें. उलट पक्षीं नवीन तरुणपिढीला अधिकाऱ्यांची सत्ता अमान्य होऊन ती सत्य व असत्य यांची कसोटी पाहूं लागली. 'बाबा वाक्याचें प्रमाण' तिला बाजूला सारावेंसें वाटलें. आपल्याला ज्याच्या योगानें सुख होईल असें वाटतें, जें सुखकारक आहे असें आपलें मन सांगतें तें करावें, व अशा रीतीनें जीवनांतून मिळेल तितकें सुख मिळवावें, अशी ही विचारसरणी होती. सॉक्रेटिसानें या परिस्थितीचा काळजीपूर्वक विचार केला व शेवटीं त्याला असें वाटलें कीं हा सर्व आंधळ्यांचा खेळ चालला आहे. या वाटचालींत खरा विश्वसनीय मार्गदर्शक ज्ञानाशिवाय दुसरा नाहीं. या मार्ग-दर्शकाच्या अभावीं हे लोक भलत्याच मार्गाला लागले आहेत. पुराणमतवाद्यांना रूढीचा शब्द प्रमाण असें वाटतें, तर नवीन पिढीचा वैयक्तिक मतावर भर. हे दोघेहि तर्कशुद्ध सत्यज्ञान हेंच फक्त विश्वसनीय व हिताप्रत नेणारें आहे हें ओळखीत नाहींत. सत्य ही एका व्यक्तीची बाब नाहीं. सत्य सर्वत्र एकच. व्यक्तीपेक्षां सत्याला अधिक महत्त्व आहे. व्यक्तीला कांहींहि वाटो, तिचें मत कांहींहि असो, सत्य तें सत्यच. तें त्रिकालाबाधित राहणार!

संभाषणद्वारां नागरिकांशीं विचारविनिमय केल्यानंतर सॉक्रेटिसाला स्पष्ट

दिसून आलें कीं, ज्ञानाशिवाय त्यांना जीवनाच्या योग्य मार्गाला लागतां येणार नाहीं किंवा समाजाचा किंवा राजकारणाचा गाडा हितकर मार्गानें हांकतां येणार नाहीं. त्यानें त्यांना ज्ञानप्राप्तीचा अचूक मार्ग दाखवून देण्यास सुरुवात केली. यांतच त्याची ज्ञानमीमांसा पाहावयास सांपडते.

त्याच्या ज्ञानमीमांसेचा मुख्य पाया हा कीं "आपल्या मतांच्या सत्यतेविषयीं स्वतःची खात्री असूं द्या."[1] जुन्या रूढ आचारांवरील किंवा विचारांवरील अंधविश्वासानें सत्यज्ञान होणें अशक्य आहे. मताची सत्यता पारखण्याकरितां त्याला तर्काची कसोटी लावली पाहिजे. ही कसोटी लावण्यापूर्वी आपण जे शब्द योजतों, त्या शब्दांचा निश्चित अर्थ ठरविणें अवश्य आहे असें त्याचें म्हणणें असें. शब्दांच्या निश्चित अर्थाविषयीं जनता सामान्यतः अज्ञानी असते व अशा अनिश्चित अर्थावर उभारलेली मतांची इमारत टिकणार नाहीं, हें प्रत्यक्ष पटवून देण्याकरितां सॉक्रेटीस आपल्या प्रतिपक्षाला विविध शब्दांच्या अर्थाविषयीं फार छेडीत असे. खरें म्हणावयाचें तर सॉक्रेटिसानें प्रथम शब्दांच्या व्याख्या करण्यास आरंभ केला असें म्हणावें लागतें. 'व्यवहार', 'राजकारण', 'नीति', 'धर्म' वगैरे जीवनक्षेत्रांत येणारे अनेक शब्द लोक धरसोडीनें वापरीत. त्या शब्दांना प्राप्त झालेले अर्थ केवळ शिथील रूढार्थ असत, त्यांत यथार्थता नसे. त्यांचा खरा अर्थ काय याचा लोक विचार करीत नसत. ते त्यांचे प्रचलित अर्थ कालावधीनें नकळत रूढ झाले होते. विविध भावनांच्या निदर्शनांत, कवींच्या काव्यांत व सत्ताधिकाऱ्यांच्या भाषणांत झालेला या शब्दांचा वापर व त्याची परंपरा यांतून हे रूढार्थ निर्माण झालें होते. शब्द यथार्थ न योजल्यामुळें विचारांत तर्कशुद्धता येईनाशी झाली. यथार्थानें शब्द योजण्याविषयीं सॉक्रेटिसाचा विशेष कटाक्ष होता. तो 'फीडो'मध्यें म्हणतो, "शब्दांचा अयुक्त, अनिश्चित अर्थानें उपयोग करणें केवळ चुकीचेंच आहे असें नाहीं, तर विचारांचें उगमस्थान जें मन त्यांत कीड उत्पन्न करणारें आहे. याचा अर्थ हा कीं वरील दोषानें विचारांत चूक उत्पन्न होते येवढेंच नाहीं, तर मनाला निष्काळजीपणानें अर्धवट विचार करण्याची संवय जडते

१. 'Know thyself' हें बोधवाक्य ग्रीस देशांतील प्रख्यात सात शहाण्यांपैकीं एकाचें होतें. तें सॉक्रेटिसाच्या मीमांसेला यथार्थ लागूं होतें.

व त्यामुळें सत्यज्ञान मिळणेंच अशक्य होतें. हा विचाराचा ढिलेपणा अथेन्समध्यें एका विवक्षित वर्गांत आहे असें नाहीं, तो सर्व वर्गांत सारखाच आढळतो." प्रथम लोकांना शब्दांचें यथार्थ ज्ञान झालें पाहिजे. ह्या हेतूनें वर म्हटल्याप्रमाणें संभाषणांतून प्रतिपक्षाशीं शब्दार्थांची छाननी करण्यास सॉक्रेटिसानें आरंभ केला, व अप्रत्यक्ष रीतीनें त्यांना शब्दांची व्याख्या करण्यास शिकविलें. ॲरिस्टॉटलनें व्याख्यापद्धतीच्या प्रारंभाचें श्रेय सॉक्रेटिसाला यामुळेंच दिलें आहे.[1] कांहीं अलीकडील जर्मन अभ्यासक ॲरिस्टॉटलचें हें मत मान्य करीत नाहींत. त्यांचें म्हणणें सॉक्रेटिसाचें व्याख्येकडे लक्ष लागलें नव्हतें. अंशतः हें म्हणणें खरें आहे. एखाद्या तर्कशास्त्र्याप्रमाणें हातांत शब्द घेऊन त्यांच्या व्याख्या करण्याकरितां तो मुद्दाम असा कधीं बसला नाहीं. त्याला व्याख्येकरितां व्याख्या नको होती, पण ज्ञानप्राप्तीकरितां व व्यवहारांतील योग्य आचरणाकरितां त्याला तिची आवश्यकता भासली.

सॉक्रेटिसाच्या ज्ञानमार्गाची पहिली पायरी ' शब्दाची व्याख्या ' ही होय. याच्यापुढचें पाऊल तर्कशास्त्राचें. त्याचा शुद्ध तर्कावर अढळ विश्वास होता. सत्यज्ञान त्याच्याशिवाय मिळणें अशक्य असें तो नेहमीं म्हणे. " तुम्ही बायकांमुलांना वाऱ्यावर सोडून बेजबाबदारपणानें मृत्यु स्वीकारीत आहां, त्यामुळें तुमचे शत्रु तुमची निंदा करतील ", असें सांगून क्रिटो कारागृहांतून पळून जाण्याकरितां त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न करतो. त्यावर सॉक्रेटीस त्याला म्हणतो, " तर्कशुद्ध विचार आतांपर्यंत मला मार्ग दाखवीत आला आहे, व त्याच्यावर विश्वास ठेवून मी जन्मभर लोकांचीं मतें दुर्लक्ष करून बाजूला सारीत आलों आहे. आतां त्याच्याविरुद्ध वागणें योग्य होईल का ? " असें मतनिदर्शन त्यानें अनेक वेळां केलें आहे. तर्कशुद्ध विचारानेंच ज्ञान मिळणार, दुसरा मार्ग नाहीं असें सॉक्रेटिसाच्या मनानें ठरविलें. हें मत निश्चित होण्यापूर्वी त्याला आलेले अनुभव प्लेटोनें ' फीडो ' नामक संभाषणांत त्याच्या तोंडीं घातले आहेत. ते वाचनीय आहेत कारण त्यांमुळें त्याची विचारक्रांति कशी होत गेली हें समजतें. त्यांचा कांहीं भाग येथें देण्यासारखा आहे :

सॉक्रेटीस सिबीज नांवाच्या मित्राला म्हणाला, " तरुण वयांत मला

१. ॲरिस्टॉटल—" Metaphysics ".

भौतिकशास्त्राची फार आवड होती. वस्तु उत्पन्न कशी होते, तिचें अस्तित्व टिकून कसें राहतें, व तिचा नाश कसा होतो हें ज्ञान होणें ही फार उत्तम गोष्ट आहे असें मला वाटे. सजीव प्राणी उष्णतेमुळें किंवा थंडीमुळें जगतात काय ? आपली विचारशक्ति रक्त, हवा किंवा अग्नि यांमुळें उत्पन्न होते का ? किंवा यांपैकीं एकहि कारण नसून डोक्यांतील मेंदूमुळें ऐकणें, पाहणें, वास घेणें या शक्ति उत्पन्न होऊन त्यांतून स्मरणशक्ति व विचारशक्ति उत्पन्न होतात ? पण भौतिकशास्त्रांच्या अभ्यासानें या प्रश्नांचा उलगडा होईना, व मी त्यांच्या अभ्यासाला पूर्णपणें नालायक आहें असें माझ्या मनानें घेतलें. यानंतर मला दुसरा एक अनुभव आला. एकदां एक गृहस्थ ॲनॅक्झॅगोरॅसचें पुस्तक वाचीत असतांना मी तें ऐकत बसलों होतों. त्यांत लेखकानें ‘ मन सर्व वस्तूंचें मूळ असून तेंच त्यांची नीट व्यवस्था लावतें ’, असें म्हटलें होतें. ही मीमांसा ऐकून मला आनंद झाला. मला वाटूं लागलें, मन हेंच सर्व वस्तूंचें आदिकारण हें बरोबर दिसतें, आणि हें जर बरोबर असेल तर मन प्रत्येक वस्तूची व्यवस्था शक्य तितक्या उत्तम तऱ्हेनें लावीत असलें पाहिजे. पदार्थांची उत्पत्ति मन करणार, त्यांची व्यवस्था उत्तम प्रकारें तेंच लावणार. मनुष्याला या पदार्थांचा विचार करण्याचें कारण नाहीं. त्याला फक्त एकच गोष्ट करावयाची उरते. ती येवढीच कीं, त्यानें आपल्याला स्वतःला व इतरांना हितकर काय होईल याचा विचार करावा. हितकारक गोष्ट कळली म्हणजे अनहितकारक गोष्टीचें ज्ञान त्याबरोबर आलेंच. या विचारांनीं माझें मन आनंदानें भरून आलें. ॲनॅक्झॅगोरॅस हा पदार्थांच्या अस्तित्वाचें कारण सांगणारा मला हवा असा गुरूच भेटला असें मला वाटलें. ॲनॅक्झॅगोरॅस आतां पृथ्वी वाटोळी आहे कीं सपाट आहे हें सांगेल, व त्याबरोबरच तिच्या उत्पत्तीचा हेतु काय, तिचा आकार वाटोळा किंवा सपाट कां हेंहि सांगूं शकेल. विश्वाच्या मध्य बिंदूवर पृथ्वी आहे असें त्याचें म्हणणें असल्यास तशी ठेवण्यांत हेतु काय असावा याचा तो उलगडा करील. चंद्र, सूर्य व इतर तारका यांविषयीं मला असेच प्रश्न विचारतां येतील. माझी अशी अपेक्षा नव्हती कीं सर्व पदार्थांच्या उत्पत्तीच्या व रचनेच्या मागें मन आहे असें सांगितल्यानंतर ते पदार्थ असे कां व त्यांची रचना अशी कां या साहजिकच उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांस तो कांहीं सयुक्तिक कारण न सांगतां, ‘ ते पदार्थ तसे आहेत, त्यांची रचना तशी आहे,

याचें कारण त्यांच्या त्याच स्थितीनें कार्यभाग उत्कृष्ट रीतीनें पार पडतो ', असें उत्तर देईल. माझी अपेक्षा ही होती कीं प्रत्येक पदार्थाच्या मार्गे, विश्वाच्या मार्गे, विश्वरचनेच्या मार्गे जें मन आहे असें तो म्हणतो, त्या मनांत असलेला हेतु तो दाखवील. या आशेनें मी त्याचें पुस्तक मोठ्या उत्सुकतेनें वाचलें, पण माझी सर्वस्वीं निराशा झाली. विश्वरचनेचा हेतु दाखविण्याकरितां त्यानें विश्वाच्या मार्गे त्याच्या मतें असलेल्या मनाचा कांहीं उपयोग केला नाहीं. हें मन तिऱ्हाइता-प्रमाणें त्यानें वगळून बाजूला ठेविलें. एखाद्या माणसानें म्हणावें, ' सॉक्रेटीस जें जें करतो तें तें आपल्या मनानें करतो '. ' तर मग सॉक्रेटिसाच्या अमक्या एका किंवा अनेक कृतींचें कारण काय ? ' असा प्रश्न विचारल्यास त्या माण-सानें ' सॉक्रेटीस या ठिकाणीं बसला आहे, त्याला हातपाय आहेत, त्याला कांहीं अवयवांची हालचाल करतां येते ' वगैरे कारणें द्यावीत तशीं कारणें ॲनॅक्झॅगोरॅसचीं आहेत. माझ्या मनांत त्या कृति करण्याचें नसतें तर माझे हातपाय जाग्यावरून हल्ले नसते. या सर्वांचा अर्थ येवढाच कीं मनुष्याला खरें कारण काय हें सांगतां येत नाहीं. याच अज्ञानानें प्रश्नांना अशीं भलतीं उत्तरें मिळतात ''.

याप्रमाणें ॲनॅक्झॅगोरॅसच्या ग्रंथानें सॉक्रेटिसाची निराशा झाली. पूर्वीच्या भौतिकशास्त्रज्ञांप्रमाणें ॲनॅक्झॅगोरॅसहि केवळ भौतिक सृष्टीचाच विचार करीत राहिला. तर्कशुद्ध कार्यकारणभाव न दाखवितां अधिकारी वाणीप्रमाणें तो बोलत राहिला. केवळ भौतिक सृष्टीनें मानवी समाजाचे प्रश्न सुटणार नाहींत असें सॉक्रेटिसाला निश्चित वाटूं लागलें, व त्यानें आपला सत्यशोधनाचा, सत्यज्ञान मिळविण्याचा एक नवीन मार्ग आंखला. हा मार्ग म्हणजे तर्क-शास्त्रानें अनुमित सत्याचा पडताळा पाहणें हा होय. ही पडताळा पाहण्याची सॉक्रेटिसाची पद्धति पुढें दिल्याप्रमाणें होती.

भौतिक वस्तु पाहून होणारें ज्ञान सत्य कीं असत्य हें पाहावयाचें झाल्यास, किंवा ज्ञान होत नसल्यामुळें वस्तु पाहून काढलेल्या अनुमानाची सत्यता पड-ताळून पाहावयाची असल्यास, झालेल्या ज्ञानाचें किंवा काढलेल्या अनुमानाचें तर्काच्या विचारानें म्हणजेच तर्कशास्त्रानें परीक्षण करून शेवटीं येणाऱ्या सिद्धा-न्ताशीं झालेल्या ज्ञानाचा किंवा काढलेल्या अनुमानाचा मेळ बसल्यास तें ज्ञान व अनुमान सत्य असें बिनदिक्कत म्हणावें.

प्रत्यक्ष वस्तु पाहिल्याशिवाय तिचें ज्ञान मिळविण्याच्या या पद्धतीला ‘ अप्रत्यक्ष पद्धति ’ ( Indirect method ) व प्रत्यक्ष वस्तु पाहून ज्ञान मिळविण्याच्या पद्धतीला ‘ प्रत्यक्ष पद्धति ’ ( Direct method ) म्हणतां येईल. ‘ अप्रत्यक्ष पद्धति ’ एका दृष्टीनें तात्पुरती, कांहीं वेळ काम भागविणारी आहे असें सॉक्रेटीस म्हणतो. पण त्याच्या मतानें सत्यज्ञान मिळण्याचा याच एका मार्गानें संभव आहे. झेनोफॉन व प्लेटो यांच्या ग्रंथांवरून असें दिसतें कीं, सॉक्रेटिसाची ही पद्धति संभाषणद्वारां वादविवादानें विषयाची चर्चा करण्याची होती. हिलाच ‘ तर्कशुद्ध संभाषणपद्धति ’ (Dialectic method) म्हणतात. एखाद्या विषयाचें सत्य पाहावयाचें असल्यास, त्या विषयावर दोन व्यक्तींनीं पक्ष व प्रतिपक्ष या भूमिका घेऊन संभाषणरूपानें वादविवादांत आपआपल्या पक्षाचें समर्थन व प्रतिपक्षाचें खंडन करावयाचें, किंवा एकाच व्यक्तीनें आपल्या मनांत वरील दोन्ही भूमिका घेऊन आक्षेप घेऊन त्यांचें निरसन करावयाचें. एकाच व्यक्तीच्या मनांत हा वाद चालला असतांना पुष्कळदां असें घडतें कीं व्यक्तीचें मन उलट सुलट विचार करीत असतांना त्यांत नवीन प्रश्न, नवीन शंका उत्पन्न होतात व तेंच त्यांचीं उत्तरें देतें. अशा प्रकारें निरनिराळ्या आक्षेपांचें खंडन होऊन अंतीं सत्य शिल्लक राहतें. प्रत्यक्ष एखादी वस्तु किंवा घटना पाहून व तिची परीक्षा करून सत्यज्ञान होणें अशक्य असतें, तेव्हां त्या वस्तूवरून किंवा घटनेवरून मनुष्य त्याच्या सत्याविषयीं अनुमान करतो किंवा आपल्या मनानें कांहीं उलगडा करतो. अशा वेळीं त्याला आपलें हें ज्ञान वरील वादविवादाच्या कसोटीला लावून परीक्षून घेणें अवश्य आहे. त्याशिवाय सत्याची प्राप्ति होणार नाहीं.

कोणत्याहि प्रश्नावरील वादविवादांत पक्ष व प्रतिपक्ष असतात. दोघेहि आपलें म्हणणें सकारण पुढें मांडतात. ही कृति न्यायालयांत भांडणाऱ्या वकिलांसारखी असते. दोघेहि आपआपले पुरावे न्यायाधिशापुढें आणतात, व आपली बाजू कमजोर असली तरी ती सरस करून दाखविण्याचा प्रयत्न करतात. हीच स्थिति वादविवादांतील पक्ष—प्रतिपक्षांत असते. मग त्यांच्यांतील कोणता पक्ष सत्य ठरवावयाचा ? ह्या सत्याची कसोटी ठरविण्याची शास्त्रशुद्ध पद्धति सॉक्रेटिसाच्या ‘ फीडो ’ नामक संभाषणांत बऱ्याच अंशानें पूर्णपणें निदर्शित झाली आहे. याच पद्धतीवर पाश्चिमात्य तर्कशास्त्राची

( Logic ) उभारणी झाली आहे. आपल्याकडेहि तर्कपद्धति अशीच आहे. आपल्या तर्कशास्त्रांतील या भागाची थोडीशी माहिती येथें दिल्यास सॉक्रेटिसाची सत्यशोधनपद्धति सुगम होईल. आपल्या पद्धतीचें पाश्चिमात्य तर्कशास्त्रांतील पद्धतीशीं साम्य असल्यामुळें तिचेंहि येथें निदर्शन केल्यास तें मनोरंजक वाटेल.

न्यायशास्त्रांत विधानाची सत्यता पाहण्याचें एक तंत्र आहे. या तंत्राचे प्रतिज्ञा किंवा सिद्धान्त, हेतु किंवा अपदेश, उदाहरण किंवा निदर्शन, उपनय व निगमन असे पांच भाग असतात. प्रतिज्ञेंत विधान, हेतूंत विधानाचें कारण ( सर्वमान्य सामान्य सिद्धान्त ), निदर्शनांत कारणाचें उदाहरण, उपनयांत कारणाचें अस्तित्व, व निगमनांत विधानाची अनुमित सत्यसिद्धि निदर्शित होतात. या तंत्राला ' न्याय ' असें नांव आहे. इंग्रजींत यालाच ' Syllogism ' म्हणतात. या तंत्राचें नेहमींचें उदाहरण असें :—

प्रतिज्ञा—पर्वतावर अग्नि आहे.
हेतु—जेथें जेथें धूमाचें अस्तित्व तेथें तेथें अग्नीचें अस्तित्व.
निदर्शन—जसें स्वयंपाकगृहांत.
उपनय—पर्वतावर धूम आहे.
निगमन—पर्वतावर अग्नि आहे.

इंग्रजी तंत्रांत तीनच भाग असतात. हेतु, उपनय व निगमन. त्या शास्त्रांतील उदाहरण :—

हेतु—सर्व मानव मर्त्य आहेत. ( Major Premise )
उपनय—सॉक्रेटीस मानव आहे. ( Minor Premise )
निगमन—सॉक्रेटीस मर्त्य आहे. ( Conclusion )

इंग्रजी तर्कशास्त्रांतील तंत्रांत ' प्रतिज्ञा ' व ' उदाहरण ' हे भाग नसतात.

आतां सॉक्रेटिसाची पद्धति कशी होती हें पाहूं. वादविवादांत सॉक्रेटीस उभय पक्षांना मान्य होईल असें एक सत्य विधान अनुमानाला आधार म्हणून घेतो. या विधानाला तो ' Hypothesis ' ( गृहीत सत्य किंवा हेतु ) म्हणतो. या विधानाचें सत्य सिद्ध झालेलें नसतें; केवळ उभय पक्षांना मान्य म्हणून विवादाला आरंभ करण्याकरितां त्याचा उपयोग असतो. यानंतर हें विधान सत्य मानल्यास त्यापासून तर्कानें कोणतें अनुमान निघतें हें पाहावयाचें.

गृहीत विधान सत्य मानल्यावर त्यापासून निघणारें तर्कशुद्ध विधान सत्यच मानलें पाहिजे; त्याच्याविरुद्ध असल्यास तें असत्य ठरणार. ह्याप्रमाणें एका सत्यांतून दुसरें, दुसऱ्यांतून तिसरें, अशी एक संलग्न सत्यांची सांखळी तयार होते. लक्षांत बाळगण्यासारखा विशेष म्हणजे सत्य विधानाला विरोधक विधान सत्य असूं शकत नाहीं. 'गृहीत सत्य' ( Hypothesis ) केवळ वादाच्या आरंभाला सोयीचें म्हणून घेतलेलें नसतें. त्याची सत्यता सिद्ध केलेली नसलेली, तरी ती उभय पक्षांना मान्य म्हणून त्याच्यापासून सॉक्रेटीस सुरुवात करतो. 'गृहीत सत्य' स्वयंसिद्ध (Self-evident) किंवा अंतिम सत्य ( Final truth ) नसतें. त्याच्या सत्याविषयीं शंका घेतां येते, व तशी शंका घेतल्यास तें सत्य दुसऱ्या एखाद्या उभयसंमत अशा विधानानें सिद्ध करावें लागतें. तसें न करतां पहिल्याच शंकित सत्याचा आग्रह धरल्यास विचाराचा पायाच कच्चा राहून इमारत गडगडणार. या पद्धतींत विशेष नियम असा कीं 'गृहीत सत्य' खरोखर सत्य कीं असत्य हा प्रश्न व गृहीत सत्यापासून निघणारीं अनुमानें सत्य कीं असत्य हा प्रश्न अगदीं वेगळे वेगळे ठेविले पाहिजेत.

झेनोफॉन् सॉक्रेटिसाच्या संभाषणपद्धतीचे तीन विशेष सांगतो. त्याचे संभाषणाचे विषय व्यावहारिक आचरण, राजकारण, नीति व कला यांच्या क्षेत्रांतील असत. असा विषय सत्यान्वेषणार्थ चर्चेला घेतल्यानंतर प्रतिपक्षाला व स्वतःला मान्य होणाऱ्या विधानापासून उभय पक्षांना मान्य होणारा सामान्य सिद्धान्त निघे. या सिद्धान्ताचा उपयोग करून सत्यज्ञान प्राप्त व्हावयाचें. याचा अर्थ येवढाच कीं प्रथम निर्गमन पद्धतीनें ( Induction ) सामान्य सिद्धान्त काढावयाचा व त्याचा उपयोग करून विगमन पद्धतीनें ( Deduction ) सत्यज्ञान गांठावयाचें. हा सामान्य सिद्धान्त केव्हां केव्हां व्याख्येच्या स्वरूपाचा असे.

'फीडो'मध्यें सॉक्रेटिसाची म्हणून निवेदित केलेली ही सत्यशोधनाची पद्धति आतांपर्यंत शास्त्रशुद्ध अशी एकच आहे. आयोनिक भौतिकशास्त्रज्ञ प्रत्यक्ष वस्तु पाहून त्यापासून सत्य ठरविण्याचा प्रयत्न करीत, पण त्या मार्गानें त्यांना सत्यज्ञान मिळूं शकलें नाहीं. मतमतान्तरें मात्र उत्पन्न झालीं. शिवाय या तत्वज्ञांचें कार्यक्षेत्र भौतिक पदार्थांपलीकडे गेलें नव्हतें. मानवी मनाला यांनीं हात लावला नव्हता. त्यांना सॉक्रेटिसाच्या पद्धतीची आवश्यकता वाटली

नाहीं. प्रत्यक्ष वस्तु पाहून सत्यज्ञान झाल्यावर शंका घेण्याचें कारण काय, अशी त्यांची समजूत होती. सॉक्रेटिसाची पद्धति सत्य म्हणून पतकरलेल्या ज्ञानाचा पडताळा पाहण्याची होती. दृश्य पदार्थ पाहून अनुमानिलेलीं विधानें तर्काच्या कसोटीला लावून त्यांची सत्यता ठरविण्याला तिचा उपयोग होतो. बेकन व न्यूटन यांच्या सत्यशोधनाच्या पद्धतींत असाच भेद होता. बेकन म्हणतो, "सत्यशोधनाकरितां डोळ्यांपुढें सृष्टि आहे; ती पाहून सत्य ठरवा व ज्ञान मिळवा". न्यूटनच्या मतानें अनुमानानें शोधलेल्या सत्याचा ताळा पाहण्याकरितां सृष्टि आहे. सृष्टि म्हणजे स्पष्ट पदार्थ, व त्याप्रमाणें प्रत्यक्ष घडलेल्या, अस्तित्वांत असलेल्या घटना ( Facts ), या व्यापक अर्थानें 'सृष्टि' शब्द घ्यावयाचा आहे. सॉक्रेटिसाला व न्यूटनला दोघांनाहि मिळालेल्या सत्याचा ताळा पाहिजे. सॉक्रेटीस अनुमित सत्याचा ताळा पाहण्याच्या आपल्या पद्धतींत वस्तुस्थितीचा ( Facts ) विशेष उल्लेख करीत नाहीं. न्यूटनचा कटाक्ष वस्तुस्थितीवर आहे. प्लेटो व त्याच्या 'ॲकॅडेमी'तील तत्त्वज्ञानी प्रत्यक्ष वस्तुस्थितीवरून ताळा पाहण्याचा उल्लेख करतात. वस्तुस्थितीला, प्रत्यक्ष दृष्टीस पडणाऱ्या दृश्यांना, ते दृश्यें ( Appearances ) असें नांव देतात. हीं दृश्यें असत्याच्या आरोपांतून मुक्त व्हावयाचीं असलीं तर त्यांच्या मतें त्यांचा 'गृहीत सत्या'शीं ( Hyopthesis ) मेळ बसणें अवश्य आहे. प्रत्यक्ष शास्त्रीय प्रयोग करून अनुमानें पडताळून पाहण्याची अर्वाचीन पद्धति त्या काळांत सॉक्रेटीस किंवा प्लेटो यांच्या अंदाजांत आली नसली पाहिजे. भौतिक सत्यें शोधतांना केवळ तर्कापेक्षां प्रत्यक्ष प्रयोगच अधिक उपयुक्त ठरणार.

'फीडो'मध्यें प्लेटोनें जरी ही पद्धति आपल्या शब्दांनीं निवेदित केली असली तरी ती प्लेटोच्या कल्पनेनें रचिलेली नाहीं. ती सॉक्रेटिसाची पद्धति आहे. जेव्हां एकाद्या विधानाच्या सत्याविषयीं आक्षेप उत्पन्न होई, तेव्हां सॉक्रेटीस सर्व वाद पुन्हां गृहीत सत्याला ( Hypothesis ) आणून जोडी व अशा रीतीनें विधानाचें सत्य सिद्ध करी. कारण गृहीत सत्य दोन्ही पक्षांना मान्य असेंच असतें. झेनोफॉनला याची माहिती होती व म्हणूनच त्यानें या पद्धतीचा "मेमोरॅबिलिआ" या आपल्या ग्रंथांत उल्लेख केला आहे. तो म्हणतो, "सॉक्रेटीस इतरांना संभाषणांनीं तर्कशुद्ध पद्धतीनें विचार करण्यास शिकवी. प्रतिपक्षाला विचार करण्यास भाग पाडून आपल्या विचारां-

सील सत्य त्यांना पटवून देई. " कदाचित् ' फीडो ' वाचून झेनोफॉननें ही सॉक्रेटिसाची पद्धति म्हणून उल्लेख केला असेल. तसें असल्यास ती सॉक्रेटिसाची असें निश्चितपणें म्हणतां येणार नाहीं. तथापि सामान्यतः ती सॉक्रेटिसाची असें मानण्यांत येतें. सॉक्रेटिसाला ती कशी सुचली असावी हें समजण्यासारखें आहे. गृहीत सत्यावरून तर्काच्या कांटेतोलानें अनुमान काढण्याची एक विशिष्ट पद्धति " एलिआचा झेनो " ( Zeno of Elea ) या तत्त्वज्ञाची होती. तथापि त्याच्या पद्धतीनें विधानाचें सत्य प्रत्यक्षपणें सरळमार्गानें सिद्ध होत नसे. प्रतिपक्षाचें विधान गृहीत सत्याच्या कसोटीला लावून त्याच्यापासून विसंगत अशीं भलतींच अनुमानें कशीं निघतात हें दाखवून तो आपलें सत्य पटवून देई. या पद्धतीला ' Reductio ad absurdum ' म्हणतात.

सॉक्रेटिसाच्या वरील ज्ञानमीमांसेच्यामागें असलेली त्याची विचारसरणी लक्षांत ठेविली पाहिजे. याविषयीं थोडासा उल्लेख मागें आला आहे. भौतिक सृष्टींतील सत्यें शोधून काढण्याचा प्रयत्न करून काळाचा अपव्यय करण्यांत अर्थ नाहीं, कारण हीं सत्यें सांपडणें दुर्घट, असें त्याचें मत होतें. मानवी व्यवहार व चारित्र्य हेंच फक्त सत्यशोधनाचें, सत्यज्ञानाचें क्षेत्र असें तो म्हणे. याच क्षेत्रांत ज्ञानसंशोधनाचें कार्य त्यानें जन्मभर केलें. त्याच्या या ज्ञानसंशोधनाच्या पद्धतीचें स्वरूप आपण वर पाहिलें आहे. या नवीन पद्धतीची पुढें तत्त्वज्ञानाच्या प्रगतीला पुष्कळ मदत झाली. सॉक्रेटिसाच्या दृष्टीनें एखाद्या वस्तूचें किंवा घटनेचें मनांत उत्पन्न होणारें केवळ मनोमय प्रतिबिंब म्हणजे त्या वस्तूचें किंवा घटनेचें सत्यज्ञान नव्हे. त्या प्रतिबिंबाचा मनाच्या कार्यांशीं — विचाराशीं — संबंध आल्याशिवाय ज्ञान अशक्य. वस्तु किंवा घटना पाहिल्यानंतर मनाला चालना मिळणें अवश्य आहे. ज्ञान बाह्य वस्तूंत किंवा घटनेंत नसतें. मन ज्याप्रमाणें बाह्य वस्तूचा किंवा घटनेचा विचार करील त्याप्रमाणें ज्ञान मिळेल. शास्त्रशुद्ध विचारानें यथार्थ ज्ञान होईल, अशुद्ध विचारानें अयथार्थ ज्ञान मिळेल. म्हणून जिज्ञासूनें ज्ञानाच्या विषयाची स्पष्ट व यथार्थ कल्पना करून घेऊन तर्कशुद्ध पद्धतीनें विचार करणें अवश्य आहे असें त्याचें म्हणणें होतें. सॉक्रेटिसानें या पद्धतीचा उपयोग मानवी व्यवहार व चारित्र्य या क्षेत्रांत येणारे प्रश्न सोडविण्याकरितां केला. पण या पद्धतीचा उपयोग इतर विविध क्षेत्रांत होण्यासारखा आहे, आणि तसा पुढें झालाहि.

प्लेटो व ॲरिस्टॉटल आपलें कार्य करीत असतांना, त्यांनीं सॉक्रेटिसाच्या या पद्धतीचा पुष्कळ विकास करून तिचा आपल्यापुढील प्रश्न सोडविण्यास उपयोग केला असें सांगण्यांत येतें.

तर्कशुद्ध सत्यज्ञानाचा विचार प्रथम सॉक्रेटिसाच्या मनांत उत्पन्न झाला व या ज्ञानप्राप्तीची शास्त्रीय पद्धति त्यानेंच प्रथम दाखविली. पण कांहीं अभ्यासकांच्या मतें सॉक्रेटिसानें याच्यापुढें जाऊन 'सत्तत्त्ववाद' ( Theory of ideas ) प्रथम अस्तित्वांत आणिला. बर्नेट व ए. वायू. टेलर या माताचे आहेत. त्यांचें म्हणणें असें कीं, प्लेटोच्या 'फीडो' नामक संवादांत सॉक्रेटीस एक तत्त्वज्ञानाचा ( Metaphysics ) मुरलेला अभ्यासक असून त्यानें ज्ञानाच्या उगमाची व पदार्थांच्या निर्मितीची निश्चित मीमांसा केली आहे. ज्ञान म्हणजे मागील जन्मीं असलेल्या ज्ञानाची आठवण, असें तो अनेकदां म्हणतो. सत्तत्त्ववाद त्याच्या परिचयाचा होता. "सॉक्रेटिसाच्या मृत्यूनंतर प्लेटोचा 'सत्तत्त्ववाद' निघाला", असें ॲरिस्टॉटलनें अर्धवट विधान केलें; व त्यावरून सॉक्रेटिसाला विरोध निर्माण झाला, असें बर्नेट व टेलर यांचें म्हणणें आहे. याशिवाय आपल्या मताच्या समर्थनार्थ त्यांचें असें म्हणणें पडतें कीं प्लेटोनें आपल्या संवादांत 'सत्तत्त्ववाद' सॉक्रेटिसाच्या तोंडीं घालणें अस्वाभाविक वाटतें. त्याचें हें करणें वेडेपणाचें ठरण्यासारखें आहे. कोणताहि तत्त्वशोधक आपल्या महत्त्वाच्या शोधाचें श्रेय दुसऱ्या आपल्या समकालीन नामवंत संशोधकाला देईल हें संभवत नाहीं. सॉक्रेटिसाचे विचार 'फीडो'मध्यें येतांना त्यांना थोडीफार प्लेटोच्या वैयक्तिक विचाराची छटा येणें अटळ आहे, पण त्यानें जाणूनबुजून सत्याला विकृत स्वरूप देण्याकरितां असें केलेलें नाहीं.

जर्मन लेखक 'ट्सेलर' ( Zeller ) याचें मत ॲरिस्टॉटलच्या मताप्रमाणें आहे. एफ्. जे. चर्चनें प्लेटोच्या चार 'संवादां'चें इंग्रजींत भाषांतर केलें आहे. तोहि याच मताचा आहे. तो म्हणतो, 'फीडों'त प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचा ( Metaphysics ) उल्लेख आला आहे, पण त्याचा सॉक्रेटिसाच्या तत्त्वज्ञानाविषयीं विचार करतांना उल्लेख करण्याचें कारण नाहीं. कारण आपल्याला त्यांच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. वरील लेखकांच्या मतानें 'फीडो'चे दोन भाग पडतात; एक ऐतिहासिक, दुसरा तत्त्वज्ञानविषयक. सॉक्रेटिसाच्या मृत्यूच्या

वेळीं प्लेटो त्या ठिकाणीं नसला, तरी त्यानें दिलेली मृत्यूची हकीगत सत्य आहे यांत शंका नाहीं. तेथें हजर असलेल्या मित्रांच्याकडून त्यानें ती हकीगत सविस्तर ऐकली असली पाहिजे. पण 'फीडो'च्या तात्त्विक भागाविषयीं असें म्हणतां येत नाहीं. ट्सेलर तर निश्चितपणें म्हणतो कीं, हा भाग सॉक्रेटिसाचा नाहीं, प्लेटोचा आहे. आत्म्याचें अमरत्व व सत्तत्त्ववाद या विषयांविषयीं कारागृहांत व इतरत्र बोलतांना स्वमतसमर्थनार्थ निदर्शित झालेले विचार सॉक्रेटिसाचे नाहींत. ॲरिस्टॉटल स्पष्टच सांगतो कीं, 'सत्तत्त्ववाद' (Theory of ideas) सॉक्रेटिसाला माहीत नव्हता. त्याचा उल्लेख 'फीडों'त त्यानें स्वतः करणें अशक्य होतें. एक गोष्ट मात्र खरी कीं सॉक्रेटिसाच्या 'व्याख्यामीमांसे'तून (Theory of definitions) प्लेटोनें आपल्या सत्तत्त्ववादाचें प्रगतीचें पाऊल टाकलें. इतर ठिकाणांप्रमाणें 'फीडों'तहि प्लेटोनें सॉक्रेटिसाची मुख्य भूमिका योजून त्याच्या मुखीं आपले विचार व वाद घातले आहेत. या संवादांतील पुष्कळसा भाग ऐतिहासिक सत्य नसून प्लेटोच्या कल्पनेचा खेळ आहे. सॉक्रेटिसाच्या मृत्यूच्या दिवशीं अशीं संभाषणें झाल्याचा ऐतिहासिक पुरावा नाहीं. सॉक्रेटिसानें एखादा भौतिक, आध्यात्मिक, किंवा इतर तात्त्विक वाद जगापुढें मांडला म्हणून त्याची प्रख्यात तत्त्वज्ञ म्हणून कीर्ति झाली असें नाहीं. त्याची शास्त्रशुद्ध सत्यज्ञानाची कल्पना व त्या सत्यशोधनाचा त्यानें दाखवून दिलेला मार्ग, यांमुळें तो आज कीर्तिरूपानें अजरामर होऊन राहिला आहे.

● ● ●

# ९. ज्ञान व नीति

नागरिकांना सत्यज्ञान झाल्याशिवाय ॲथेन्सची बिघडलेली घडी नीट बसणार नाहीं असें पाहून, सॉक्रेटिसानें आपल्या नगरबांधवांना सत्यज्ञानाचा मार्ग कसा आंखून दिला हें मागील प्रकरणांत आपण पाहिलें. या कार्याबरोबरच त्यानें आपल्या दुसऱ्या एका महत्त्वाच्या कार्याला मृत्यूच्या घटकेपर्यंत वाहून घेतलें. मनुष्य व्यवहारांत प्रतिक्षणीं अनेक गोष्टी करीत असतो, व त्या सर्वांचा मूलभूत हेतु 'सुखप्राप्ति' हा असतो. तथापि मनुष्याला खरें सुख क्वचितच मिळतें. ॲथेन्सच्या नागरिकांची हीच स्थिति होती असें सॉक्रेटिसाला दिसून आलें. याचें कारण नागरिकांचें खरें सुख प्राप्त करून देणाऱ्या आचरणाच्या मुळाशीं असणाऱ्या तत्त्वांचें अज्ञान असें त्याच्या मनानें घेतलें. या मूलभूत तत्त्वांचें यथार्थ ज्ञान झाल्यास मनुष्याच्या हातून अयोग्य, अहितकारक वर्तन घडणें अशक्य आहे असें त्याचें मत होतें. या विचारानें ज्ञानाबरोबर नैतिक विषयांकडे त्याचें लक्ष गेलें. सॉक्रेटिसाच्या ज्ञानमार्गाचा आराखडा मागील प्रकरणांत घेतला. आतां त्याचें नीतिविषयीं काय म्हणणें आहे तें पाहूं. हा प्रश्नहि ज्ञानमार्गाचेंच अंग होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

नीतिशास्त्राचें काम कार्याचें किंवा आचरणाचें नैतिक मूल्यमापन करण्याचें आहे. मनुष्याचा आचार व त्याचें शील हीं मूल्यमापनाचीं क्षेत्रें होत. स्वतंत्र बुद्धीनें, स्वेच्छेनें केलेल्या कृतीलाच नैतिक मूल्यमापन असूं शकतें. निसर्गाच्या कार्याचें किंवा दुसऱ्याच्या हुकुमानें किंवा जबरदस्तीनें केलेल्या कार्याचें कार्यकर्त्याच्या दृष्टीनें नैतिक मूल्यमापन होत नाहीं. नीतिशास्त्राचीं दोन अंगें आहेत. एक आचार

व दुसरें शील. आचारमीमांसेनें कर्तव्य म्हणजे काय व त्याच्या क्षेत्रांत कोणकोणतीं कृत्यें येतात हें समजतें. शीलाच्या मीमांसेनें सद्गुणाचें स्वरूप व त्यांत मोडणारे विविध सद्गुण यांचा बोध होतो. सद्गुणाचा विचार म्हणजे कृत्याचें नैतिक मूल्यमापन. आचारमीमांसेनें मनुष्यानें काय करावें याचें ज्ञान होतें, शीलमीमांसा त्यानें कसें व्हावें हें शिकविते. तथापि मनुष्याच्या शीलाप्रमाणें त्याच्या हातून बरींवाईट कृत्यें घडत असल्याकारणानें सद्गुणविषयक प्रश्नच नीतिशास्त्राचें प्रधान अंग होय. कर्तव्य पार पडणें किंवा न पडणें हेंसुद्धां मुख्यत्वें करून मनुष्याच्या सद्गुणदुर्गुणांवर अवलंबून असतें. ग्रीक नीतिशास्त्राची दृष्टि सद्गुणविषयक प्रश्नांवरच दिलेली असे; कृत्याच्या नैतिक मूल्यमापनाकडे तिचें लक्ष असें. त्यांच्या शास्त्राचें हें एक वैशिष्ट्य होतें. अर्वाचीन नीतिशास्त्र मुख्यत्वें करून कर्तव्याचा विचार करतें. कर्तव्य असो किंवा सद्गुण असो, विचार करीत असतांना नीतिशास्त्र तेथेंच न थांबतां या दोघांच्यापलीकडे जाऊन मनुष्याचें अंतिम ध्येय जें सुख किंवा हित याचा विचार करतें. मनुष्याचें कर्तव्य काय किंवा त्याचें शील कसें असावें या विचारापेक्षां त्याचें कर्तव्य व शील विवक्षित प्रकारचीं कां असावींत, अशीं असण्यांत हेतु काय, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. या प्रश्नाच्या उत्तरानें नैतिक ध्येय व कार्याचें नैतिक मूल्यमापन ठरवितां येतात. ग्रीक नीतिशास्त्रज्ञांच्या दृष्टीनें या शास्त्राचा अखेरचा प्रश्न मानवी जीवनाचें अंतिम ध्येय किंवा हितसर्वस्व ( Summum bonum ) कोणतें हा होता.

ॲथेनिअन नागरिकांना सोफिस्टांकडून मिळणाऱ्या कामचलाऊ ज्ञानानें मानवाचें खरें हित कशांत आहे हें न समजल्याकारणानें समाजाची व राजकारणाची घडी विसकटली आहे, ती सुधारावयाची झाल्यास नागरिकांना त्यांचें खरें हित कशांत आहे याचें ज्ञान झालें पाहिजे, व हें ज्ञान होण्यास नीतिशास्त्राची त्यांना ओळख होणें अवश्य आहे, असें सॉक्रेटिसाचें मत होतें. त्यांना त्यानें सत्यशोधनाचा म्हणजेच 'ज्ञानाचा मार्ग' कसा दाखविला हें मागील प्रकरणांत आपण पाहिलें. या ज्ञानदानाच्यामागें त्याचा मूळ हेतु त्यांना त्यांच्या खऱ्या हिताचा मार्ग दाखविण्याचा होता. सॉक्रेटिसानें आयुष्यभर आपल्याला याच कार्याला वाहून घेतलें, व त्याचा परिणाम होऊन ॲथेन्सचे नागरिक नैतिक प्रश्नांचा मनापासून विचार करूं लागले. " ज्ञान म्हणजेच नीति किंवा

सद्गुण '', असें सॉक्रेटिसाचें मत होतें, आणि याच कारणानें त्याचें लक्ष केवळ विज्ञानाकडे न वळतां मानव व मानवी समाज यांच्या प्रश्नांनीं वेधलें. लोकांना खऱ्या हिताप्रत नेणारें मार्गदर्शन न झाल्यामुळें जीवनांत हितकर काय आहे हें समजत नाहीं व हें समजत नाहीं तोंपर्यंत त्यांना सत्यज्ञान झालें नाहीं हें निश्चित, असें त्याचें म्हणणें असें. ज्ञान म्हणजेच सद्गुण किंवा मानवाचें हित. सॉक्रेटिसाच्या एकंदर शिकवणीच्या मुळाशीं हेंच तत्त्व होतें. योग्य आचार होण्याला हित म्हणजे काय याचें ज्ञान अवश्य आहे. त्यानें आपलें म्हणणें जरा स्पष्ट करून दाखविलें आहे. तो म्हणतो, चांगला पदार्थ, चांगला चाकू, चांगलें कृत्य याप्रमाणें 'चांगला' हा शब्द आपण नेहमीं योजीत असतों. या सर्व ठिकाणीं या शब्दाचे निरनिराळे अर्थ असले, तरी सर्वांच्यामागें एक विचार सर्वसामान्य असतो. 'चांगला' म्हणजे कार्यभाग साधण्यासारखा. चांगला चाकू म्हणजे उत्तम धारेचा, चांगला अग्नि म्हणजे उत्तम पेटलेला. अशाच रीतीनें चांगला शेतकरी, चांगली माता, चांगला शिपाई असा या शब्दाचा उपयोग मानवी कार्याविषयीं आपण करतों. परंतु चांगला माणूस व चांगला पदार्थ यांत एका दृष्टीनें अंतर आहे. चांगल्या पदार्थाच्या चांगलेपणाचा उपयोग दुसऱ्यानें करावयाचा असतो, तसाच त्याचा चांगलेपणाहि दुसऱ्यानेंच ठरवावयाचा असतो. चांगल्या चाकूचा उपयोग एखाद्या माणसाला होतो व तोच त्याचा चांगलेपणा ठरवितो. पण माणसाच्या बाबतींत असें होत नाहीं. त्याच्या चांगलेपणाचा उपयोग स्वतः करून त्याला तो सिद्ध करावा लागतो. चांगल्या शिपायाला किंवा शिक्षकाला आपला गुण योग्य कृति दाखवून लोकांना पटवून द्यावयाचा असतो. अर्थात् स्वतः त्या व्यक्तीला चांगला शिपाई व चांगला शिक्षक याचें यथार्थ ज्ञान असल्याशिवाय हें घडून येणार नाहीं. म्हणूनच सॉक्रेटीस ज्ञानाशिवाय चांगलेपणा म्हणजे सद्गुण वा नीति अशक्य असें म्हणतो. येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं तो 'ज्ञान' शब्द मानवी जीवनाविषयींचें ज्ञान या अर्थानें घेतो. भौतिक ज्ञानाचें त्याला महत्त्व कधींच वाटलें नाहीं. तें ज्ञान मिळविणें अशक्य आहे असें त्याचें म्हणणें नव्हतें, पण त्याच्या मतानें तें महत्त्वाचें नव्हतें. शिवाय त्याच्या मतानें भौतिक विषयांचें ज्ञान पूर्णपणें मिळणें अशक्य. तें मनुष्याच्या शक्तीपलीकडे आहे. ज्या ज्ञानानें मनुष्याला चांगलेपणा येईल, जें मनुष्याचें खरें हित साधील, तेंच ज्ञान

महत्त्वाचें. मानवी जीवन म्हणजे काय व तें जीवन आचरणांत कसें आणावयाचें हें समजल्याशिवाय मनुष्य उत्तम राजकारणी, उत्तम शिक्षक, किंवा कोणत्याहि क्षेत्रांत उत्तम कार्यकर्ता होणार नाहीं. येवढ्याचकरितां सॉक्रेटिसाला जनतेला मानवी जीवनक्रमाचे निश्चित नियम घालून देऊन, " असें वागणें योग्य, हित-साधनाकरितां तुम्हांला असेंच वागणें अवश्य आहे ", अशी शिकवण द्याव-याची होती. ह्या ज्ञानाचा त्यानें आंखलेला मार्ग आपण मागें पाहिला आहे. प्रामाणिक व्हा, देशाभिमान बाळगा, अंगीं सहनशीलता आणा, असा उपदेश करण्याऐवजीं, " प्रामाणिकपणा, देशाभिमान इत्यादि शब्दांचे अर्थ काय ते विचार करून ठरवा ", असें त्याचें जनतेला सांगणें असें. या पद्धतीनें त्याला त्याच्यापुढें संभाषणाकरितां येणाऱ्या व्यक्तीच्या स्वभावाचा कसहि कळून येई. संवादांतून शब्दांचे खरे अर्थ प्रतिपक्षाकडून काढून घेण्याकरितां प्रतिपक्षाला निरनिराळ्या प्रकारें छेडावें लागें, व अशा रीतीनें तो शब्दांचा खरा अर्थ त्याच्या मुखांतून काढून घेई. त्या वेळीं त्या व्यक्तीचे ज्ञानाविषयींची कळकळ, प्रयत्नाची चिकाटी, प्रामाणिकपणानें अज्ञान कबूल करण्याची तयारी वगैरे गुण कसाला लागत. हे गुण अंगीं असल्यावांचून ज्ञान मिळणें शक्य नाहीं, व म्हणूनच ज्ञान व सद्‌गुण यांचा दृढ संबंध आहे असें सॉक्रेटिसाचें म्हणणें होतें. तो याच्याहि पुढें एक पाऊल जाऊन " सद्‌गुण म्हणजेच ज्ञान " असें प्रतिपादन करी. हा एक विरोधाभास आहे. सॉक्रेटिसाच्या नैतिक विचारांत ह्या विरोधाभास एक कोडें होऊन बसला आहे. त्याची ही केवळ एक बौद्धिक कसरत होती असें नाहीं. त्यानें हा विरोधाभास स्पष्ट शब्दांनीं मांडला नसता तरी सुद्धां त्याच्या एकंदर संवादांतून हाच ध्वनि निघाला असता. त्याचें प्रामाणिकपणें असें मत होतें कीं, फक्त ज्ञानी माणूसच सदाचारी असतो. एका ज्ञानानेंच सदाचरण घडूं शकतें. " सद्‌गुण म्हणजे ज्ञान " या विधानाचा अर्थ समजून घेण्यास ' ज्ञान ' शब्द सॉक्रेटिसाप्रमाणें अत्यंत व्यापक व पूर्ण अर्थानें घ्यावयास पाहिजे. मॅर्गरेट ई. जे. टेलरच्या " Greek Philosophy " या पुस्त-कांत ह्या विरोधाभास उलगडून दाखविण्याकरितां दुसरा असाच एक विरोधा-भास उदाहरणार्थ घेतला आहे. सेंट पॉलचें एक विधान अशाच प्रकारचें आहे. तो म्हणतो, " प्रेम म्हणजेच नियमाचें पालन " ( Love is the fulfilling of the law ). कृतीनें निदर्शित झालेलें प्रेम नेहमीं ज्याला

खरें, योग्य प्रेम म्हणतां येईल असें असतें का ? एखादा मुलगा ' मी शाळेंत जात नाहीं ' किंवा ' मी औषध घेणार नाहीं ' असा आईजवळ हट्ट घेऊन बसतो, व आई वेड्या पुत्रप्रेमानें त्याचा हट्ट पुरा करतांना आपण पुष्कळ वेळां पाहतों. अशा वेळेस त्या आईच्या प्रेमाला " प्रेम " म्हणतां येईल का ! फार तर आपण ' अहो, तें आईचें आंधळें प्रेम ', असें म्हणूं. आईचें प्रेम पूर्णार्थानें म्हणजे ' खरें, मुलाला हितकर असणारें प्रेम ' या अर्थानें असतें तर तिची मुलाशीं निराळी वागणूक झाली असती. प्रेम शब्दाचा खरा अर्थ त्या आईला कळता तर तिचें वर्तन नियमाला धरूनच झालें असतें, असा सेंट पॉलच्या विरोधाभासक विधानाचा अर्थ होतो. याच दृष्टीनें, ' ज्ञान म्हणजे सद्गुण किंवा योग्य वर्तन ' किंवा ' सद्गुण म्हणजे ज्ञान ' हा विरोधाभास उलगडला पाहिजे. प्रेमाप्रमाणें ' ज्ञान ' शब्द पूर्णार्थानें, व्यापक अर्थानें घ्यावा. परंपरेनें आलेलें किंवा एखाद्या व्यक्तीपासून मिळालेलें ज्ञान हें खरें ज्ञान नाहीं. पूर्ण तर्कशुद्ध विचारानें स्वतःची खात्री होऊन आत्मविश्वास उत्पन्न करून देणारें ज्ञान तेंच ज्ञान, आणि हेंच विचारानें मिळविलेलें ज्ञान अंगांत बाणून शेवटीं मनुष्याच्या स्वभावांत एकजीव होतें. अर्थात् त्या मनुष्याच्या हातून त्या ज्ञानाच्याविरुद्ध आचरण होत नाहीं. सॉक्रेटिसाचें म्हणणें थोडक्यांत असें निदर्शित करतां येईल. ज्याला मानवी जीवन व आचार यांचा उद्देश यथार्थ समजला आहे, ज्याला आपल्या हातून घडणाऱ्या कृतीच्या परिणामाचें चांगलें ज्ञान झालें आहे, जो कृतीवर शील कसें अवलंबून आहे हें जाणतो, आणि ज्यानें मानवी जीवनाच्या ध्येयाच्या सिद्धीची अंगावर पडणारी जबाबदारी बरोबर ओळखली आहे, त्या मनुष्याच्या हातून अयोग्य, अनैतिक वर्तन जाणूनबुजून घडणारच नाहीं. एखादी कृति हानिकारक, शीलभंग करणारी आहे असें निश्चित ज्ञान झाल्यावर मनुष्याच्या हातून ती कशी घडेल ? मनुष्याच्या हातून अयोग्य वर्तन घडतें याचें कारण मानवी जीवन व आचार यांविषयीं त्याच्या भलत्याच चुकीच्या कल्पना असतात. जर त्याची विचारसरणी सामान्यतः योग्य असली, तर ती त्याच्या स्वतःच्या विचारानें उत्पन्न होऊन अंगांत मुरलेली नसते. त्यानें ते विचार दुसऱ्याचे जसेच्या तसे, त्यांचा सत्याचा कस न पाहतां घेतलेले असतात. अशा रीतीनें विचार केल्यास सॉक्रेटिसाचें वरील विधान विरोधाभासाचें वाटणार

नाहीं. विचाराच्या योगानें सत्यज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केल्यास सत्य व सदाचार यांचें योग्य मार्गदर्शन होतें.

मनुष्य सत्कृत्य चांगलें म्हणून करतो, तसें दुष्कृत्य वाईट म्हणून करतो असें नसतें. तर तेवढयापुरतें आपण करतों तें दुष्कृत्य नसून सत्कृत्यच आहे अशी स्वतःची समजूत करून तो तें करीत असतो. तो आपल्या मनाचें न जाणतां खोटें समाधान करीत असतो. 'गॉर्जिआ' (Gorgia) संवादांत सॉक्रेटीस म्हणतो, "प्रत्येक मनुष्याच्या मनांत कधींहि नष्ट न होणारी अशी एक मूलभूत इच्छा वास करीत असते. हित (Good) किंवा सुख (Happiness) याची प्राप्ति व्हावी ही मूलभूत इच्छा. सत्ता, संपत्ति वगैरे दिखाऊ सुखसाधनें इतर सर्व बाबतींत खऱ्या नाण्याऐवजीं मनुष्य पतकरतो. परंतु शेवटीं हितसाधनांच्या दृष्टीनें या बेगडी दिखाऊपणानें त्याचें समाधान होत नाहीं. केवळ अज्ञानामुळें हींच खरीं सुखप्राप्तीचीं साधनें असें वाटून तो या साधनांच्या मागें लागतो. पण त्यामुळें त्याचें समाधान न होतां प्रसंगीं आपल्या वर्तनामुळें त्याच्या मनाला सतत कांहीं तरी बोंचत राहतें. असा मनुष्य वेळीं मानसिक व्यथा असह्य होऊन मरण पतकरण्यास तयार होतो. मनुष्याला जर खरोखर असें ज्ञान झालें कीं शारीरिक किंवा सांपत्तिक नाम-धारीं सुखें खऱ्या मानसिक सुखाच्या मानानें तोटकीं पडतात, तीं खरीं सुखें नाहींत हें त्रिवार सत्य आहे, तर त्याला दुष्कृत्य करण्याचा मोह होणार नाहीं. दुराचरण नेहमीं सुखाच्या खोट्या कल्पनेमुळें घडतें."

सॉक्रेटीस 'ॲपॉलॉजी'त भेटेल त्या मनुष्याशीं संभाषण करण्याचीं कारणें सांगतांना आपण लोकांचें ज्ञान सत्याच्या कसोटीस लावून पारखण्याकरितां व त्यांना सद्गुणाचें अत्यंत महत्त्व पटवून देण्याकरितां संभाषणें करतों असें म्हणतो. तो पुढें म्हणतो, "सदाचार किंवा सद्गुण म्हणजेच ज्ञान; याच्या उलट दुर्गुण किंवा दुराचार म्हणजे अज्ञान. दुष्कृत्य अज्ञानामुळें घडत असल्याकारणानें त्याची जबाबदारी किंवा दोष तें करणाऱ्या व्यक्तीवर पडत नाहीं." मेलेटस न्यायालयांत 'सॉक्रेटीस तरुणांचीं मनें बिघडवितो' असा आरोप करतो त्या वेळेस याच वरील आधारानें सॉक्रेटीस आरोपाचें निरसन करतो. तो म्हणतो, "मेलेटस, तूं खोटें बोलतोस, व तूं खोटें बोलतोस हें तूं जाणून आहेस. एक तर मी तरुणांचीं मनें बिघडवीत नसलों पाहिजे, किंवा बिघडवीत असलों तर तें

माझ्याकडून अज्ञानानें घडत असलें पाहिजे. मी करतों हें अनैतिक आहे असें मला कळतांच मी तसें आचरण करणार नाहीं. ज्याला योग्य गोष्टीचें ज्ञान झालें आहे त्या मनुष्याचे हातून अयोग्य गोष्ट घडणारच नाहीं. ज्ञान म्हणजे उच्च कोटींतलें ज्ञान. ज्ञान हें सदाचाराचें – सद्‌गुणाचें – एक अंग नाहीं, तर ज्ञान सदाचाराचा प्राण आहे. ज्ञान म्हणजेच सद्‌गुण, सद्‌गुण म्हणजेच ज्ञान."

सॉक्रेटिसाच्या वरील विचारसरणींतील दोष सहज दिसण्यासारखे आहेत. ज्यांना सद्‌गुणांची मीमांसा करतां येत नाहीं, ज्यांना आपण अडाणी म्हणूं, असे सदाचारसंपन्न सद्‌गुणी लोक आपण पुष्कळ पाहतों. सॉक्रेटिसाच्या विधानाप्रमाणें हे अडाणी लोक सदाचारी कसे ठरणार ? जें हितकर, जें सदाचाराचें, तें आचरणांत आणण्याची मनुष्याला इच्छा असते. तथापि तें करूनसुद्धां आचरण्यांत येत नाहीं. जें करणें अनिष्ट, जें करूं नये असें वाटतें, तें मनुष्य करीत असतो. येथें ज्ञान असतें, पण हातून कृति घडत नाहीं; कळतें पण वळत नाहीं. असें आचरण वाईट हें माहीत असून तें प्रत्यहीं आपल्या हातून घडत असतें. इच्छा व कृति, विचार व विकार, यांच्यांत लढा उत्पन्न होऊन, इच्छेविरुद्ध व विचाराविरुद्ध विकाराचा जय होऊन मनुष्याच्या हातून अयुक्त कृति घडते हें सॉक्रेटिसानें लक्षांत घेतलें नाहीं असें म्हणतां येईल. त्याची स्वतःची इच्छाशक्ति व तत्त्वाला धरून वागण्याची चिकाटी इतकी दृढ होती कीं सामान्य माणसांचा या बाबींतला मानसिक कमकुवतपणा त्याला दिसला नाहीं. हा आक्षेप पुष्कळ अंशीं खरा आहे. पण सॉक्रेटिसाचा हा दोष दाखविण्यापेक्षां त्याच्या विचारांतील सत्यांशाकडे लक्ष देणें अधिक हितकर होईल, असें मॅर्गरेट टेलर यांचें म्हणणें आहे व तें युक्त आहे. त्या म्हणतात, "हल्लींच्या काळांत विचार व आचार यांच्या संबंधाकडे दुर्लक्ष करण्याकडे, त्याची हेळसांड व हेटाळणी करण्याकडे लोकांचा कल अधिक आहे असें दृष्टीस पडतें. सॉक्रेटिसाप्रमाणें ते विचाराकडे जरा फाजील लक्ष देतील तर बरें होईल. मानवी संस्कृतींत जें जें उत्कृष्ट, मूल्यवान् आहे, तें तें सर्व वरील लोकांच्या आचरणानें ऱ्हास पावण्याच्या धोक्यांत पडलें आहे. सामाजिक जीवनापासून हित साधावयाचें असेल, मानवी संस्कृति टिकवावयाची असेल, तर सॉक्रेटिसाच्या तर्कशुद्ध विचारसरणीचा स्वेच्छाचाराच्या ठरीव कल्पना नष्ट करण्यास

कसा उपयोग होईल याचा समाज विचार करील तर तें हितावह होईल. "[1] टेलरच्या या विचारापासून आपण भारतीयांनींहि आज धडा घेण्यासारखा आहे.

सॉक्रेटिसाचें सामान्यतः अमान्य होण्यासारखें दुसरें एक विधान आहे. तो म्हणतो, " सर्व सद्‌गुण एकच गोष्ट, व ती म्हणजे ज्ञान. "[2] सॉक्रेटिसाचें हें म्हणणें आतांपर्यंत झालेल्या विवेचनावरून समजण्यासारखें आहे. आपण नेहमीं औदार्य, शौर्य, सहानुभूति वगैरे अनेक सद्‌गुण मानतों. एकाच मनुष्यांत सर्व सद्‌गुण वास करीत नाहींत. एक सद्‌गुण एका मनुष्यांत उत्तम प्रकारें दिसेल, तर दुसऱ्या एखाद्या गुणाचा त्याच्यांत अभाव असेल. एकादा माणूस शूर असेल पण त्याचें मन कदाचित् उदार नसेल. सॉक्रेटीस ही वस्तुस्थिति कबूल करतो. तथापि त्याचें म्हणणें असें कीं अशा सद्‌गुणांना सद्‌गुण म्हणावयाचें झाल्यास प्लेटो ज्यांना " सामान्य, अविचारी जनतेचे, 'अनागर' जनतेचे, सद्‌गुण "[3] म्हणतो त्यांत यांचा अंतर्भाव करावा. ज्यांना मानसिक स्वास्थ्याचें ( Health of the soul ) महत्त्व कळत नाहीं असे लोक भिन्न भिन्न सद्‌गुण मानतात. मानसिक स्वास्थ्य हेंच खरें सुख हें त्यांना समजत नाहीं. केवळ रूढ आचारांप्रमाणें न वागल्यास जीवन सुखकर होणार नाहीं असें वाटून त्यांची वागणूक अंशतः तथाकथित सद्‌गुणांची होत असते. पण त्यामुळें त्यांच्या मनाला समाधान नसतें, कारण सद्‌गुणांबरोबर असलेल्या दुर्गुणांची बोंच त्यांच्या मनांत राहतेच. 'अनागर' सद्‌गुण हें खोटें नाणें आहे. सद्‌गुणाची खरी किंमत त्याच्या खऱ्या मूल्याचें स्वतःला असलेलें ज्ञान व त्याविषयींचा आत्मविश्वास यांवर अवलंबून असते. मानवी आचारांच्यामागें एक तत्त्व असणें अवश्य आहे. तें तत्त्व म्हणजे सत्यज्ञान. या ज्ञानाची निश्चित दृष्टि आलेला माणूस कांहीं कृतींना हें तत्त्व लावील व कांहींना तें लावणार नाहीं असें होणें नाहीं. आत्महित कशानें होईल हें समजणारा माणूस सर्व आचारांसंबंधीं एकच वृत्ति ठेवील. तात्त्विक दृष्टीनें हा एक सद्‌गुण, हा दुसरा,

१. " Greek Philosophy "—Margaret E. J. Taylor.
२. " All virtues are one thing, and the thing is knowledge. "
३. " Vulgar virtues ".

असे भेद त्याच्या ठिकाणीं नष्ट होतील. त्याची सर्व वागणूक या एकाच अचल, निश्चित तत्त्वानें होईल. म्हणून सॉक्रेटीस म्हणतो, "सर्व सद्‌गुण म्हणजे वास्तविक एकच सद्‌गुण. या दृष्टीनें सद्‌गुणाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केल्यास शेवटीं सर्व सद्‌गुणांची एकच व्याख्या तयार होईल."

सॉक्रेटीस जेव्हां 'ज्ञान म्हणजेच सद्‌गुण' असें म्हणतो तेव्हां कार्याच्या नैतिक मूल्याचें, आत्महिताचें ज्ञान, असाच 'ज्ञान' शब्दाचा अर्थ तो घेतो. पण यापुढें हें आत्महिताचें ज्ञान मिळवावयाचें कसें असा प्रश्न स्वाभाविकपणें उभा राहतो. ज्ञान कांहीं मनुष्याच्या जन्माबरोबर येत नाहीं. कोणतेंहि ज्ञान असो, तें त्याला मिळवावें लागतें. तर मग हें ज्ञान मिळविण्याचा मार्ग कोणता ? या प्रश्नाचा सॉक्रेटिसानें स्पष्टपणें पूर्ण उलगडा केल्याचें कोठें दिसत नाहीं. पण त्यानें काय उत्तर दिलें असतें याचें अनुमान करतां येतें. प्लेटोच्या म्हणण्याप्रमाणें 'ऑर्फिक'[१] पंथीयांच्या मतें मनुष्याच्या आत्म्याला आपल्या दैवी जन्मस्थानाचें ( Divine origin ), ब्रह्माचें, विस्मरण झालें असलें तरी त्याला त्याची आठवण होऊं शकते. हें मत सॉक्रेटिसाला मान्य होतें. या मतावरून त्याच्या मनांत दुसरा एक विचार येऊन त्याचें असें मत झालें कीं, जीवनांत घडणाऱ्या व अनुभवाला येणाऱ्या गोष्टी, कृत्यें, किंवा घटना, आपल्यामागें व आपल्यापेक्षां श्रेष्ठ असें एक सर्वव्यापी तत्त्व असल्याचें मनुष्याला स्मरण करून देतात किंवा त्याला त्याची जाणीव उत्पन्न करून देतात. या स्मरणाची किंवा जाणिवेची क्रिया ( Process ) म्हणजे ज्ञान. गणिताचा शिक्षक एखादी आकृति काढून व विद्यार्थ्यांस तिच्यासंबंधीं प्रश्नामागें प्रश्न विचारून त्याच्याच मुखांतून सर्वव्यापी सामान्य सिद्धान्त वदवून त्याला त्याचें ज्ञान करून देतो. अशाच रीतीनें सॉक्रेटिसानें एका अडाणी गुलामाच्या मुखानें एक भूमितीचा सिद्धान्त वदविल्याचें सांगितलें आहे. सॉक्रेटिसाचें म्हणणें विद्यार्थ्यांत हें

१. **ऑर्फिक पंथ.** हा पंथ खि. पू. सहाव्या शतकांत निघाला. ग्रीक पौराणिक कथांत होमर कवीच्यापूर्वी ऑर्फिअस नांवाचा एक मोठा कवि होऊन गेल्याचा उल्लेख आहे. ऑर्फिअस पंथाचे अनुयायी ऑर्फिअसला आपल्या पंथाचा आदिगुरु मानीत. ऑर्फिअसचा पुनर्जन्मावर विश्वास होता व तो मनुष्याच्या भावी पुनर्जन्माचें रम्य चित्र रंगवी.

ज्ञान सुप्त ( latent ) असतें, पण त्याची त्याला जाणीव नसते. शिक्षक त्याला प्रश्न विचारून ही जाणीव करून देतो. याप्रमाणें मनुष्याला प्रश्नामागून प्रश्न विचारून त्याच्या कार्यांच्या योग्यतेचें, नैतिक मूल्यमापनाचें व परिमाणाचें ( Moral standard ) ज्ञान करून देतां येईल. याच नियमाचा आधार घेऊन प्लेटोनें आपल्या ' तत्त्वज्ञान मीमांसे 'चा ( Theory of philosophy ) विकास केला. ही मीमांसा थोडक्यांत अशी कीं सत्यान्वेषणाकरितां विचार करणाऱ्या अनेक मनांच्या संघर्षणांतून तत्त्वज्ञान निर्माण होतें.

ग्रीक तत्त्वज्ञांनीं नैतिक मूल्याचा विचार करतांना खासगी व्यक्ति, समाज व राजकारण या क्षेत्रांतील आचरणांत भेद केले नाहींत. ग्रीक लोक राजकारणाला सर्वांत अधिक महत्त्व देत. यामुळें विशेषेंकरून त्याच क्षेत्रांतील कार्यांवरून व्यक्तीचें नैतिक महत्त्वमापन होत असे. सॉक्रेटीसहि नैतिक मूल्याची आपली कसोटी नगरराज्याचे राज्यकर्ते अधिकारी, राजकारणी पुरुष व सामाजिक कार्यकर्ते यांना लावी. राजकारण नीतिशास्त्राचाच एक भाग असें तो मानी. नागरिकांच्या वैयक्तिक नीतिमत्तेवर राजकारणी पुरुषांचा व अधिकाऱ्यांचा मोठेपणा अवलंबून आहे. नागरिकांतूनच अधिकाऱ्यांची निवड व्हावयाची व नागरिकांपैकींच कांहींजण राजकारणांत भाग घेणार. अर्थात् ' खाण तशी माती ' या न्यायानें जसे नागरिक तसेच अधिकारी व राजकारणी पुरुष असणार. सॉक्रेटीस स्वतः अत्यंत राजनिष्ठ असे, तो नगरराज्याला पूर्ण मान देई. पण ॲथेन्सची लोकसत्तापद्धति त्याला मान्य नव्हती. ज्यांचें सदाचरण म्हणजे काय याविषयीं अज्ञान, इतकेंच नव्हे तर राज्यकारभार वाहण्यास पात्रता येण्यासाठीं अवश्य त्या ज्ञानाची जरुरी ज्यांना कधीं स्वप्नांतहि भासली नाहीं, अशा लोकांची ' लोकसत्ता ' त्याला मानवणें शक्य नव्हतें. त्याचा पट्टशिष्य प्लेटो याचेंहि मत असेंच होतें. त्यानें आपल्या ' गॉर्जिॲस् ' संवादांत व ' रिपब्लिक ' मध्यें सॉक्रेटिसाच्या तोंडीं ॲथेनिअन लोकसत्तेविषयींचें विरोधी मत फार कडक शब्दांत व्यक्त केलें आहे. ही कडक भाषा सॉक्रेटिसापासून आलेली असावी.

प्लेटोनें ' रिपब्लिक ' या ग्रंथांत निदर्शित केलेल्या मताप्रमाणें लोकसत्ताक राजपद्धतीचें एक मुख्य तत्त्व असें आहे कीं, तिच्यांतील राजकारणी पुरुषांना श्रेष्ठ बुद्धिमत्ता व नीतिमत्ता असणें अवश्य आहे. तसें नसेल तर प्रख्यात जर्मन तत्त्ववेत्ता नीत्से ( Nietzsche ) म्हणतो त्याप्रमाणें " लोकसत्ताक

संस्था म्हणजे धनगराशिवाय मेंढ्यांचा कळप. त्याचें सामान्यतः नशीब हेंच कीं कर्तृत्ववान् परंतु नीति-अनीतीची चाड न करणाऱ्या एखाद्या झोटिंगाच्या तावडींत सांपडणें.'' प्लेटोनें 'गॉर्जिॲस' या संवादांत ॲथेनिअन लोकसत्ताकांतील थेमिस्टॉक्लीजपासून पेरिक्लीजपर्यंत सर्वांना या कोटींत घालून त्यांच्यावर कडक टीका केली आहे. या मालिकेंतून त्यानें फक्त ॲरिस्टाइडीज[1] यालाच अपवाद म्हणून वगळलें आहे. सॉक्रेटिसाच्या मनाला ही ॲथेन्सच्या नगरराज्याची अनिष्ट परिस्थिति सतत बोंचत होती. ती दूर करण्याकरितां त्यानें नागरिकांची नीति सुधारण्याचा आजीव प्रयत्न केला.

• • •

१. ॲरिस्टाइडीज (Aristides the Just) – (ख्रि. पू. ५३० – ४६८) ॲथेन्सचा एक प्रख्यात राजकारणी नागरिक.

## १०. धर्मविषयक व समाजविषयक विचार

सॉक्रेटिसाच्या एकंदर जीवनक्रमांत धार्मिक वृत्ति सर्वत्र दिसून येते. त्याचा देवादिकांवर विश्वास होता. आपण आपलें जीवनकार्य परमेश्वरी आज्ञेनें पतकरलें आहे असें तो न्यायालयांतील पंचांना सांगतो. खटल्याच्या शेवटीं आपल्यावर आलेल्या पाखंडीपणाच्या आरोपाचें निराकरण करतांना तो नागरिकांना उद्देशून म्हणतो, " ॲथेनिअन नागरिक हो, माझ्यावर आरोप करणाऱ्या सर्व व्यक्तींपेक्षां माझा देवांवर अधिक विश्वास आहे. माझ्या खटल्याचा निकाल सर्वस्वीं आपल्यावर सोंपवितों. आपणां उभयतांना अत्यंत श्रेयस्कर असा न्याय द्या. " नागरिकांच्या प्रचलित देवदेवता सॉक्रेटीस मानतो. धर्मकृत्यें व प्रार्थना वेळेवर करण्यास तो चुकत नाहीं. अगदीं शेवटच्या क्षणीं ' देवाला कोंबडा वाहावयाचा राहिला तेवढा वाहा ', असें तो आपल्या मित्राला बजावून सांगतो. अशा रीतीनें नागरिकांचा धर्म व देवदेवता त्याला मान्य असली तरी या देवदेवतांच्या अनैतिक दुष्कृत्यांविषयीं तो आपली नापसंती व्यक्त करण्यास कचरत नाहीं. आपल्या नगरबांधवांचा धर्म जशाचा तसा पूर्णपणें पतकरण्यास तो तयार नाहीं. एक परमेश्वर सर्वश्रेष्ठ असें तो अनेकदां म्हणतो. त्याच्या मतानें परमेश्वर ही एक अज्ञेय, गूढ शक्ति आहे. ती केवळ अनुमेय आहे. परमेश्वरच फक्त सर्वज्ञ व सुज्ञ आहे. तो सज्जनांना दुष्कृत्यांपासून लांब ठेवतो; तोच त्यांना स्वप्नद्वारां मार्गदर्शन करतो. त्याच्या आज्ञा, त्याचे नियम सर्वश्रेष्ठ आहेत. ते प्रत्येकानें पाळावे. त्यानें नागरिकांना उद्देशून केलेल्या भाषणाच्या शेवटच्या शब्दांनीं त्याची परमेश्वरावरील दृढ श्रद्धा चांगली व्यक्त

होते. तो म्हणतो, " नगरबांधव हो, तुमच्याविषयीं माझ्या मनांत अत्यंत आदर व प्रेम आहे, परंतु मी मानवी आज्ञेपेक्षां परमेश्वरी आज्ञा पाळीन. " हे शब्द त्यानें शेवटपर्यंत खरे केले. परमेश्वरी आदेश पार पाडीत असतांनाच त्यानें मृत्यु स्वीकारला !

शेवटीं सॉक्रेटिसाचे सामाजिक विचार कसे होते हें पाहूं. ग्रीक देशांत प्राचीन काळीं प्रत्येक नगराचें राज्य निराळें असल्यामुळें राज्याचें क्षेत्र फारच मर्यादित असें. या नगरराज्यांतील जनतेचें लक्ष मुख्यत्वेंकरून राजकारणानें वेधलेलें असें व त्यामुळें बाकीचीं कार्यक्षेत्रें तिला तितकीं महत्त्वाचीं वाटत नसत. त्याचा परिणाम असा झाला होता कीं राजकारण व समाजकारण यांत नागरिक फारसा फरक मानीत नसत. याच कारणानें सॉक्रेटिसानें नीतीचा विचार करतांना डोळ्यांपुढें विशेषतः राजकारणच ठेवलेलें दिसतें. त्याचे समाजरचनेसंबंधींचे विचार विशेषतः नगरराज्याला धरून आहेत. त्याच्या मतानें राज्यांतील अधिकारी, राजकारणी पुरुष, सैन्यांतील अधिकारी, त्यांच्या हाताखालील शिपाई, व विविध पदार्थ तयार करून समाजाच्या गरजा पुरविण्यास लागणारे नागरिक, या सर्वांचा सामाजिक दर्जा व त्यांच्यावर सोंपविलेलीं कार्यें, त्यांचें शील, बुद्धिमत्ता व कार्यक्षमता यांच्या मानानें असावींत. प्लेटोनें आपल्या ' रिपब्लिक 'मध्यें तंतोतंत हेंच ध्येय ठेविलें आहे. सॉक्रेटिसाच्या या पट्टशिष्यानें स्थूल मानानें गुरुजींचा आराखडा घेतला असावा असें कांहीं लेखक मानतात. स्त्रियांना पुरुषांप्रमाणें व पुरुषांच्याच अटींवर लष्करी कामांकरितां व इतर कार्यांकरितां सरकारानें नेमावें, व त्यांना कार्यक्षम करण्याकरितां अवश्य तें शिक्षण द्यावें, हा प्लेटोचा विचार अगदीं नवीन नव्हता. झेनोफॉननें लिहिलेला ' ॲस्पेशिआ ' (' Aspasia ') नांवाचा एक अपूर्ण संवाद[१] आहे. या संवादांत ॲस्पेशिआच्या व कांहीं इतर स्त्रियांच्या अंगीं राजकारणांत कार्यक्षमतेनें भाग घेण्याची पात्रता होती, व पर्शिअन राजकन्या व्होडेजिनी हिच्या अंगांत तर लष्करी कामगिरी करण्याची धमक होती, असा झेनोफॉन उल्लेख करतो. या उल्लेखानंतर जातां जातां " स्त्रियांना योग्य शिक्षण मिळाल्यास पुरुषांचीं सर्व कामें करण्यास त्या पात्र होतील व त्यांच्या अंगीं पुरुषांइतकी योग्यता

१. The fragments of the " Aspasia ".

येईल " हा विचार तो सॉक्रेटिसाच्या तोंडीं घालतो. स्त्रिया जरी विचारशक्तींत पुरुषांपेक्षां कमी असल्या, तरी इतर देणग्यांच्या बाबतींत पुरुष व स्त्रिया यांत निसर्ग यत्किंचितहि पक्षपात करीत नाहीं. हें सॉक्रेटिसाचें मत झेनोफॉन स्पष्ट-पणें सांगतो.[1] प्लेटोचे संवाद काल्पनिक असल्यामुळें त्यानें आपले विचार संवादांतून सॉक्रेटिसाच्या तोंडीं कल्पनेनें घातले असणें शक्य आहे. पण झेनो-फॉनच्या संवादांविषयीं किंवा ' संस्मरणीय कथा ' ( " Symposium " ) संबंधीं तसें म्हणतां येत नाहीं. कारण इतिहासकार लिहितात त्याप्रमाणें तो प्लेटोसारखा प्रतिभासंपन्न नव्हता. तो अगदीं सामान्य माणूस होता, व म्हणूनच हे लेखक त्याला ' सॉक्रेटिसाचा बॉस्वेल ' म्हणतात.

● ● ●

---

१. " Symposium "

## ११. सॉक्रेटिसाचे अनुयायी

सॉक्रेटिसानें दाखवून दिलेल्या तर्कशुद्ध ज्ञानमार्गाचा विचारवंतांवर चांगला परिणाम झाला व त्यामुळें जीवनसर्वस्व वाहून केलेलें त्याचें अंगीकृत कार्य उत्तम प्रकारें यशस्वी झालें. याचा प्रत्यक्ष दाखला त्यालाच पाहावयास मिळाला. त्याच्या शिकवणीनें तयार झालेल्या कांहीं शिष्यांनीं स्वतंत्र विचारसरणीनें भिन्न भिन्न पंथ स्थापन केले. त्यांनीं आपल्या गुरुजींच्या मतांचा अंधश्रद्धेनें स्वीकार केला नाहीं, किंवा त्यांच्या मर्यादित विचारक्षेत्रांतच ते वावरत राहिले नाहींत. याचें कारण गुरुजींची शिकवण. तुम्ही आपल्या बुद्धीनें स्वतंत्रपणें पण तर्कशुद्ध पद्धतीनें विचार करा, हा उपदेश त्यांच्या मनावर चांगला ठसला होता. स्वतंत्रपणें विचार करण्याचें महत्त्व त्यांनीं ओळखलें होतें. सॉक्रेटिसाच्या शिष्यवर्गांत पट्टशिष्य प्लेटो. त्यानें सॉक्रेटिसाची पद्धति सॉक्रेटिसानें विचारांत न घेतलेल्या कांहीं विषयांना लाविली. सॉक्रेटिसानें नवीन तत्त्वज्ञान किंवा वाद निर्माण केले नाहींत, पण सत्यज्ञानाचा शास्त्रशुद्ध मार्ग त्यानें दाखविला. या मार्गानें वाटचाल करून प्लेटोनें आपलें तत्त्वज्ञान निर्माण केलें. प्लेटो सर्व शिष्यवर्गांत प्रतिभासंपन्न व कुशाग्र बुद्धीचा तत्त्वज्ञ होता. त्याची थोडीशी माहिती पुढें येणार आहे. प्लेटोप्रमाणें इतर कांहीं शिष्यांनीं आपले नवीन पंथ स्थापले. या पंथांना “ Minor Socratic Schools ” असें म्हणतात. या पंथांची प्रथम माहिती देऊन मग प्लेटोचा विचार करूं. ‘ मायनर स्कूल्स ’मध्यें युक्लिडीस ऑफ मेगॅरा, ॲंटिस्थिनीस व ॲरिस्टिपस या तीन पंथसंस्थापकांचा समावेश होतो.

युक्लिडीस ऑफ मेगॅरा[१] हा खि. पू. चौथ्या शतकांतील एक सॉक्रेटिसाचा शिष्य व विख्यात तत्त्वज्ञानी होता. सॉक्रेटिसाच्या देहान्त शिक्षेनंतर भयभीत होऊन त्याचे कांहीं शिष्य अॅथेन्स सोडून दुसऱ्या नगरांच्या आश्रयाला जाऊन राहिले. युक्लिडीस मेगॅरा शहरांत गेला म्हणून त्याला 'युक्लिडीस ऑफ मेगॅरा' म्हणतात. त्यानें आपल्या पंथाची स्थापना मेगॅरा शहरांतच केली. सॉक्रेटिसाचा शिष्य होण्यापूर्वी तो 'एलिॲटिक'[२] पंथाचा अनुयायी होता. त्यानें आपल्या स्वतंत्र स्थापिलेल्या पंथांत एलिॲटिक पंथाचीं व सॉक्रेटिसाचीं ज्ञानमार्गाचीं व नीतीचीं तत्त्वें एकत्र आणिलीं. युक्लिडीसच्या या पंथाला 'वादविवाद पंथ'[३] म्हणतात.

'एलिॲटिक पंथ' सॉक्रेटिसापूर्वी स्थापन झालेला होता. दक्षिण इटलींतील ग्रीक वसाहतीचें मुख्य ठिकाण एलिआ. या शहरावरून पंथाचें नांव निघालें. पार्मिनायडीज ( खि. पू. सुमारें ४७० ) व झेनो ( खि. पू. सुमारें ४५० ) हे दोघे या पंथाचे प्रमुख अनुयायी होते. या पथाचें विशेष मत हें होतें कीं सत्तत्त्व एकच आहे. हें मत दिसावयाला 'ब्रह्मैव सत्यं' यासारखें आहे. "What is is One, and only the One is"[४], असें या पंथीयांचें म्हणणें होतें. 'ब्रह्मैव सत्यं' या मतांत व एलिॲटिक पंथाच्या वरील मतांत एक मुख्य फरक लक्षांत ठेवण्यासारखा आहे. एलिॲटिक पंथाचें 'एकतत्त्व' भौतिक ( Material ) होतें; आपलें 'एकतत्त्व' आध्यात्मिक आहे.

एलिॲटिक पंथाचें 'एकमेव सत्तत्त्व' व सॉक्रेटिसाचें 'श्रेयस्' ('Good') यांची मिळवणी करण्याचा युक्लिडीसनें प्रयत्न केला. त्याचें म्हणणें 'श्रेयस्' एकच आहे व तें फक्त 'एकमेव सत्तत्त्व' (सद्वस्तु) आहे. हें सत्तत्त्वच फक्त सत्य ( Reality ) असल्याकारणानें, तेंच काय तें ज्ञानविषय होऊं शकतें. इंद्रियजन्य ज्ञानांत सत्याचा अंश नसतो.

---

१. Euclides of Megara.

२. Eleatic School.

३. Eristic or Dialectic School.

४. "आहे तें एक आहे; आणि तें एकच फक्त आहे!"

एलिॲटिक पंथाच्या ' एकमेव सत्तत्त्वा 'ला सॉक्रेटिसाच्या ' श्रेयस् 'ची जोड मिळाल्यामुळें ' सत्तत्त्वा 'चें महत्त्व वाढलें. पण युक्लिडीसनें ' एकमेव श्रेयस् ' ( One Good ) एलिॲटिक्सच्या सत्तत्त्वाप्रमाणें एकच एक मान-ल्याकारणानें तें केवळ भाववाचकच राहिलें. त्याच्या या पंथाला तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत फारसें महत्त्व देत नाहींत.

सॉक्रेटिसाचा दुसरा शिष्य ॲंटिस्थिनीस ( खि. पू. ४४५–३७० ) यानें आपला निराळा पंथ काढला. हा प्रथम सिसिलींतील तत्त्वज्ञानी गॉर्जि-ॲस याचा शिष्य होता, पण नंतर सॉक्रेटिसाचें आदर्शभूत शील व जीवन-क्रम यांवर भुलून जाऊन त्यानें त्याचें शिष्यत्व पतकरलें. युक्लिडीसप्रमाणें हाहि स्वतंत्रपणें विचार करणारा असल्यामुळें त्याला सॉक्रेटिसाचा ' ज्ञानप्राप्ति हाच योग्य आचरणाचा निश्चित मार्ग ' हा सिद्धान्त किंवा तत्त्व मान्य नव्हतें. सॉक्रेटिसाचा प्रत्यक्ष जीवनक्रमच त्याला योग्य मार्ग वाटला. सॉक्रेटिसाप्रमाणें जीवनांतील गरजा शक्य तितक्या कमी करण्यानें व स्वतःच्या स्वातंत्र्याच्या आड येणारीं कुटुंबांतील व समाजांतील नातीं व बंधनें तोडून टाकल्यानेंच मनुष्य स्वयंपूर्ण होऊन श्रेयस् मिळवूं शकतो असें त्याचें मत होतें.

ॲंटिस्थिनीस ' Cynic School of Philosophy ' या पंथाचा संस्थापक होता. ' सिनिक ' ( Cynic ) शब्दाचा अर्थ मानवी सुखाकडे उपहासपूर्वक दोषैक दृष्टीनें पाहणारा असा आहे. ' सद्गुण हेंच मानवी जीव-नांतील अंतिम साध्य किंवा श्रेयस् होय ' [1] हें या पंथाचें तत्त्व होतें. इंद्रियजन्य सुखें प्रिय असलीं तरी तीं ध्येयसिद्धीच्या, श्रेयसाच्या आड येणारीं. पुढें ॲथेन्समध्यें निघालेला झेनोचा ' स्टोइक पंथ ' ( खि. पू. ३०८ ) याच पंथाचा विकास होय. योग्य जीवनक्रमाला ज्ञान व मानसिक संस्कार यांची मुळींच आवश्यकता नाहीं असें ॲंटिस्थिनीसचें मत होतें. शारीरिक सुख प्रिय वाटलें तरी त्याचा त्याग हाच ' श्रेयस् 'च्या प्राप्तीचा खरा मार्ग असें तो म्हणे.

सिरिनीचा ॲरिस्टिपस[2] ( खि. पू. ४३०–३६० ) हाहि सॉक्रेटिसाच्या

१. " Virtue alone is the true end of life ".

२. Aristippus of Cyrene.

शिष्यवर्गांतील एक नवपंथ स्थापन करणारा होता. ॲरिस्टिपस अध्यापकाचा धंदा करी. अध्यापनाच्या कामाकरितां वेतन घेणारा पहिला अध्यापक हाच. याच्या पंथाचें नांव 'सिरिनेइक पंथ' (Cyrenaic School). 'सुख हेंच मानवाचें श्रेयस्'[1] असें त्याचें मत होतें. सुखप्राप्तीकरितां वाटेल ती योजना अमलांत आणण्यास हरकत नाहीं असें तो म्हणे. दुःखपरिणामी सुख वगळल्यास इतर सर्व सुखें इष्टच. त्याचा अध्यापनाकरितां वेतन घेण्याचा क्रम व त्याचा सुखवाद यांच्यावर आक्षेप घेऊन प्लेटो व झेनोफॉन यांनीं त्याच्यावर प्रखर टीका केली.

सॉक्रेटीस 'श्रेयस्' आणि 'प्रेयस्' यांत भेद करीत असे. 'प्रेयस्' तो त्याज्य मानी. ॲरिस्टिपसचा सुखवाद त्याला मान्य नव्हता. मनुष्याच्या खऱ्या हिताविषयीं, 'श्रेयस्'विषयीं, विवेचन करतांना व एकंदर कोणत्याहि विवेचनांत सॉक्रेटिसाच्या शिकवणीचा कल व्यावहारिक उपयुक्ततेकडे असे. तो अनेक वेळां ज्याच्यायोगानें व्यावहारिक, ऐहिक हित साधेल तें श्रेयस्कर असें प्रतिपादन करी. वास्तविक त्याच्या म्हणण्याचा आशय असा कीं जें सर्व दृष्टींनीं मानवी जीवनाचें अंतिम ध्येय साधील तेंच खरें हितकर (Good). मनुष्याचा जेणें जेणें करून अधिकाधिक विकास होईल तें तें हितकर. झेनोफॉन सॉक्रेटिसाच्या पद्धतीचें वर्णन करतांना म्हणतो, "सॉक्रेटीस आपली श्रेयस्‌ची कल्पना व्यावहारिक उपयुक्ततेचीं उदाहरणें घेऊन स्पष्ट करी. आत्मसंयमन कशाकरितां असें विचारल्यास, तें जीवन अधिक सुखकर होण्यासाठीं, असें त्याचें उत्तर देई. काटकपणानें प्रकृति उत्तम राहते, देशभक्तीनें देश सुखी होतो व त्याबरोबर व्यक्तीलाहि सुख मिळतें, अशी त्यांची विचारसरणी होती." या उपयुक्ततावादांतून ॲरिस्टिपसचा सुखवाद निर्माण होणें स्वाभाविक होतें. शिवाय दुसरें असें कीं मागें म्हटल्याप्रमाणें सॉक्रेटिसाचा 'वाद' असा कोणताच नव्हता; तो फक्त इतरांस विचार करण्यास लावी. त्यामुळें शिष्यवर्गाला गुरुजींच्या मतांचें बंधनहि वाटण्याचें कारण नव्हतें. अशा स्थितींत त्याच्या अनुयायांत भिन्न भिन्न विचार उत्पन्न होऊन निरनिराळे पंथ निघणें स्वाभाविक होतें.

सॉक्रेटिसाचा पट्टशिष्य प्लेटो (खि. पू. ४२७–३४८) सर्व शिष्य-

---

१. 'Pleasure is the supreme good'.

१८०४२ क्र. ५२ अनुक्रम ५२० २८।११।५५

वर्गांत बुद्धिमान व प्रतिभासंपन्न होता. त्यामुळें सॉक्रेटिसाच्या तर्कशुद्ध पद्धतीनें विचार करतांना त्याचें पाऊल सर्वांच्या पुढें पडलें. ज्ञान व मानवी जीवन यांचा निकट संबंध, व श्रेयस्कर जीवनक्रमाला ज्ञानाचें महत्त्व, यांविषयींचे धडे त्यानें सॉक्रेटिसापासून घेतले होते. त्याला आपल्या गुरुजींच्याविषयीं फार आदर होता. एकाद्या विषयाच्या चर्चेकरितां लेखनाच्या साधनापेक्षां सॉक्रेटिसाची संभाषणपद्धति त्याला अधिक पसंत पडे. त्यानें आपलें स्वतःचें लिखाण काल्पनिक संवादांच्या रूपानेंच लिहिलें आहे, व त्यांत सामान्यतः सॉक्रेटिसाची भूमिका प्रामुख्यानें घातली आहे. प्लेटोचा शिष्यवर्ग मोठा होता. त्यांपैकीं प्रख्यात तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल (ख्रि. पू. ३८४–३२२) हा एक होता. सॉक्रेटिसाचा जसा प्लेटो, तसा प्लेटोचा ॲरिस्टॉटल. प्लेटो व त्याची शिष्यमंडळी ॲथेन्सजवळच असलेल्या 'ॲकॅडेमी' नांवाच्या बागेंत तात्त्विक चर्चेकरितां जमत असत. ही 'ॲकॅडेमी' पुढें प्रसिद्धीस येऊन तिच्या कार्यामुळें इंग्रजींतील 'ॲकॅडेमी' ( Academy ) शब्दाला विद्यापीठ, शास्त्रीय विचार करणारें मंडळ, शास्त्रीय संशोधन संस्था वगैरे विविध अर्थ आले.

सॉक्रेटिसाचें कार्य जनतेला विचार करण्यास शिकविण्याचें होतें. त्यानें तर्कशुद्ध विचाराचा मार्ग व त्यांतील अडचणी दाखविल्या. त्याला तत्त्व-संशोधनाची तीव्र उत्कंठा होती, पण त्याचें सत्यसंशोधनाचें क्षेत्र फार मर्यादित होतें. त्याच्या दृष्टीनें मानवी जीवन व आचार येवढें एकच क्षेत्र मनुष्याच्या विचाराला खुलें आहे. विज्ञान, अध्यात्म इत्यादि इतर क्षेत्रांतील ज्ञान मानवी शक्तीच्या बाहेरचें आहे असें त्याचें ठाम मत होतें. प्लेटोसारख्या सखोल विचाराच्या बुद्धिमान तत्त्वज्ञाला हें मत पटण्यासारखें नव्हतें. मानव व मानवेतर सृष्टि यांचा फार निकट संबंध आहे, किंबहुना अखिल सृष्टीचा विचार केल्याशिवाय मानवी जीवनाचें कोडें उलगडणें शक्य नाहीं. सॉक्रेटिसाचे एकांगी विचार या कार्याला तोटके पडतात असें त्याचें म्हणणें होतें.

प्लेटोच्या तात्त्विक सिद्धान्तांत 'सत्तत्त्वमीमांसा' (Theory of ideas) मुख्य मानतात. त्याचे नीति, राजकारण व शिक्षण या विषयांवरील सिद्धान्त वरील मीमांसेच्या पायावर उभारलेले आहेत. प्लेटोच्या या सिद्धान्तांचा विचार प्रस्तुत पुस्तकाच्या क्षेत्रांत येत नाहीं. तथापि त्याच्या 'सत्तत्त्व-

मीमांसे 'च्या निर्मितीचा सॉक्रेटिसाच्या सिद्धान्तांशीं संबंध येत असल्यामुळें या मीमांसेचा येथें थोडक्यांत निर्देश करणें योग्य होईल. सॉक्रेटिसाच्या 'ज्ञानमार्गा 'त किंवा सत्यान्वेषणाच्या कार्यांत न्याय, नेमस्तपणा, पावित्र्य, सौंदर्य इत्यादि विवेचनांत येणाऱ्या शब्दांचा अर्थ स्पष्ट, निश्चित करून घेणें हा एक भाग होता. मनुष्याचें नैतिक आचरण शब्दांच्या अर्थांच्या निश्चित-पणावर अवलंबून असल्यामुळें त्यांचे अर्थ अव्यापक किंवा अतिव्यापक असून भागणार नाहीं. प्लेटोला सॉक्रेटिसाचें हें म्हणणें मान्य होतें. पण या निश्चित अर्थांचा विचार करतां करतां तो अधिक खोल विचारांत शिरला. त्याला असा एक विचार सुचला कीं शब्दाचा निश्चित अर्थ मुळांत मनोमय कल्पनेंत असतो. शब्दाच्याद्वारें तो निदर्शित होतो. मनोमय कल्पनेंत वास करीत असलेला अर्थ व कल्पनेच्या दृश्य स्वरूपांतील तद्दर्शक शब्दांतील अर्थ हे एकच राहात नाहींत. कल्पनेंत एकच एक निश्चित अर्थ असतो, परंतु व्यवहारांतील शब्दांत त्या अर्थाला विविध छटा निर्माण होतात. हा विचार स्पष्ट करण्यास भूमिति शास्त्रांतील उदाहरण घेतां येईल. शास्त्रीय व्याख्येप्रमाणें वर्तुळाच्या त्रिज्या नेहमीं एकाच लांबीच्या असतात. मनोमय कल्पनेंत हें सत्य आहे, तथापि दृश्य पदार्थांत असें वर्तुळ एकहि सांपडणार नाहीं. रेषेची व्याख्या 'रुंदीशिवाय लांबी' अशी करतात, पण अशी रेषा आपल्याला दिसणें अशक्य. मनोमय कल्पनासृष्टींतील वर्तुळ व रेषा व्याख्येप्रमाणें अचूक असणार. हाच फरक मनोमय काल्पनिक सृष्टींतील पदार्थांत व शब्दांनीं निदर्शित केलेल्या दृश्य पदार्थांत राहणार. प्लेटोच्या मतानें कल्पनेनें मनांत निदर्शित केलेले पदार्थच सत् किंवा सत्य; दृश्यसृष्टींतील पदार्थ असत्. सृष्टींतील इंद्रियजन्य अनुभवांत सत्य पदार्थांचें स्वरूप बदलतें, चंचल असतें; पण विचारांतील मनःसृष्टींतील पदार्थ एकच एक, स्थिर, सत्य असतो. धैर्य, न्याय, सौंदर्य इत्यादिकांचीं मनःसृष्टींतील मनोमय रूपें हींच प्लेटोचीं 'सत्तत्वें' (Ideas). हींच स्थिरस्वरूपाचीं, पूर्ण, अतएव 'सत्'; बाह्य, दृश्यस्वरूपांतील पदार्थ अपूर्ण, अस्थिर असल्याकारणानें ते 'असत्'.

पण येवढ्यानेंच हा प्रश्न सुटत नाहीं. प्लेटोच्या विचारांत यापुढें आणखी एक प्रश्न उत्पन्न झाला. पूर्ण शंभर टक्के आदर्श न्याय, सौंदर्य, धैर्य वगैरे मानवी कृतींत दिसत नाहींत हें मान्य. पण पुढें असा विचार येतो कीं पूर्ण न्यायाची,

पूर्ण सौंदर्याची, किंवा पूर्ण धैर्याची कल्पना तरी कशी उत्पन्न झाली ? ही पूर्णाची कल्पना अनुभवजन्य म्हणतां येत नाहीं, कारण दृश्यसृष्टींत पूर्णतेचा अनुभव येत नाहीं. तेथें सर्वत्र अपूर्णता भरलेली. मग पूर्णाची कल्पना मनांत कोठून आली ? मनांतील मूलभूत कल्पना जर केवळ अनुभवावर उभारलेली असेल तर ती कल्पना पूर्ण होणार नाहीं. तेव्हां असें म्हणावें लागतें कीं, अनुभवजन्य ज्ञानाच्यापलीकडे म्हणजे अनुभवाच्यापलीकडे जाण्याची मानवी विचारांत शक्ति असते. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं अनुभवजन्य ज्ञानाच्यापलीकडे जें पूर्ण सत्य किंवा ' सत् ' असतें त्याच्याशीं मानवी विचार संबंध ठेवूं शकतो, तो ' सत्तत्त्वा 'ला जाऊन पोहोंचूं शकतो; व त्यामुळें त्याला पूर्णाची कल्पना येते व अपूर्णाचेंहि ग्रहण करतां येतें. पूर्ण सौंदर्य, पूर्ण धैर्य, पूर्ण न्याय वगैरेंचीं ' सत्तत्त्वें ', पूर्ण सत्यस्वरूपें विचार जाणतो, व हें ज्ञान होत असल्यामुळेंच त्यांचीं व्यवहारांतील अपूर्ण स्वरूपें मनुष्याला समजतात. मनाचें विचारकार्य सुरू होण्यास एखादें सत्य किंवा काल्पनिक दृश्य किंवा एखादी घटना अस्तित्वांत असणें अवश्य असतें. त्याच्याशिवाय विचार उगम पावत नाहीं. एखादें दृश्य किंवा घटना समोर असली म्हणजे मनुष्य विचार करूं लागतो. हें विचारकार्य कांहीं नियमानें व पद्धतीनें चालत असतें. एखाद्या गोष्टीविषयीं विचार सुरू होण्यापूर्वी मनुष्य आपलें त्या गोष्टीविषयींचें पूर्वज्ञान जाणून किंवा नेणून विचारांत घेतो. हें पूर्वज्ञान त्याच्यांत वास करीत असतें. प्लेटोचें म्हणणें असें कीं मनुष्यासमोरील दृश्य पदार्थांच्या दर्शनानें त्याच्या आत्म्याला त्या पदार्थांच्या ' सत्तत्वा 'चें स्मरण होतें. प्लेटोच्या ' सत्तत्ववादा ' च्या ( Theory of ideas ) मुळाशीं हाच विचार आहे. व्यवहारांत चांगुलपणा, धैर्य इत्यादि जरी अपूर्णत्वानें दृष्टीस पडत असलीं तरी त्यांत ' सत् 'चा अंश असतो. मनुष्याचा आत्मा व ' सत् ' एकाच स्वरूपाचीं, एकाच स्वभावाचीं असल्याकारणानें आत्मा व विचारविषयांतील ' सत् ' हीं संबद्ध होऊं शकतात, व त्यामुळें यासंबंधानें विचारप्रवाह वाहात राहतो. दृश्य शरिरांत आत्मा अदृश्य स्वरूपानें वास करीत असतो; तसेंच ' सत्तत्व ' किंवा ' सत् ' दृश्य पदार्थांत किंवा घटनांत अदृश्य स्वरूपानें राहतें. प्लेटोच्या मतानें दृश्य जगाप्रमाणें सत्तत्वांचें एक अदृश्य जग आहे. या जगाला तो ' Ideal world ' म्हणतो. येथें हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे कीं ' Ideal ' शब्दाच्या

प्रचलित अर्थानें प्लेटो या शब्दाचा उपयोग करीत नाहीं. 'Ideal' म्हणजे काल्पनिक, आदर्शभूत या अर्थानें हा शब्द वापरतात. पण प्लेटोचें 'Ideal world' (मनोमय जग) काल्पनिक नव्हतें; हें जग सत्य, 'सत्' असें त्याचें म्हणणें होतें. या सत्यजगांतून आपलें दृश्य जग निर्माण होतें. पूर्णांतून निघालेला जीव उपाधीमुळें अपूर्ण राहतो. त्याप्रमाणें या 'सत्तत्त्व'मय जगांतून उत्पन्न होणारें दृश्य अपूर्ण असतें. प्लेटोच्या विविध विषयांवरील विचारांचा पाया सत्तत्त्ववादच आहे. जगांत अपूर्णता, दुष्कृत्यें, नीति, राजकारण, परमेश्वर आणि जग यांचा संबंध, विश्वकार्यांतील मानवाचा भाग वगैरे प्रश्न त्यानें याच आधारानें सोडविले. पण हा भाग प्रस्तुत चरित्राच्या कक्षेच्या बाहेरचा आहे.

• • •

REFBK-0008225

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 8224
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)